
# आवडत्या गोष्टी

राजा मंगळवेढेकर



BVBK-0403836

ज्योत्स्ना प्रकाशन



BVBK-0403836

गवतावर मजेत लोळत पडलेल्या घोड्याजवळ गेला. घोड्याच्या कानात हळूच म्हणाला, "हे बघ, तू परवा म्हणत होतास तशी त्या चलाख लांडग्याची फजिती करण्याची संधी आज आलेली आहे. मी त्याला बनवून इकडं आणलेला आहे. तो पाहा आलाच. तू मात्र मेल्यासारखा पडून राहा अगदी निपचीत. मी तुम्हां दोघांच्या शेपट्या बांधून टाकीन. लांडगा, तू मेलेला घोडा आहे, असं समजून, तुला ओढून नेऊ लागेल. मग पुढचं तुझं तू बघून घे! आलं ना लक्षात! तर मेल्यासारखं पडून राहा."

घोडा निपचीत पडून राहिला. लांडगा तिथं आला. घोडा बघून खूष झाला! सशानं ठरल्याप्रमाणं लांडग्याची शेपटी घोड्याच्या शेपटीला बांधली. घट्ट बांधली. मग म्हणाला, "हं, खेच जोरानं! ओढ..... ओढ!"

लांडग्याला वाटलं, ससा आपल्यालाच सांगत आहे, तर घोडयाला वाटलं, हा आपल्यालाच इशारा आहे! लांगडा जोर लावून ओढू लागला, तर घोडाही आपल्या प्रचंड बळानं लांडग्याला खेचू लागला!.....

आता घोडाच तो! केवढी तरी त्याची अश्वशक्ती! त्याच्या खेचण्यानं लांडगा फरफटत जाऊ लागला. दगड-धोंड्यांवरून, काट्याकुट्यांतून, खाचखळग्यांतून आदळत आपटत खेचला जाऊ लागला!.....

घोड्यानं त्याला असं किती लांबवर फरफटत नेलं आणि पुढं लांडग्यांचं काय झालं हे केवळ घोड्याशिवाय कोणालाच माहित नाही. सशाला देखील कधी कळलं नाही. कारण बिलंदर ससा, दोघांच्या शेपटीची गाठ बांधल्यावर लगेच तिथून बेपत्ता झाला होता! मात्र, जाताना खूप आनंदात होता! मजेत होता! एका दुष्टाला शिक्षा घडवल्याच्या समाधानात होता!

# स्वातंत्र्य

असंच एक जंगल होतं. दाट झाडीनं झाकलेलं होतं. जंगलाजवळच एक सरोवर होतं. हिरव्यागर्द झाडीत निळ्या निळ्या पाण्याचं सरोवर बिलोरी आरशासारखं शोभत होतं.

जंगलात पुष्कळ पशू-पक्षी देखील होते. पक्ष्यांच्या भराऱ्या आणि चिवचिवाट सारखा चाललेलाच असे. रंगारंगांचे पक्षी शीळ घुमवीत असत. जंगल जागं ठेवीत असत.

तर या जंगलात एक चिमणीही होती. पण ही चिमणी इतर चिमण्यांसारखी कबरी-पांढरी नव्हती. ती होती सोनेरी झगमगती!

सोनेरी चिमणी फार छानदार दिसायची. उन्हात उडताना तर चमचम चमकायची!

सोनेरी चिमणी जंगलभर हिंडायची. झाडाझाडांवर बसायची. चिवचिव गाणं म्हणायची!

एकदा सोनेरी चिमणी उडत उडत जंगलापासून थोडी लांब गेली. तिला गंमत वाटली. तिला शेतं दिसली. माणसं दिसली. तुरळक झोपड्या-घरही दिसली. चिमणी हे पहिल्यांदाच पहात होती. कारण ती जंगल सोडून कधी बाहेर पडलीच नव्हती!

चिमणी आणखी पुढं गेली. या झाडावरून त्या झाडावर. चिवचिवत मजेत भुर्कन गेली. मग एका झाडावर बसून इकडं तिकडं टुकुटुकु बघू लागली. तर तिला दिसली घरं. घरांची छप्परं, रस्ते, दुकानं, देवळं, मशिदी!.....

ते होतं एक टुमदार गाव, गाव बघून चिमणीला नवल वाटलं! गावातली माणसं एकमेकांशी बोलत होती. एकमेकांना काही तरी सांगत होती..... ते ऐकून, पाहून तर चिमणीला आणखीनच नवल वाटलं! गंमत वाटली! त्यातही गंमत अशी होती की, सोनेरी चिमणीला माणसांची भाषा येत होती. कळत होती. सोनेरी चिमणी निराळीच होती!

सोनेरी चिमणीला हे छानदार गाव फार फार आवडलं. ती बोलणारी माणसं आवडली. त्यांची घरं आवडली..... चिमणीच्या मनात आलं, 'आपण जर या गावात आलो तर आपल्याला माणसांशी बोलता येईल! त्यांची गाणी म्हणता येतील, ऐकता येतील! किती किती मज्जा येईल!.....

सोनेरी चिमणीनं जंगलातून यायचं नि गावातच राहायचं ठरवलं.

असं ठरवूनच ती जंगलात परतली. भुर्कन घरट्यात गेली. तिच्या आईनं चिवचिवत विचारलं, "कुठं गं गेली होतीस इतका वेळ? मी किती शोधलं तुला?"

"मी किनई आई, आज खूप लांब लांब गेले होते. उडत-उडत. तर तिथं किनई एक गाव पाहिलं छानसं. माणसं पाहिली चालणारी, बोलणारी, त्यांची घरं पाहिली मजेमजेची..... तिथं रस्ते होते, दुकानं होती..... मला गाव खूप खूप आवडलं!....." चिमणीनं सांगितलं.

चिमणीच्या आईनं थोडंसं धास्तावूनच म्हटलं, "कशाला गं गेली होतीस इतक्या लांब? आणि चुकलीस तर?"

"नाहीच मुळी. जाताना मी झाडांच्या, डोंगरांच्या, नदीच्या खुणा ठेवून गेले होते. मग चुकेन कशी?"

"तशी तू शहाणी आहेस गं! पण मला बाई काळजी वाटते. भीती वाटते....."

"ह्यॅ, त्यात काय भ्यायचंय? आणि बरं का!

आई, मला ते छानदार गाव इतकं आवडलंय, इतकं आवडलंय की मी आता तिथंच जाऊन राहायचं ठरवलंय. मी आता मोठी झालेय् ना?"

"अगं, कसलं वेड घेतलंयस तू डोक्यात? आपण जंगलची पाखरं, जंगलासारखं मोकळं सुख आणि मोकळा आनंद त्या गावात असतो का?..... आणि तू बघितलेली ती चालणारी, बोलणारी माणसं फार धोकेबाज असतात बरं!..... नको गं बाई, तू त्यांच्यात जाऊस....."

"ह्यॅ, त्यांना काय घाबरायचं? मी तर मोठी झालेय् ना!"

आणि एके दिवशी सोनेरी चिमणी त्या गावात पोचली. उडता उडता ती एका देवळाच्या चमचमत्या सोनेरी कळसावर बसली. सोनेरी कळसावर सोनेरी चिमणी!

मग ती एका उंच मनोऱ्यावर जाऊन बसली. तिथून सगळं गाव दिसत होतं. मनोरा पांढराशुभ्र होता. पांढऱ्या मनोऱ्यावर सोनेरी चिमणी!

मग ती घराच्या गच्चीवर जाऊन बसली. टुणटुणत, चिवचिवत होती. गच्चीवर तिला तांदळाचे दाणे पण खायला मिळाले.

मग ती दुसऱ्या एका घराच्या लालचुटुक कौलांवर जाऊन बसली.

घरावरची कौलांची घसरगुंडी पाहून तिला मज्जा वाटली!

तिसऱ्या एका घराच्या अंगणात डाळ वाळत घातली होती. चिमणीनं भुर्कन जाऊन भरभर डाळ टिपली. चोच मारून घेतली.

सोनेरी चिमणी आणखीनच खूष झाली! मनाशी म्हणाली, 'बरं झालं आपण इथं आलो ते! इथं किती मज्जा आहे! जंगलात काय आहे? नुसती झाडंच झाडं!.....'

नवलाईच्या कुतूहलानं सोनरी चिमणी इकडून तिकडं, तिकडून इकडं..... उडत होती. भुर्कत होती.

मग उडता उडता ती अशाच एका लहानशा घराच्या छपरावर बसली. चिवचिवत गंमतगाणं म्हणू लागली. टुणटुणत नाचूही लागली!

त्याचवेळी छप्परवाला घराच्या बाहेर

अंगणात आला. छपराकडं पाहिलं तेव्हा त्याला नाचणारी गाणारी सोनरी चिमणी दिसली.

'सोनेरी चिमणी !'..... तो चकित होऊन मनाशी पुटपुटला. 'किती छान आहे ही चिमणी !..... अशी सोनेरी चिमणी कधीच बघायला मिळत नाही ! कधीच कोणाला सापडत नाही ! ही सोनेरी चिमणी आपण पकडली आणि राजाला नजर केली तर !..... तर राजा खुष होईल !..... चांगली बक्षिसी देईल !..... राजाला असे निरनिराळ्या रंगारुपाचे पक्षी फार आवडतात ! त्यानं आपल्या बागेतल्या पिंजऱ्यात किती किती छान पक्षी जमवले आहेत !... खरच ! राजाला ही सोनेरी चिमणी खूपच आवडेल !,,,'

दुसरे दिवशी छप्परवाल्या शिकाऱ्यानं छपरावर जाळं पसरलं. आमिष ठेवलं. काही वेळानं सोनेरी चिमणी भुर्कत भुर्कत आली. आमिष नजरेला पडताच ती भुलून गेली. जंगलात असताना तिला तोवर तरी कधी जाळं किंवा आमिष असले प्रकार दिसले नव्हते. ठाऊक नव्हते. ती भुर्कन उडाली आणि आमिष मटकावण्यासाठी जाळ्यावर जाऊन बसली. बसली ती जाळ्यात अडकलीच ! तिला उडता येईना ! चिमणी घाबरली. भेदरली. मोठा चिवचिवाट करून आक्रोश मांडला.

शिकारी टपून बसलेलाच होता. त्यानं लोखंडाचा भक्कम पिंजरा आणला, त्यात सोनेरी चिमणीला कैद करून टाकलं !

सोनेरी चिमणी पकडली याचा आनंद शिकाऱ्याला झाला, पण लोखंडाच्या पिंजऱ्यात बंदिस्त झाल्याचं दुःख चिमणीला झालं. ती फार फार कष्टी झाली.

सोनेरी चिमणीचा लोखंडी पिंजरा घेऊन शिकारी राजाकडं आला. सोनेरी चिमणी पाहून राजा फारच खुष झाला. आनंदून गेला. त्यानं शिकाऱ्याला भरपूर बक्षिसी दिली. पिंजऱ्यात अडकलेल्या सोनेरी चिमणीला आता मात्र फार पश्चाताप झाला. जंगलातलं मुक्त मोकळं स्वातंत्र्य, खुलं वातावरण आपण घालवून बसलो. मोहाला बळी पडलो याचं दुःख अतीव झालं. पिंजऱ्यातल्या पिंजऱ्यात बाहेर पडण्यासाठी तिनं आपले सोनेरी पंख खूप जोरजोरानं फडफडले. पिंजऱ्याच्या लोखंडी निष्ठुर गजांवर आपटून - आदळून तेही दुखायला लागले.

राजाच्या चाकरानं सोनेरी चिमणीसाठी चांगली चांगली फळं, भिजलेली डाळ, तांदूळ, किती तरी निवडक, छान वस्तू खायला पिंजऱ्यात ठेवल्या. पण सोनेरी चिमणीला ते खाणं, नकोसं झालं. विषासारखं कडूकडू वाटू लागलं. तिनं त्याला चोचही लावली नाही. ती एकाच विचारात गढून गेली होती – 'इथून बाहेर कसं पडायचं ?..... मुक्त कसं व्हायचं ?..... मोकळं कसं बनायचं ?.....'

दरबारची कामं संपल्यावर राजा सोनेरी चिमणीच्या पिंजऱ्यापुढं येऊन बसला. आनंदानं कुतूहलानं, नवलाईनं पिंजऱ्यातल्या चिमणीकडं पाहू लागला. एकटक निरखू लागला.

राजाच्या लक्षात आलं – चिमणी देखणी

आहे, छान आहे, पण फार फार उदास आहे. दुःखी आहे, कष्टी आहे..... राजा तिला म्हणाला,

"सोनेरी चिमणी, म्हण की ग गाणी!
अशी का रुसलीस? फुगून बसलीस?
काय झालं तुला? सांग की गं मला!"

चिमणी धोरणी होती. शहाणी होती. सुटकेचा मार्ग तिला दिसला. युक्ती सुचली. ती पटकन् म्हणाली,

"राजा रे राजा!
तुझी आहे मजा!
लोखंडी पिंजऱ्याची
मला मात्र सजा!
मी आहे सोनेरी,
भिकारडा शिकारी!
लोखंडी पिंजऱ्यात
मला का ठेवतात?
घाणेरडया घरात
मला का कोंडतात?.....
सोनेरी चिमणीला
पिंजरा हवा सोनेरी!

चिमणीचं म्हणणं राजाला पटलं. त्यानं शिकाऱ्याला बोलावून घेतलं आणि दरडावून सांगितलं,

"काय रे शिकाऱ्या, तू लोखंडाच्या पिंजऱ्यात सोनेरी चिमणीला ठेवलंस आणि तिचा अपमान केलास? सोनेरी चिमणीला सोनेरी पिंजरा हवा! तो लोखंडाचा पिंजरा घेऊन जा, आणि चार दिवसात सोन्याच्या पिंजऱ्यात सोनेरी चिमणीला बसवून आण. जा!"

राजाची आज्ञा ऐकून शिकारी घाबरून गेला. चार दिवसात सोन्याचा पिंजरा कुठून आणणार? कसा आणणार?..... शिकाऱ्याची झोप उडाली. काळजीनं त्यानं खाणं-पिणं टाकलं. चिंतेनं पार कोसळला.

उपाय सुचेना. दिसेना. तसा चिमणीच्या पिंजऱ्यापुढं बसला. म्हणाला, "चिमणे काय करू? सोन्याचा पिंजरा कुठून आणू?"

चिमणी चतुर. म्हणाली, "सांगते तसं करशील, तर जिवानिशी वाचशील!"

"काय करू? कसं करू?" शिकाऱ्यानं विचारलं.

"अशी नाही सांगणार. पिंजऱ्यातून नाही बोलणार. मला आधी बाहेर काढ. मग मी सांगेन."

शिकाऱ्यानं लोखंडी पिंजऱ्याचं दार उघडलं. सोनेरी चिमणी बाहेर आली आणि चपळाईनं भुर्रकन उडून जवळच्या झाडावर बसली. हलत्या डुलत्या झाडाच्या फांदीवरूनच म्हणाली, "जा, सांग राजाला. म्हणावं, सोनेरी चिमणीच नाही, उडून गेली. मुक्त झाली. स्वतंत्र झाली! मग सोनेरी पिंजरा कुणासाठी आणू?"

स्वतंत्र मुक्त-मोकळी चिमणी आनंदानं चिवचिवत गाणी म्हणत मुक्त-मोकळ्या जगात छान छान उडून गेली. स्वातंत्र्याला पर्याय नाही!.....

# गणित !

एक गाव होतं. त्याच नाव होतं धूर्तनगर. तिथं एक सावकार रहात होता. त्याचं नाव होतं रोकडीमल. सावकार मोठा धूर्त आणि चलाख होता. तो गरिबांना अक्षरशः लुटीत असे. गरीब लोक गरजेच्यावेळी नाईलजाने त्याच्याकडून कर्ज घ्यायचे, कर्जावर रोकडीमल जबर व्याज वसूल करायचा. व्याज इतकं असायचं की, फेडता फेडताच गरिबांचं आयुष्य संपायचं. अनेक गरिबांचे संसार रोकडीमलनं उद्ध्वस्त केले होते.

जवळच्याच गावात एक सत्यवीर नावाचा लोकसेवक रहात होता. सत्यवीर चांगला धनीमानी होता. पण जनतेच्या सेवेचं काम झिजून - कष्टून करायचा. गोरगरिबांच्या सेवेसाठी धावून जायचा. त्यांच्यासाठी त्याचा जीव तुटायचा.

रोकडीमलचा व्यवहार सत्यवीरला पसंत नव्हता. अनेक गरिबांची गाऱ्हाणी त्याच्या कानी आली होती. त्यांची दैना त्यानं पाहिली होती. म्हणून एकदा त्यानं आपल्या मनाशी ठरवलं की, 'या दुष्ट रोकडीमलला चांगली अद्दल घडवायची ! रोकडीमल जसा गरिबांना व्याज - मुद्दल यांच्या आकड्यात फसवायचा तसाच त्याला आकड्याच्या जाळ्यात डुबवायचा.' अशी युक्ती सत्यवीरने योजली.

एके दिवशी व्यापाराचे सोंग घेऊन सत्यवीर रोकडीमल सावकाराकडे आला. म्हणाला, "सावकार मी गुजराथमधला व्यापारी आहे. माझं नाव धनीराम. मी आकड्यांचा व्यापार करतो. आपण माझ्याशी सौदा कराल, तर पुष्कळ लाभ होईल !" रोकडीमल पैशाचा लोभी होताच. त्यानं त्याच्याशी सौदा केला. सौदा लेखी झाला. त्यावर दोघांच्या सह्या झाल्या. दोन साक्षीदारांच्या सह्याही घेतल्या.

रोकडीमल या सौद्यानं फार खूष झाला होता, आनंदानं घरी परतला आणि पत्नीला म्हणाला की, "आज एक नामी सौदा केला, मला तर वाटतं की, भाग्य सदैव मलाच साथ देत आहे." पत्नीनं विचारलं, "कसला सौदा ?" रोकडीमलनं सांगितलं, "आज एक दिसायला साधासुधा असा गुजराथमधील व्यापारी भेटला. तो आकड्याचा व्यापारी आहे. त्यानंच माझ्याशी सौद्याची गोष्ट काढली. मी ती ऐकून घेतली आणि मला वाटलं की, हा व्यापारी बहुधा पागल असावा ! मग असंही वाटलं की, मला धनलाभ देण्यासाठी देवानंच देवदूत म्हणून याला पाठवलं असावं. म्हणून मी सौदा त्याच्याशी पक्का केला."

पत्नीनं उत्सुकतेनं विचारलं, "पण सौदा तरी कोणता केला?" रोकडीमलनं सांगितलं, "तो व्यापारी प्रत्येक दिवशी मला एक लाख रुपये आणून देणार. त्याच्याबदली पहिल्या दिवशी मी त्याला फक्त तांब्याचा एक पैसा - देणार !" दुसरे दिवशी तो एक लाख रुपये देणार, मी त्याला दोन पैसे देणार. तिसऱ्या दिवशी तो एक लाख देणार, तर मी त्याला चार पैसे देणार.... अशा रितीने प्रत्येक दिवशी त्यानं मला एक लाख दिल्यावर मी त्याला आदले दिवशी दिलेल्या पैशाच्या दुप्पट पैसे द्यायचे. हां, एक अट मात्र अशी आहे की, हा व्यवहार कमीतकमी एक महिना-तीस दिवस सतत चालू राहाणार! त्यात खंड पडणार नाही!"

पत्नी आनंदून म्हणाली, "खरंच, वेडाच असावा तो, किंवा तुम्ही म्हणता तसा तो देवदूतच असावा! लाखो रुपये देऊन त्याच्या बदली फक्त काही पैसे घ्यायचे, हा काय व्यवहार झाला? पण आपल्याला काय त्याचे....."

रोकडीमल म्हणाला, "अशाच विचारानं मी त्याची अट मान्य केली. आता उद्यापासून तो रोज सकाळी एक लाख रुपये आणून देणार." पत्नी म्हणाली, "पाहू या. सकाळ काही दूर नाही."

दुसऱ्या दिवशी सकाळी धनीराम रोकडीमलच्या दारात येऊन उभा राहिला. रोकडीमलनं त्याचं स्वागत केलं. सत्यवीरानं त्याच्यापुढं एक लाख रुपयांची थैली ठेवली म्हणाला, "सावकार, लाख रुपये मोजून घ्या! आणि माझा एक पैसा मला द्या!"

चांदीचे चकचकीत लाख रुपये बघून रोकडीमल हर्षभरीत झाला. त्यानं लगेच धनीरामला एक तांब्याचा पैसा देऊन टाकला.

सत्यवीर गेल्यावर रोकडीमलला शंका आली की हे रुपये नकली तर नसावेत?..... म्हणून त्यानं थैलीतला प्रत्येक रुपया ठणठण वाजवून पारखून पाहिला. सगळे रुपये खरे होते! त्यानं ते लोखंडाच्या तिजोरीत बंद करून ठेवले. मग दुसऱ्या दिवसाची तो वाट पाहू लागला.

दुसऱ्या दिवशी सकाळी दारावर 'टकटक' आवाज होताच रोकडीमल धावत गेला आणि त्यानं दार उघडल्यावर धनीराम व्यापारी दारात उभा असलेला दिसला. धनीरामनं घरात येऊन एक लाख रुपयाची थैली त्याला दिली. म्हणाला, "सावकार, मोजून घ्या आणि पारखून घ्या."
"अरे भाई, त्याची काय जरूर आहे. माझा तुमच्यावर विश्वास आहे."

"मग माझे दोन पैसे द्या!" रोकडीमलनं दोन पैसे दिल्यावर तो निघून गेला.

रात्री अचानक रोकडीमलच्या मनात आलं की, हा माणूस चोर तर नसावा? तो ताडकन् उठला आणि त्यानं घराच्या खिडक्या दारं कड्या कुलपे लावून बंद करून घेतली. तिजोरीलाही मोठं कुलूप ठोकलं. बरीच रात्र नवरा-बायको दोघंही जागत बसली.

तिसऱ्या दिवशी सकाळी दारावर 'टकटक'

आवाज झाला. रोकडीमलने दार उघडलं. धनीरामनं लाखाची थैली त्याच्यापुढे ठेवली म्हणाला, "कालच्याच्या दुप्पट म्हणजे चार पैसे द्या!"

रोकडीमलकडून चार पैसे घेऊन धनीराम निघून गेला. रोकडीमलला आणि त्याच्या पत्नीला खूपखूप आनंद झाला. कारण तीन लाख रुपये मिळाले होते. आणि त्याच्या बदल्यात फक्त सात पैसे गेले होते! त्यांना वाटलं, महिनाभर असंच चालणार! म्हणजे तीस लाख रुपये मिळणार!.....

अशा प्रकारे प्रत्येक दिवशी सकाळी धनीराम यायचा आणि एक लाख रुपये देऊन दुपटीच्या पद्धतीनं आपले पैसे घेऊन जायचा. चवथ्या दिवशी ८ पैसे, पाचव्या दिवशी १६ पैसे, आठव्या दिवशी १.२८ रुपये, पंधराव्या दिवशी १६३.८४ रुपये त्याला मिळाले. हळूहळू रोकडीमलच्या लक्षात येऊ लागलं की, प्रत्येक दिवशी आपला नफा कमी होत चालला आहे.

विसाव्या दिवशी धनीरामनं त्याला जेव्हा एक लाख रुपये दिले तेव्हा त्याला रोकडीमलला त्याच्या बदली ५२८२.८८ रुपये द्यावे लागले..... पंचवीसाव्या दिवशी तर १,६७,७७२.१६ रुपये द्यावे लागले. आता तर रोकडीमलला रोज जेवढे मिळत होते त्याच्यापेक्षा कितीतरी अधिक द्यावे लागत होते! रोकडीमल हादरला. पण अटीनुसार त्याला हा व्यवहार बंदही करता येईना.

अशा रितीने महिन्याच्या शेवटी तिसाव्या दिवशी रोकडीमलच्या असं लक्षात आलं की, करारानुसार ३० लाख रुपये मिळाले. पण त्याच्याबदली धनीरामला १ कोट ७ लाखाहून अधिक रुपये त्याला धनीरामला द्यावे लागले होते! रोकडीमलच्या तोंडचे पाणीच पळाले! त्याची तिजोरी रिकामी झाली!

धनीराम-सत्यवीरानं हे सगळे पैसे, रोकडीमलनं ज्या गरिबांना लुटलं होतं, पिळलं होतं, त्या लोकांना देऊन टाकले! सगळ्यांना त्यांनं कर्जमुक्त केलं होतं. रोकडीमलला चांगलीच अद्दल घडवली होती!

❋ ❋ ❋

# एक होता भिवा

भिवा एक गरीब शेतकरी होता. शेतकरी होता म्हणण्यापेक्षा शेतमजूर होता. कारण भिवाजवळ स्वतःची अशी थोडीशी देखील जमीन नव्हती. झोपडीत रहायचा आणि दुसऱ्यांच्या शेतावर मजुरी करायचा. राबराब राबायचा. उन्हातान्हात घाम गाळायचा. खूप कष्ट करायचा आणि दुसऱ्यांची शेतं पिकवायचा. त्यातून मजुरी म्हणून जे थोडंसं पदरी पडायचं त्यातून घर चालवायचा.

घर तरी कसलं? एक केंबळी झोपडीच! झोपडीतच त्याचा गाडग्या-मडक्यांचा संसार. दोन धाकटी पोरं आणि बायको. भिवाची बायकोसुद्धा कुणाच्या कुणाच्या शेतात मजुरीनं जायची. कष्ट करून दोन पैसे मिळवायची. फाटक्या संसाराला ठिगळ जोडायची.

एकदा सकाळीच ती गावाच्या ओढ्यावर पाणी भरायला गेली होती. ओढ्यावर दुसऱ्याही चार सहाजणी पाण्यासाठी, धुण्यासाठी आल्या होत्या. भिवाच्या बायकोला आणि तिच्या जवळच्या मातीच्या मडक्याला पाहून त्या नेहमीप्रमाणे तुच्छतेने हसल्या. कारण त्या सगळ्याजणींच्या घरी थोडीफार जमीन होती. त्या शेतकरणी होत्या. त्या लहानशा गावात एक भिवा सोडला तर सगळ्यांकडेच स्वतःची शेती होती. भिवाकडेच नव्हती. भिवाला वाईट वाटायचं. त्याच्या बायकोला तर ही उणीव फार फार डाचायची. चार बायका जमल्या म्हणजे त्या हिला हिणवायच्या. कमी लेखायच्या. लांब ठेवायच्या.

त्या दिवशी ओढ्यावर असंच घडलं. भिवाची बायको नवऱ्याला म्हणाली, "काही करा, पण एखादा जमिनीचा तुकडा घ्या. कष्ट करू. घाम गाळू. मिळेल त्याच्यात पोट भरू. पण हे मजुरीचं जिणं आता नको!"

भिवाला तर असं केव्हापासूनच वाटत होतं. पण करणार काय? जमीन घ्यायची झाली तरी तिचा दाम मोजायला पैसे नकोत? ते कुठून आणायचे? जवळ तर फुटकी कवडी नाही. मग कशी जमीन घ्यायची. आणि कसं शेतकरी बनायचं? निराशेचा सुस्कारा टाकीत भिवा मनाशी म्हणायचा, "कसली जमीन घेतोय आपण! ही मजुरी काही टळायची नाही."

एकदा त्यानं मनाशी ठरवलं, काही तरी केलंच पाहिजे. आपली जमीन झालीच पाहिजे!

एके दिवशी भिवा उठला आणि गावाच्या पाटलाकडे गेला. म्हणाला, "पाटीलबाबा, काही करा, मला थोडी जमीन कसायला द्या. एवढे

उपकार करा."

पाटीलबाबा वस्ताद होता. तो म्हणाला, "भिवा, तुला जमीन देतो. पण तिच्या बदल्यात तू माझ्या घरातील सगळं काम केलं पाहिजेस."

खरं तर, ही अट सुद्धा अपमानकारकच होती. भिवाला मनातून ती आवडली नव्हती. पण नाईलाजच होता. अट मानली नाही तर जमीन कधीच मिळणार नाही. म्हणून भिवानं अट मान्य करायचा विचार केला. पाटीलबाबाला म्हणाला, "पाटीलबाबा, कबूल आहे मला. करीन तुमची कामं. जमीन मात्र द्या."

पाटीलबाबा आपल्या तिढ्यावर खूष होऊन म्हणाले, "गावच्या ओढ्यालगत वेताळाचा मळा आहे. वेताळाच्या देवळामागे पडीक जमीन आहे. नापीक आहे, तर ती घे!"

भिवानं पाटीलबाबानं सांगितलेली जमीन अनेकवेळा पाहिली होती. तिला जमीन म्हणण्यापेक्षा खडक म्हणणंच योग्य ठरलं असतं. ती खडकाळ, मुरमाड जमीन होती. तिच्यात कसायचं तरी किती? आणि पिकवायचं तरी काय? पण तसली जमिनही भिवा विकत घेऊ शकत नव्हता. भिवानं विचार केला आणि पाटीलबाबाला म्हणाला, "कबूल आहे मला!"

"मग जा. त्या जमिनीत कष्ट कर. मात्र घराकडे येऊन काम करायला विसरू नकोस."

भिवानं आणि त्याच्या बायकोनं रात्रंदिवस घाम गाळून जमिनीतला खडक फोडून काढला. मुरुमाची टेंगळं सपाट केली. दगडगोटा वेचून बाजूला टाकले. कुठून कुठून माती आणून शेतात पसरून टाकली. लहानशी विहीरही पाडली आणि पीक घेण्यासारखी जमीन बनवली.

त्यावर्षी वेळेवर पाऊसही पडला. शेत भिजलं. विहीरीत पाणी साठलं. भिवाचं शेतकरी मन आनंदानं फुलून आलं! कष्टाचा शीण ओसरून गेला. बायकोला म्हणाला, "शेवंता, पेरणीची तयारी करायला पाहिजे. तू बियाणं बघून ठेव. मी शेतात जाऊन येतो. भिवा दिवसभर शेतात राबला. पेरणीची व्यवस्था केली. संध्याकाळी अंधार पडू लागला, तसा भिवाही घरी निघाला. चालता चालता वेताळाच्या देवळाजवळ आला, तर तिथं त्याला एक माणूस दिसला! त्यानं भिवाला हटकलं, म्हणाला, "काय रे, माझ्या जमिनीत उद्या तू पेरणी करणार? आणि मला न विचारता? न सांगता?"

भिवा चकितच झाला! मनातून घाबरला होता. पण भिती दडपून त्यानं विचारलं, "आपण कोण आहात?" तो धिप्पाड दैत्य गुरकावला, "मी ह्या वेताळ देवाचा सरदार आहे. मला सैतान म्हणतात! ती जमीन माझी आहे."

भिवा विचारात होता, या दैत्याशी झगडा करणं आपल्याला शक्यच नाही हे त्यानं पटकन जाणलं. म्हणून तो दैत्याला म्हणाला, "असू द्या महाराज. जमीन तुमची तर तुमची. पण मी तिच्यात कष्ट केलेत, पीक काढलं तर कुठं बिघडलं? किती तरी साल जमीन पडीकच

आहे. आजवर इतरांच्या शेतात राबत होतो. आता तुमच्या शेतात राबीन. शेत पिकवीन. म्हणालात तर त्याबदली तुम्हालाही काही देईन. मी तसला तंटा करणारा माणूस नाही. आपण म्हणाल तसं करीन.''

भिवाचं नम्र आदबशीर बोलणं ऐकून आणि त्याचं मऊ सोज्वळ वागणं बघून दैत्यालाही वाटलं की, काय हरकत आहे याने जमीन कसली तर? बरं, पिकातील पीक आपल्याला ऐतं मिळेल, कष्ट नाही, त्रास नाही. मग दैत्य भिवाला म्हणाला, ''हे बघ भिवा, तू एवढे कष्ट केले आहेस, जमीन तयार केली आहेस, तर पेरणी कर, पण जे काही पिकवशील त्यातला अर्धा हिस्सा मला दिला पाहिजे.''

बिचाऱ्या भिवानं दैत्याची ही अटदेखील मान्य करायचं ठरवलं. तो म्हणाला, ''कबूल आहे मला. सरदारसाहेब अर्धा हिस्सा तुम्हाला द्यायचा तर आत्ताच सांगून टाका की, पिकाचा खालचा भाग तुम्हाला पाहिजे की वरचा भाग पाहिजे?''

दैत्य सरदारानं गुरकावतच सांगितले, ''खालचा कशाला? वरचा भाग दे मला!''

''बराय सरदार! वरचा तर वरचा!''

दुसऱ्या दिवशी भिवानं बटाट्याचं वेणं शेतात पेरून टाकलं. त्यावर्षी भिवानं बटाट्याचं बख्खळ पीक घेतलं. काही दिवसांनी बटाटे तयार झाल्यावर भिवा दैत्य सरदाराकडे गेला. म्हणाला, ''सरदारसाहेब, आज पीक काढायचं म्हणतो. शेतात चला. पिकाचा वरचा भाग ठरल्याप्रमाणे तुमचा तुम्ही घेऊन टाका!''

दैत्य सरदाराला आनंद झाला. तो भिवाबरोबर शेतात आला. भिवा शेतातलं तयार पीक दाखवत म्हणाला, ''सरदारसाहेब हे आपल्या शेतातलं पीक. तुम्ही सांगितल्याप्रमाणे वरचा भाग कापून देतो. खालचा भाग मी घेतो.''

भिवानं आणि त्याच्या बायकोनं भराभरा कोयते चालवून बटाट्यांचा जमीनीवरचा पाल्याचा भाग कापून काढला आणि त्याच्या बायकोनं जमीनीतील बटाटे उकरून काढले आणि त्याचाही ढिग दुसरीकडं घातला. भिवा म्हणाला, ''सरदारसाहेब, हा वरचा भाग तुमचा तुम्ही घेऊन जावा!''

भिवाची हुशारी दैत्याच्या लक्षात आली. पण आता इलाज नव्हता. वरचा पाला घेऊन तरी काय करणार? तो भिवाला म्हणाला, ''भिवा, गड्या हा माझा हिस्सादेखील तूच घे! तुझ्या गुरांना उपयोगी होईल. पुढच्या साली बघू.''

भिवानं बटाटे बाजारात नेऊन विकले. चांगले पैसे केले. ते वर्ष सरलं. दुसऱ्या वर्षी पुन्हा पेरणीची वेळ आली. भिवा दैत्याकडं गेला आणि विचारलं, ''सरदारसाहेब, या साली काय करायचं? पिकाचा अर्धा हिस्सा तर तुम्हाला द्यायचाच, पण मग सांगा, खालचा की वरचा?''

गतवर्षीची भिवाची हुशारी दैत्याच्या लक्षात होती. यावर्षी त्याला अद्दल घडवायची

असं मनाशी ठरवून दैत्य म्हणाला, "खालचा! यावर्षी मला पिकाचा तू खालचा हिस्सा दिला पाहिजेस."

भिवा म्हणाला, "कबूल आहे मला."

हुशार भिवानं दुसऱ्या साली शेतात ज्वारीचं पेरली. ज्वारीच पीक चांगलं आलं. कापणीचे दिवस आले तेव्हा भिवा दैत्याकडं गेला आणि म्हणाला, "सरदारसाहेब, आज पिकाची कापणी करणार आहे. शेतात चला. पिकाचा खालचा अर्धा हिस्सा तुमचा घेऊन टाका!"

दैत्य खुषीत उठला. शेतात आला. भिवा म्हणाला, "सरदारसाहेब, हे आपल्या शेतातलं पीक. ठरल्याप्रमाणं पिकाचा वरचा भाग मी घेतो, खालचा तुमचा तुम्हाला देऊन टाकतो!"

भिवानं आणि त्याच्या बायकोनं भराभरा विळे चालवले आणि ज्वारीच्या भरदार कणसांचा ढीग एका बाजूला घातला. खालच्या कडब्याचा ढीग दुसऱ्या बाजूला घातला. म्हणाला, "सरदारसाहेब, हा तुमचा कडब्याचा अर्धा हिस्सा घेऊन टाका!"

दैत्य मनात चरकला! भिवाची हुशारी त्याच्या लक्षात आली, पण आता इलाज नव्हता. बरं, कडबा घेऊन करणार तरी काय? मनातून चरफडत तो म्हणाला, "भिवा, या सालचा माझा हिस्सासुद्धा तूच घेऊन टाक! तुझ्या गुराढोरांना उपयोगी पडेल."

भिवानं त्याही वर्षी ज्वारी बाजारात नेली. चांगली कमाई केली!

तेही साल उलटलं. तिसऱ्या सालचे पेरणीचे दिवस आले. भिवा दैत्याकडे गेला आणि म्हणाला, "सरदारसाहेब, उद्या पेरणी करणार आहे. यासाली तुम्हाला पीकांचा कोणता भाग द्यायचा ते सांगून टाका."



दोन वर्षांची भिवाची हुशारी लक्षात घेऊन सैतानानं सांगितलं, "या साली तू मला खालचा आणि वरचा हिस्सा दे! आणि मधला तू घे!"

भिवा म्हणाला, "कबूल आहे मला."

त्यासाली भिवानं शेतात मका पेरला. मक्याचं चांगलं पीक आलं. कापणीची वेळ आली तेव्हा भिवा दैत्याकडं गेला आणि म्हणाला, "सरदारसाहेब, आज कापणी करणार आहे. शेतात चला आणि ठरल्याप्रमाणे पिकाचा खालचा आणि वरचा हिस्सा घेऊन चला!"

यासाली आपल्या पदरात नक्कीच पीक पडणार अशा खुषीत दैत्य शेतात गेला. भिवानं आणि त्याच्या बायकोनं विळे चालविले. मक्याचं पीक कापून काढलं. पिकाचा वरचा आणि खालचा असे भाग कापून त्याचा ढीग दैत्यापुढं घातला आणि मधला भाग आपण घेतला. मधल्या भागात मक्याची सगळी कणसं होती. मक्याची कणसं अशी मधल्या भागातच लागतात. सैतानाच्या वाट्याला पिकांचे खालचेवरचे शेंडे-बुडखे तेवढे आले. ते बघून सैतान मनात चांगलाच वरमला! फार फार चरफडला! पण नाईलाज होता. भिवाची हुशारी त्याच्या चांगलीच लक्षात आली होती. या हुशार आणि कष्टाळू शेतकऱ्याच्यापुढं आपल्यासारख्या ऐतोबाचा निभाव लागणार नाही, हे ओळखून सैतान म्हणाला, "भिवा, तू वर्षभर कष्ट करतोस, राबतोस, सगळं पीक तूच घे. यापुढं मला काही नको. शेत तुझं, पीक तुझं!" भिवाला आणि त्याच्या बायकोला फार फार आनंद झाला. शेतमजुरांचे ते आता शेतकरी बनले! त्यांच्या कष्टाला फळ आले.

*** 



# सिएन आणि लिसे

चीनमधली एक गोष्ट. जुनी पण मोठी शहाणी.

एका गावात दोन भाऊ राहात होते. एकाचं नाव होतं सिएन आणि दुसऱ्याचं होतं लिसे. सिएन मोठा होता. लिसे छोटा होता. सिएन श्रीमंत होता. लिसे गरीब होता. सिएन मोठा श्रीमंत होता, पण मनानं हलका होता. लिसे छोटा गरीब होता, पण मनानं मोठा होता ! सिएनला आपल्या श्रीमंतीचा आणि मोठेपणाचा गर्व होता. लिसेजवळ गर्व करण्यासारखं काही नव्हतंच. तो मनानं सरळ साधा होता. गरीबी वाईट, पण ती शिकवते पुष्कळ. श्रीमंती चांगली, पण ती बिघडवतेही पुष्कळ !

सिएन आपल्या धाकट्या भावाला लिसेला कसली मदत तर करत नव्हताच, पण तुच्छ लेखून टाकून बोलत होता. लहानसहान गोष्टींवरून त्याला नावं ठेवीत होता. त्याची निंदा करीत होता.

बरेच दिवस लिसेनं सिएनकडून होणारी ही निंदानालस्ती खपवून घेतली. सहन केली. पण जेव्हा ती दिवसेंदिवस वाढतच चालली, तेव्हा मात्र त्याला ती असह्य होऊ लागली. परंतु तो त्यावरून मोठ्या भावाशी भांडणारा नव्हता. वादावादी करणारा नव्हता. एके दिवशी उठला आणि दूर कुठं तरी जाऊन राहण्याच्या विचारानं घराबाहेर पडला. जाता जाता जवळच्याच एका गावातल्या धर्मशाळेत राहिला. रात्र झाली होती आणि डिसेंबर महिन्यातली थंडी रक्त गोठवू लागली होती. गारठा फार होता. हुडहुडी भरवणारा होता.

धर्मशाळेच्या बाहेरच काही तरुण मंडळी शेकोटी पेटवून ऊब घेत बसली होती. आपसात बोलत होती. हसत होती. मजेत होती. लिसे उठला आणि शेकोटीजवळ जाऊन बसला. [illegible] घेता घेता त्यानं मोजलं तर ते बारा जण होते, असं त्याच्या लक्षात आलं

थोडया वेळानं बाराजणांतल्या एकानं लिसेची चौकशी केली. तोंडओळख झाल्यावर तो त्याला म्हणाला, ''या महिन्याची हवा किती थंड खराब आहे, नाही का ?'' लिसे म्हणाला, ''थंड आहे, पण खराब आहे असं म्हणणं बरोबर होणार नाही. कारण [illegible] आपल आपलं असं महत्त्व असतं. सगळे महिने चांगलेच असतात !'' बाकीचे अकराजण त्याचं बोलणं ऐकत होतेच. लिसेचं म्हणण त्यांनाही पटलं. त्यांनी लिसेच्या म्हणण्याला पाठिंबा दिला.

दुसरे दिवशी सकाळी लिसे पुढची वाट

चालण्याच्या तयारीस लागला. रात्री शेकोटी भोवती ओळख झालेल्या बारा मित्रांचा तो निरोप घेऊ लागला. त्यावेळी पहिल्यांदा ज्याची ओळख झाली, त्यानं त्याला एक छोटीशी पेटी भेट दिली, आणि म्हणाला, "मित्रा, ही माझी छोटीशी भेट! हिचा स्वीकार कर! ह्या पेटीचं वैशिष्ट्य असं आहे की , ही पेटी उघडून मनातली इच्छा हिला सांगितलीस तर ती ताबडतोब पुरी होते!"

लिसेन ती भेट स्वीकारली. त्या मित्राचे आभार मानले, तो पुढं निघाला.

काही अंतर चालून गेल्यावर लिसे एका झाडाखाली विश्रांतीसाठी थांबला. चालून चालून तो थोडा थकलाही होता आणि त्याला भूकही लागली होती. त्यानं ती छोटी पेटी उघडली आणि तिच्याजवळ इच्छा व्यक्त केली, "काही खायला फळं आणि बसायला पालखी मिळाली तर किती बरं होईल!"

लगेच त्याच्यापुढं निरनिराळ्या फळांची टोपली आली! एक सुंदर पालखी आणि ती वाहण्यासाठी चार भोईदेखील आले!

लिसेनं सुंदर - स्वादिष्ट फळं खाल्ली. पोट भरल्यावर तो पालखीत बसला. पालखी पुढं निघाली. लिसे मजेत सुखात होता. जाता जाता रात्र झाली, लिसेनं पेटी उघडून म्हटलं, "रात्रीच्या मुकामासाठी इथं जर तंबू, तंबूत नोकरचाकर आणि झकास जेवायला मिळालं तर किती बरं होईल!"

लगेच तिथं डौलदार तंबू दिसू लागला. तंबूतून नोकरचाकर त्याच्याकडं धावत आले. त्यांनी त्याला पालखीतून तंबूत नेलं. तंबूत जाऊन बसल्यावर स्वादिष्ट जेवणाचं ताट पुढं आलं. लिसे पोटभर जेवला आणि सुखात झोपला.



सकाळी उठल्यावर त्यानं पेटी उघडून 'उत्तम पोषाख मिळावा' अशी इच्छा पेटीजवळ व्यक्त केली. लगेच त्याच्या अंगावर रेशमी, भरजरी वस्त्रं दिसू लागली!

मग लिसेनं विचार केला, 'आता पुढं कशाला जायचं, परतूया आपल्या गावाकडंच. त्यानं तशी इच्छा पेटीजवळ व्यक्त केली. लगेच त्याची पालखी त्याच्या घरापुढं येऊन थांबली. त्याचवेळी सिएन घराच्या गच्चीवर उभा होता, त्याच्या दृष्टीला ती सुंदर पालखी पडली. इतकी सुंदर पालखी आपल्या घरापुढं कोणाची थांबली, या कुतूहलानं तो बघू लागला, तर पालखीतून डौलदार पोषाख केलेला लिसे उतरताना त्याला दिसला! सिएनला आश्चर्याचा धक्काच बसला! 'दरिद्री, गरीब लिसे एवढ्या थाटामाटात आणि वैभवात, एवढ्या लवकर कसा काय परतला?.....

सिएन धावत पळतच गच्चीवरून खाली आला आणि लिसेजवळ गेला. त्याच्याशी अदबीनं बोलू लागला. त्याला घरात घेऊन गेला. त्याची चहादारी करू लागला. त्याची म्हणण्यापेक्षा त्याच्या वैभवाची आणि श्रीमंतीची चहादारी करू लागला!.....

लिसे धनीमानी तर झाला होताच, पण तो इतक्या लवकर असा कसा काय श्रीमंत बनला याविषयी सिएनला कुतूहल वाटत होतं. त्यानं मग लिसेला त्याबद्दल विचारलंच. लिसे सरळ मनाचा साधा भोळा माणूस होता. त्यानं घडलेली गोष्ट सिएनला सांगून टाकली. ती ऐकल्यावर 'आपणही अशी एखादी वस्तू मिळवावी' अशी ईर्षा त्याच्या मनात उत्पन्न झाली.

दुसऱ्याच दिवशी सिएन उठला आणि त्याच धर्मशाळेत जाऊन राहिला. डिसेंबरची ती रात्र फारच कडाक्याच्या गारठयाची होती. रात्री तेच बारा तरुण धर्मशाळेच्या पुढं शेकोटी करून गप्पागोष्टी करीत बसले होते. सिएन त्यांच्याजवळ जाऊन बसला. त्यांच्यातल्या त्याच एकानं त्याची चौकशी केली आणि म्हटलं, "या महिन्याची हवा किती थंड आणि खराब आहे, नाही का?" सिएन म्हणाला, "तर काय! या डिसेंबर महिन्याइतकी खराब हवा कधीच नसते. फार गारठा!...."

सकाळी तो त्या बाराजणांकडं जाऊन निरोप घेऊ लागला, तेव्हा त्या एकानं अक हंटर भेट म्हणून दिला. म्हणाला, "गृहस्था, या हंटरकडं शंभर मागितलेस तर शंभर मिळतील. हजार मागितलेस तर हजार मिळतील!"

सिएननं ती भेट आभारपूर्वक स्वीकारली आणि तो तिथूनच घरी परतला. तो मनात भलताच खूष झाला होता. या हंटरकडून हवं तितकं मागून घेता येईल आणि हवं तितढं श्रीमंत बनता येईल या कल्पनेनं तो आनंदून गेला होता!

घरी पोचल्यावर तो ताबडतोब आपल्या खोलीत गेला. मनात कुतूहल दाटलेलं होतंच. हंटर पुढं घेऊन म्हणाला, "शंभर दे!"

लगेच हंटरनं दणादण दणके द्यायला

सुरुवात केली. फटाफट फटके मारायला सुरुवात केली. एक, दोन, तीन... चाळीस, पन्नास.... हंटरचे फटकारे जबरदस्त होते! सिएन त्या मारानं ओरडू लागला. विव्हळू लागला, पण फटकाऱ्यातून सुटका काही झाली नाही. शंभर फटके झाल्यावरच हंटर स्वस्थ झाला.

शंभर फटके खाल्लेला सिएन रक्तबंबाळ होऊन पडला होता. लिसेला जेव्हा ही वार्ता कळली, तेव्हा तो धावतच सिएनकडे आला. त्याची ही दशा पाहून त्याला अत्यंत वाईट वाटलं. दुःख झालं. तो रडू लागला. म्हणाला, "हे असं कसं घडलं?"

सिएननं कह्लत-कुंथत झाली गोष्ट सांगितली. ती ऐकून लिसे त्याला म्हणाला, "दादा, तुम्ही उगाच डिसेंबर महिन्याची बदनामी केलीत. त्याला वाईट-खराब म्हटलंत. तुमच्याजवळ पैसा आहे. श्रीमंती आहे. पण समाधान नाही, आणि बुद्धी पण नाही. अहो, धर्मशाळेत शेकोटीजवळ ते जे बाराजण तुम्हाला भेटले ते दुसरे तिसरे कोणी नसून वर्षाचे बारा महिनेच होते! ज्यानं तुम्हाला हंटर दिला तो डिसेंबरच होता. आणि तुम्ही त्याचीच त्याच्या तोंडावर निंदा केलीत! त्यानं तुम्हाला चांगला धडा शिकविला! आता यापुढं तरी श्रीमंतीच्या ताठ्यानं फुगून जाऊन कोणाला तुच्छ लेखू नका. कोणाला नावं ठेवू नका. कोणाची निंदा करू नका.सगळ्यांशी भलाईनं वागा!"

सिएन शरमिंदा झाला होता. पश्चातापानं पोळला होता. लिसेचं म्हणणं गप्प बसून ऐकत होता.

❊ ❊ ❊



# माणूस लहान, बुद्धी महान !

कोण्या एका काळी, कोण्या एका देशात ब्रह्मदत्त नामक राजा राज्य करीत होता. राजा मोठा प्रजाहितदक्ष होता. शूरवीर होता.

राज्यात बोधिसत्व नावाचा एक पंडीत रहात होता. बोधिसत्व बाळपणापासून अतिशय हुशार होता. अल्पवयातच त्याने वेदविद्येचे आणि नाना शास्त्रांचे अध्ययन केले होते.

बोधिसत्व बुद्धीने असा मोठा होता, थोर होता. पण शरीराने बुटका होता, खुजा होता. म्हणून लोक त्याला 'बुटका वामन' असंच म्हणत असत.

अध्ययन पूर्ण केल्यानंतर बोधिसत्वाला वाटले की, ब्रह्मदत्त राजाकडे जावे आणि त्याच्या सेवेत दाखल व्हाव. परतु मग त्याच्या लक्षात असेही आले की, राजा आपली बुद्धी केवढी आहे हे न पाहाताच, आपली उंची बघूनच आपल्याला धूडकावून लावील.

पण बोधिसत्वाला आपल्या बुद्धिमत्तेचा गर्व जरी नव्हता, तरी अभिमान निश्चित होता ! राज्याच्या भलाईसाठी आपल्या बुद्धीचा उपयोग व्हावा, अशी त्याची फार फार इच्छा होती. पण हे बुटकेपण आड येत होते. मग काय करावे बरे ? त्याने बराच विचार केला, आणि ठरवले की, एखाद्या उंच-धिप्पाड माणसाची मदत आपल्या बुद्धीला मिळवून द्यावी !

बोधिसत्व अशा माणसाच्या शोधात निघाला. जाता जाता तो एका गावी एका विणकराच्या घरी पोचला. त्या विणकराचे नाव होते भीमसेन. नावाप्रमाणेच तो उंचापुरा, तगडा, शक्तिशाली होता. मागावर विणत बसला होता.

बोधिसत्व भीमसेनाला म्हणाला, "तू एवढा दणकट, देखणा, शक्तिवान माणूस आहेस आणि मागावर बसून कपडा विणण्यात आयुष्य घालवतोस ?"

भीमसेन म्हणाला, "काय करणार ? अंगात ताकद आहे, पण दुसरा धंदा करायला जवळ भांडवल नाही. शिवाय मला दुसरं काही - काहीच येत नाही."

बोधिसत्व म्हणाला, "असं ! चिंता करू नकोस. माझ्याबरोबर चल. असल्या कामात शक्ती घालवू नकोस. तू भीमसेन आहेस. मोठा तिरंदाज आहेस. लढवय्या आहेस. तुझ्या या शक्तीचा उपयोग आपल्या देशाला मिळाला पाहिजे.

"मलाही तसं वाटतं. पण काय करणार ? माझं डोकं चालत नाही."

"माझं डोकं छान चालतं. पण मी आहे असा बुटका. तेव्हा असं करू की, तुझी शक्ती, आणि माझी बुद्धी यांची सांगड घालून देऊ! देशाची सेवा करू, सुखानं जगू."

भीमसेन बोधिसत्वाबरोबर निघाला.

राजधानीत आल्यावर बोधिसत्व भीमसेनाला म्हणाला, "तू ब्रह्मदत्त राजाच्या दरबारात जा. त्याला तुझी नेमबाजी दाखव. धनुर्विद्येतलं तुझं कौशल्य प्रकट कर. राजा तुला खचितच आपल्या सेवेत दाखल करून घेईल. आणि एक लक्षात ठेव की, राजा जी जी जबाबदारी तुझ्यावर सोपवील ती पार पाडण्यासाठी मी माझं बुद्धीबळ वापरून तुला मदत करीन. घाबरू नकोस, की कसली काळजीही करू नकोस. निर्भय रहा."

मग दोघेही राजवाड्याच्या महाद्वारावर जाऊन उभे राहिले. द्वारपालाने राजाला खबर दिली. राजाने त्या दोघांना दरबारात बोलावून घेतले आणि विचारले, "काय काम आहे?" भीमसेन म्हणाला, "महाराज मी एक लढवय्या आहे. चांगला तिरंदाज आहे. इतका चांगला की माझ्यासारखा तिरंदाज कदाचित आपल्या राज्यात नसेल. आपल्या पदरी राहावं आणि देशाची सेवा करावी अशी इच्छा आहे."

राजाने भीमसेनाकडे पाहिले तेव्हाच त्याच्या रुबाबदार व्यक्तिमत्वाची छाप त्याच्या मनावर पडली होती. असा देखणा आणि शक्तिशाली तिरंदाज आपल्याजवळ हवाच! असे राजाला वाटले आणि तत्काळ, दरमहा एक हजार सुवर्णमुद्रा एवढ्या वेतनावर त्याची राजाने नियुक्ती करून टाकली. तगड्या भीमसेनाबरोबर बुटका वामन पाहून राजाने कुतूहलाने विचारले, "हा कोण? तुझ्याबरोबर आहे. तू केवढा आणि हा केवढा!"

बोधिसत्वाने योजिल्याप्रमाणे भीमसेनाला राजाकडे चाकरी तरी मिळाली. वेतनही चांगलेच ठरले.

भीमसेन दुसऱ्याच दिवसापासून दरबाराच्या सेवेत रूजू झाला. राजाची कामे करू लागला. राजा त्याला नवनवीन साहसाची कामे सांगू लागला. भीमसेन ती तेवढ्याच यशस्वीरितीने पार पाडू लागला. कारण त्याच्या शक्तीला बोधिसत्वाच्या युक्तीची मदत होत असे. तो ते काम कानावर घालत असे आणि बोधिसत्व त्याला ते काम कसे करायचे याचा अचूक सल्ला देत असे!

भीमसेनाच्या कामगिरीवर राजा बेहद्द खुष होता. भीमसेन त्याच्या मर्जितलाच बनला होता.

अशा रीतीने सात-आठ महिने उलटले. दिवस मोठ्या मजेत आणि आनंदात गेले.

मग एकदा बिकट परिस्थिती उत्पन्न झाली. राज्याच्या एका भागातील जंगलात एका चित्त्याने धुमाकूळ मांडला होता. चित्ता मोठा क्रूर आणि हिंस्र होता. जंगलाच्या आजूबाजूच्या गावात तो बेधडक घुसायचा आणि तिथली जनावरे मारून खायचा. कधी कधी तो माणसावरही हल्ला चढवायचा. चित्त्याच्या क्रौर्याने

माणसे भयग्रस्त बनली होती. त्यांना आपल्या जीवाची काळजी वाटू लागली होती. राजाकडं त्यांनी चित्त्याचा बंदोबस्त करावा आणि प्राण वाचवावेत, अशी प्रार्थना केली होती.

राजाने ही कामगिरी भीमसेनावर सोपविली.

भीमसेन मनातून घाबरलाच होता, पण राजाला म्हणाला, "महाराज, आपण मुळीच चिंता करू नका. चित्त्याचा मी बरोबर बंदोबस्त करतो."

राजा खूष झाला. त्याने भीमसेनाच्या शिकारीची सगळी तयारी करण्याची आज्ञा दिली.

भीमसेन घाबरलेल्या स्थितीतच घरी आला आणि राजाने सोपविलेली ही धोकेबाज कामगिरी बोधिसत्वाच्या कानावर घातली.

बोधिसत्व त्याला धीर देत म्हणाला, "घाबरू नकोस, काळजी करू नकोस."

घाबरलेल्या भीमसेनाने विचारले, "पण आपण माझ्याबरोबर याल ना?"

"नाही. मी तुझ्याबरोबर येणार नाही."

"तर मग मीही जंगलात जाणार नाही."

"अशी हिंमत सोडू नकोस. मी सांगतो तसं कर म्हणजे झालं."

"काय करू?" भीमसेनाने विचारले.

"ऐक. जाताना गावातल्या बऱ्याच लोकांना घेऊन जा. त्यांच्याजवळ धनुष्यबाण असणारच. जंगलात गेल्यावर त्यांना हाकाटी पिटून चित्त्याला घेराव घालायला सांग. त्या गोंधळाने खवळलेला चित्ता त्या लोकांवर हल्ला चढवील. तू चपळाईने झाडीच्यामागे एखाद्या मोठ्या झाडाच्याजवळ पालथा पडून राहा.

"चित्त्याने हल्ला चढवल्यावर लोक त्याला ठार मारतीलच. चित्ता मरून जाईल, मग तू झाडाची फांदी तोड. तिची पाने काढून एक लवलवता फोक बनव. मग गाववाल्यांपुढे जाऊन संतापाने विचार, चित्त्याला कोणी मारलं मला न विचारता हा गुन्हा कोणी केला? सांगा. मी त्याला कठोर शिक्षा दिल्याशिवाय राहणार नाही."

"तुझा संताप आणि शिक्षेची धमकी ऐकून लोक घाबरून जातील, आणि 'चित्त्याला तूच मारलं आहेस,' हे तुझं म्हणणं कबूल करतील."

भीमसेन बोधिसत्वानं सांगितलेल्या या योजनेवर खूष झाला. उसने अवसान आणून भला मोठा लवाजमा घेऊन तो जंगलात गेला आणि बोधिसत्वानं सांगितल्याप्रमाणं सगळे नाटक बरोबर वठवलं!

त्याचा संताप आणि धमकी ऐकून खरोखरच लोक घाबरून गेले, आणि म्हणू लागले, "महाराज, चित्ता तुम्हीच मारला हे आम्ही काबूल करतो. राजाला आपण असे जरूर सांगा. राजा देईल ते बक्षीसही घ्या, पण आम्हाला वाचवा.'

मग पुढचं नाटकही बोधिसत्वाने सांगितल्याप्रमाणे भीमसेनाने वठविले. राजा त्याच्या पराक्रमावर खूष होऊन गेला. राजाने

त्याला मोठे इनामही दिले.

आणखी काही दिवस गेले आणि दुसरी एक घटना घडली.

एकदा एक माणूस धावत-पळत घरी आला. तो खूप घाबरलेला होता. भीतीने थरथर कापत होता. राजाला सांगू लागला, ''महाराज, एका जंगली गव्यानं रस्त्यावरच भयंकर गोंधळ माजवलेला आहे. जाणाऱ्या - येणाऱ्या मुशाफिरांवर हल्ला चढवून त्यानं काही जणांचे प्राण घेतले आहेत, तर कित्येकजणांना जखमी करून टाकलं आहे. महाराज काहीतरी करा आणि या भयंकर गव्याचा बंदोबस्त करून आमचे प्राण वाचवा.''

राजानं ताबडतोब भीमसेनाला बोलावून घेतले आणि गव्याच्या बंदोबस्ताची जबाबदारी त्याच्यावर सोपवली.

भीमसेन मनातून पुन्हा घाबरून गेला आणि घाईघाईने घरी येऊन त्याने ती हकीकत बोधिसत्वाला सांगितली. बोधिसत्वाने त्याला चित्त्याची जशी वाट लावली, तशीच गव्याचीही लाव, असा सल्ला दिला.

भीमसेनाने पुन्हा तेच नाटक केले आणि गव्याला ठार मारून राजाकडून प्रशंसेसह इनाम मिळविले.

लोकही आता भीमसेनाच्या पराक्रमाची स्तुती करू लागले होते. प्रशंसा करू लागले होते.

होता होता या प्रशंसेने भीमसेनाची सरळ बुद्धी वाकडी झाली. त्याला आपल्याच अंगच्या बहादुरीने चित्त्याचा आणि गव्याचा काटा आपणच काढला असे वाटू लागले होते. त्याची एक प्रकारची धुंदीच त्याला चढली होती !

त्या धुंदीत एकदा त्याने बोधिसत्वालाही तुच्छतेने सांगून टाकले की, ''यापुढे मला तुझ्या सल्ल्याची किंवा मार्गदर्शनाची गरज नाही.''



बोधिसत्व काही बोलला नाही. त्याला भीमसेनाला चढलेल्या खोट्या घमेंडीची चांगली जाण झाली होती. तो आपला निराळा झाला.

काही दिवसानंतर पुन्हा एक घटना घडली. शेजारच्या राजाने ब्रह्मदत्ताच्या राज्यावर हल्ला चढविला होता. लढाई जुंपली होती. राजाने भीमसेनाला आघाडीवर पाठविले होते. भीमसेन या कामगिरीने तर फारच घाबरून गेला होता. अशावेळी काय करावे, याचा सल्ला घ्यायला बोधिसत्व जवळ नव्हता. गोंधळलेल्या आणि घाबरलेल्या अवस्थेतच तो हत्तीवर बसून रणांगणात गेला.

भीमसेनाच्या मूर्खपणाची कल्पना असल्यामुळे बोधिसत्व लपत छपत त्याच्या मागोमाग जात राहिला. बुटकेपणामुळे गर्दीत तो कोणालाही दिसला नाही.

तेवढ्यात शत्रू सैन्याने गगनभेदी गर्जना करून हल्ला चढवला! त्या प्रचंड कोलाहलानेच घाबरून जाऊन भीमसेन हत्तीवरून खाली कोसळू लागला होता. तेवढ्यात बोधिसत्व त्याच्याजवळ गेला आणि त्याच्या कानात म्हणाला, "हत्तीवरून खाली येशील तर मरून जाशील. तुला पळूनही जाता येणार नाही. हत्तीवरच बसून राहा. मी तुला हत्तीवरच्या हौद्याशी बांधून टाकतो."

बोधिसत्वाने भीमसेनाला हत्तीवरच्या हौद्याशी बांधून टाकले. परंतु भयाने भीमसेन थरथर कापतच होता!

बोधिसत्व त्याला दटावित म्हणाला, "असा घाबरून पळ काढायला बघशील तर सगळीकडे तुझी नाचक्की होईल. ज्या राजाने तुझ्या पराक्रमाची प्रशंसा केली, बक्षिसी दिली, तो राजा तुझ्या तोंडावर थुंकायलाही कमी करणार नाही. म्हणून घाबरू नकोस. मी बरोबर आहे. तुला वाचवीन."

परंतु भीमसेन इतका घाबरून गेला होता की, गलितगात्र होऊन हौद्याशी बांधले असतानासुद्धा तो खाली कोसळला!

बोधिसत्वाने त्याला घरी जायला सांगितले आणि स्वतः सैन्याचे सेनापतित्व करू लागला. तो हत्तीवर स्वार झाला आणि शत्रूच्या सैन्यात घुसला. वीरश्रीने लढला. चातुर्याने सैन्याची व्यूहरचना करून शत्रू सैन्याची दाणादाण उडवून दिली.

आणि अखेरीस हल्लेखोर राजाला पकडून ब्रह्मदत्त राजापुढे उभे केले.

राजाने या लहानग्या माणसाचा हा महान पराक्रम पाहून बोधिसत्वाचा मोठा गौरव केला! आणि राजाला जेव्हा भीमसेनाच्या पराक्रमाच्या मागची बोधिसत्वाची शक्ती-युक्ती कळली, तेव्हा तर राजा त्याच्या कर्तृत्वावर फारच खूष होऊन गेला!

घमेंडखोर भीमसेनाला राजाने दरबारातून हुसकून लावले आणि बुद्धिमान बोधिसत्वाची त्याच्या जागी नियुक्ती केली.

बोधिसत्वाने या लाभलेल्या संधीचा लाभ घेऊन आपल्या बुद्धिबलाने आणि चातुर्याने देशाची उत्तम सेवा केली!

# कंजूष काकी !

बरीच वर्षं होऊन गेली. बंगालमध्ये कृष्णचंद्र रॉय या नावाचा एक राजा राज्य करीत होता. या राजाच्या दरबारात गोपाळ नावाचा एक भांड होता. भांड म्हणजे, संस्कृत नाटकात राजांच्या करमणुकीसाठी जसे विदूषक असत, तसेच हे भांड असत. भाटांप्रमाणेच राजांची स्तुती भांड करीत असत.विनोदी बोलून आणि वागून राजांना हसवीत असत. तर गोपाळ भांड हा असाच एक विनोदी, चतुर, हजरजबाबी, तल्लख बुद्धीचा, बिरबलचा भाऊ शोभेल असा इसम होता. त्याचीच ही एक मजेदार कथा.

राजा कृष्णचंद्र रॉय यांना एक चुलती होती – काकी ! ही काकी खूप श्रीमंत, महागब्बर होती. काकीजवळ खूप पैसा आणि दागदागिने होते. एका भल्या मोठ्या टोलेजंग हवेलीत काकी रहायची.

काकी तशी एकटीच होती. साठी उलटून गेलेली होती. पण चांगली खुटखुटीत होती. तरतरीत होती. काकींचे सोवळेओवळे फार. कुणाची सावलीदेखील तिला चालायची नाही, मग कुणाच्या हातचे पाणी कशाला घेईल ! रस्त्यावर पाणी टाकत टाकत उड्या मारीत ती चालायची. अशी ही राजाची काकी जुन्या-पुराण्या वळणाची.

शिवाय ही काकी एवढी मोठी संपत्ती जवळ असताना होती महाकंजूष ! फार फार चिक्कू !

काकीच्या हातून कुणाला काही मिळायचे नाही, कधी काही सुटायचे नाही. तिजोरीच्या किल्ल्या सदा काकीच्या कमरेला असायच्या.

राजा कृष्णचंद्र रॉय यांना काकीच्या कंजूषपणाचा राग होता. कारण तिच्या कंजूषपणाविषयीच्या अनेक कथा गावात पसरलेल्या होत्या आणि लोक त्या गमतीने चघळत असत. खो खो हसत असत. राजाची काकी म्हणजे गावच्या टवाळांच्या अड्ड्यावर एक गमतीनं हसण्याचा विषयच झाला होता. राजाच्या कानावर हे सगळे येत असे आणि मग त्यांना फार वाईट वाटायचे. दुःख व्हायचे. कारण किती झाले तरी ती त्यांची, म्हणजेच एका राज्याच्या राजाची काकी होती !

राजा कृष्णचंद्र रॉय हे स्वःत मोठे उदार होते. दानशूर होते. गुणांची कदर करून इनाम देणारे होते. त्यांचे घराणे हे उदार, गुणग्राहक प्रजाहितदक्ष म्हणून पूर्वीपासूनच ख्याती पावलेले होते. पण ही काकी मात्र आपल्या कंजूषपणाने राजघराण्याच्या इभ्रतीला बट्टा लावीत होती. राजांनी काकीला पुष्कळ सांगून

पाहिले. आणखी धन देतो म्हणाले. पण काकीचा स्वभाव काही बदलला नाही. चिक्कू तो चिक्कूच राहिला.

राजा कृष्णचंद्राच्या दरबारात असाच एक चिक्कू नाना – दयाराम होता. तोही या काकीसारखाच. पण या चिक्कूनानालाही गोपाळ भांडने एकदा अद्दल घडविली होती. राजांच्या सांगण्यावरूनच. म्हणून एकदा राजांच्या मनात आले की असाच धडा द्यावा आणि गंमत पहावी! अति झाले नि हसू आले! अशी अवस्था होतेच.

पण राजांना हेही ठाऊक होते की, काकी महावस्ताद आहे! ती अशी बधणार नाही! तरी-सुद्धा पाहू या. राजे तसे मिश्किल देखील होतेच. एकदा गोपाळ भांडला ते म्हणाले, "गोपाळ!"

"काय महाराज!"

"त्या चिक्कूनानाला तू बनवलंस तसं आपल्या काकीकडून काही पैसे म्हणा, दान म्हणा, काहीही काढून आणशील तर आपणही तुला तेवढेच इनाम देऊ!" राजांनी सांगितले.

गोपाळ काय तयारच! राजाचे हे आव्हान स्वीकारून तो म्हणाला, 'महाराज, ही तर फार सोपी गोष्ट आहे!"

"सोपी?"

"अगदी सोपी!"

"गोपाळ तुला आमची काकी कशी आहे ते माहिती नाही?"

"महाराज, तुमची कंजूष काकी मलाच काय, सगळ्या गावाला माहिती आहे काकींच्या गोष्टीही मला माहित आहेत. काकींची माझी चांगली ओळख देखील आहे!"

"ते मला ठाऊक आहे, पण काकी कडून ..."

'नक्की आणतो महाराज!' असे म्हणून गोपाळ उठला आणि तडक आपल्या घरी आला. आल्या आल्या त्याने सुकी मासळी काढली, थोडी तळली, पुरचुंडी करून खिशात ठेवली आणि सरळ काकीकडे गेला.

दुपारची बाराची वेळ. काकीची नुकतीच पुजाअर्चा, जपजाप्य झाले होते. तेवढ्यात 'काकी काकी' करीत गोपाळ टपकला. काकीला साष्टांग नमस्कार घातला.

'कोण गोपाळ? अरे, किती दिवसांनी आलास? कुठे गेला होतास इतके दिवस?' काकीने विचारले. गोपाळने सांगितले, 'कुठं नाही काकी. इथेच होतो. पण दरबारची कामे संपता संपत नाहीत. एक केलं की दुसरं, दुसरं केलं की तिसरं.... असं सारखं चालतं. अजूनही कामाचा मोठा ढीग पडलाय! रोज मनाशी घोकत होतो. काकींचं दर्शन झालं नाही अलीकडे. गेलं पाहिजे.... पण जमलंच नाही. जाऊ जाऊ म्हणत ढकलत राहिलो, पण दोनचार दिवसात चांगलंच शेकलं!' 'काय झालं रे गोपाळ?' काकीनं विचारलं.

'अहो, साध्या साध्या कामात चुका व्हायला लागल्या हातून.'

'असं??

'हां.'

'कशाने रे ?'

'ते आधी कळलंच नाही काकी. काल रात्री कळलं ?''

'म्हणजे ? काल रात्री काय झालं गोपाळ ?' काकीनी उत्सुकतेनं विचारलं. गोपाळ काकींची ही उत्सुकता अधिकाधिक ताणत म्हणाला, 'काकी, काल तर दिवसभर माझ्या हातून चुकाच चुका झाल्या. जे करायला जावं, त्यात चूक ! यात चूक, त्यात चूक. असं केलं तरी चूक... तसं केलं तरी चूक... आताएक साधं काम. साधं म्हणजे अगदीच साधं हो. फडतूस म्हणा ना. फडतूस म्हणजे किती फडतूस काकी ? अगदीच फडतूस ! त्या फडतूसपणाला काही सुमार ! छ्या फारच फडतूस –'

'अरे, पण रात्री काय झालं ते सांग की गोपाळ' काकीची उत्सुकता आता चांगलीच ताणली गेली होती. गोपाळनं हे हेरलं. तो म्हणाला, 'हां तर काकी, त्या फडतूस कामातल्या चुकीबद्दल राजांनी माझे कान उपटले.'

'असं ?'

'हा. खूप बोलले.... रागावले, रात्री घरी आलो. वाईट वाटतच होतं. असं का व्हावं कळत नव्हतं. असं का व्हावं ?.... अस का व्हावं ?... असं मनाशी घोकत घोकतच झोपी गेलो आणि काय सांगू काकी –'

'काय रे ?'

'साक्षात भगवान शंकराचा नंदी पुढे आला. माझ्यावर दोन्ही टोकदार शिंगे रोखून म्हणाला, 'असं का व्हावं म्हणून घोकतोस, पण काकीकडं गेलास का अलीकडं दर्शनाला ? त्या पुण्यवान साध्वीच्या दर्शनाला जात नाहीस, मग अशा चुका होणार नाहीत का ? – माझ्या डोक्यात लख्ख प्रकाश पडला ! मी म्हणालो, 'नंदी देवा, चुकलो क्षमा करा'

त्यावर नंदी म्हणाला, 'क्षमा माग काकींची. चूक कबूल कर. काकी प्रेमळ आहेत. गंगाजळासारखं निर्मळ मन आहे त्यांचं. हिमालयासारखी शांती व आभाळासारखे मोठे मन आहे काकींजवळ, तर तू जा, उद्याच जा, वेळ घालवू नकोस. त्यांचा उष्टा प्रसाद भक्षण कर म्हणजे सर्व ठीक होईल.'

'असं म्हणाला नंदी माझ्याबद्दल ?'

'होय काकी होय. मला क्षमा करा. उष्टा प्रसाद द्या !'

पुन्हा एकदा साष्टांग दंडवत घालत गोपाळ गयावया करत म्हणाला.

काकी आता गोपाळने केलेल्या स्तुतीनं चांगलीच टम्म फुगली होती ! गोपाळला उठवीत प्रेमळपणानं ती म्हणाली, 'उठ गोपाळ, उठ बाळ ! मी क्षमा केली आहे तुला.'

'पण प्रसाद ?'

'देते तर ! रोज माझं मीच करते. पण आज आचाऱ्याला सांगते बनवायला.'

थोड्या वेळाने भले मोठे ताट वाढून आले. काकी म्हणाली, 'गोपाळ, बैस बघू जेवायला.'

'नाही काकी, तुम्ही जेवा आधी. मग त्याच तुमच्या ताटात प्रसाद म्हणून जेवण

करीन. नंदीनं सांगितलंय तसं. नाही तर कोप होईल.' 'बरं बरं' एवढ्या मोठेपणानं सुखावलेली काकी जेवायला बसली. थोडं जेवली आणि मग उठून गोपाळला म्हणाली 'हं आता जेव बरं गोपाळ' गोपाळ काकीच्याच पानावर बसला. हळूच तळलेली मासळी पुरचुंडीतून काढली व काकी हात धुवून येईतोवर आमटीत टाकली. काकी आली तशी आमटीत हात बूडवून खोटाच भुरका घेत गोपाळ म्हणाला, 'वा! काय काकीच्या प्रसादाची आमटी आहे! वाहवा रे वाहव्वा!'

'आहे ना चांगली आमटी गोपाळ? आवडली ना तुला?' काकीनं शेजारी बसत विचारलं.

गोपाळ म्हणाला 'काकी मासळीची आमटी आवडतेच मला. झकास झाली आहे की मासळीची आमटी. वाहवा!'

'मासळीची आमटी?' काकीनं चमकून विचारलं.

'हाँ, ही काय, आताचं तुम्ही खाल्ली ना काकी?'

'गोपाळ काय बोलतोयस तू? मी काय मासळी खाते? काकींनी रागानेच विचारले.

गोपाळने आमटीच्या वाटीतून मासळी काढून दाखवीत म्हटले, 'काकी, मी कशाला खोटं बोलू? ही पहा मासळी! आहे ना तुमच्याच आमटीतली?'

काकी मासळी पाहून चपापली! खरंच मासळी होती! आणि ती आमटी काकीनं खाल्ली होती! ... आता हे जर सगळीकडं कळलं तर, छी: थू होणार! नावाला बट्टा लागणार! सोवळ्याची थट्टा होणार!.. काकी खूपच घाबरली.

मग हळूच हलक्या आवाजात गोपाळला म्हणाली, 'गोपाळ!'

'काय काकी?'

'हे कुणाजवळ बोलू नकोस!'

'पण काकी, राजांनी विचारलं तर काकींनी काय दिलं? तर काय सांगू? खोटं बोलू?'

काकी तशी फार हुशार होती. तिला माहिती होतं की, हे लपवायचं तर कंजूषपणा उपयोगी नाही. दाम मोजला की काम होतं.

काकीनं घरात जाऊन तिजोरीतून एक हजार रुपयांची थैली आणली आणि गोपाळच्या हाती देत म्हणाली, 'ही घे थैली! हजार रुपये आहेत. आता तर नाही ना बोलणार कुठं? गोपाळ, कुठं बोलू नकोस. माझी अब्रू वाचव.'

'नाही काकी, मुळीच बोलणार नाही. राजांनी विचारलं तर दुसरंच सांगेन त्यांना' गोपाळ म्हणाला आणि हजाराची थैली घेऊन राजाकडं आला, म्हणाला, 'हे काकींचे हजार रुपये!'

'काकींचे हजार रुपये!' मोठ्या आश्चर्याने राजाने विचारले.

गोपाळने सर्व घडले तसे सांगितले. राजा कृष्णचंद्र रॉय गोपाळच्या युक्तीवर खूश झाले. ठरल्याप्रमाणे त्यांनीही गोपाळला हजार रुपये इनाम दिले!

❋ ❋ ❋

# अद्दल !

राजा कृष्णदेवराव यांच्या विजयनगर नावाच्या राजधानीत मोतीचंद नावाचा एक शेठजी राहात होता. या शेठजीचा धंदा सावकारीचा होता. तो एक कुप्रसिद्ध सावकार होता. गोरगरीब, अडलेले नडलेले, अशा लोकांना तो कर्ज द्यायचा आणि त्यावर भरमसाट व्याज उकळायचा, तो फार फार लोभी होता. पैशाचा लालची होता. एखाद्यानं शंभर रुपये कर्ज घेतलं तर तो त्यातले महिन्याचे व्याजाचे पंचवीस रुपये आधीच कापून घ्यायचा आणि पंच्याहत्तर रुपये कर्जवाल्याच्या हातावर ठेवायचा! कनिष्ट वर्गातील गरजू लोकांचं तो अशा प्रकारानं रक्त शोषून घ्यायचा.

पैशानं तो इतका माजलेलाही होता की, कर्जदारांना तो उर्मटपणे वाटेल तसं बोलायचा. दमदाटी करायचा. एखादा गरीब जर व्याज कमी करण्यासाठी हातापाया पडून विनंती करू लागला तर मोतीचंद शेठ त्याला म्हणायचा, "अरे, तुम्ही लोक माझ्याकडून पैसा घेता, बीबियाणं खरेदी करता, शेतात पेरता, एक शेर पेरलं तर शंभर शेर पीक घेता! माझ्याकडून पैसे घेता, शेळ्यामेंढ्या, गायी, म्हशी विकत घेता, त्यांचं दूधतूप खाता आणि त्यांची करडं व वासरं तुम्हीच वाढवता! मग माझं व्याज द्यायला का रडता? मुदलाच्या रुपानं मीही पैसे पेरतो आणि व्याजाच्या रुपानं पीक घेतो!"

मोतीचंद शेठजीच्या असल्या बोलण्यावर अडलेले लोक तरी काय बोलणार? त्यांना गरज असायची. कुरकुरत का होईना, त्याच्याकडून कर्जाऊ पैसे घेत असत. वेळ भागवीत असत. काहीजण पोटाला चिमटा घेऊन अमानुष व्याज फेडत असत. पण काही जणांचं तारण ठेवलेलं शेत किंवा घर बहुधा मोतीरामच्याच घशात जात असे.

होता होता मोतीरामच्या या लोभीपणाच्या व क्रूर शोषणाच्या गोष्टी तेनालीरामच्या कानावर गेल्या. ते ऐकून तेनालीरामचं अंतःकरण गरिबांच्या सहानुभूतीनं पाझरलं! तो चतुर होता. त्यानं मोतीचंद शेठला धडा शिकवायचं ठरवलं.

सावजी नावाचा एक बऱ्यापैकी शेतकरी तेनालीरामच्या पठडीतला होता. सावजी अधूनमधून शेतीच्या कामासाठी मोतीचंदकडून कर्ज घ्यायचा. तेनालीरामनं या सावजीला गाठलं आणि सांगितलं, "हे बघ, त्या तुझ्या दुष्ट सावकाराला मी चांगली अद्दल घडवायचं ठरवलं आहे! तू मला या कामी मदत केली पाहिजेस. तूसुद्धा त्या लोभी माणसाकडून

लुबाडला गेलेला आहेस. हालात, कष्टात दिवस काढून तू त्याची तुंबडी भरलेली आहेस. कितीतरी लोकांना त्यानं असं लुबाडलं आहे. कितीतरी जणांचे संसार त्यानं आपल्या लोभापायी धुळीत मिळवले आहेत. तर आता त्याला चांगली अद्दल घडवलीच पाहिजे! जन्मभर लक्षात राहील, असा धडा शिकवलाच पाहिजे! याकामी तू मदत केलीच पाहिजे. कारण तुझ्यावर त्याचा तसा विश्वास आहे. आज अनेक वर्षं तुझा आणि त्याचा देण्या-घेण्याचा व्यवहार आहे.''

सावजी म्हणाला, ''मला कबूल आहे. माझ्याही मनात त्या हावरट शेठजीला एकदा तरी धक्का द्यावा असं आहे. पण मी काय करू शकतो हे तुम्हीच सांगा, होईल ती मदत करायला मी तयार आहे.''

तेनालीरामनं सावजीला सांगितलं, ''हे बघ, तू उद्या मोतीचंदकडे जायचं. मुलाचं लग्न ठरलं आहे आणि त्यासाठी मोठमोठी भांडीकुंडी पाहिजे आहेत, असं सांगून त्याच्याकडली मोठाली भांडी घेऊन यायची. त्याचं भांडं कबूल करायचं. मग पुढं सांगतो....''

सावजी दुसरे दिवशी मोतीचंद शेठकडं गेला. तेनालीरामनं सांगितल्याप्रमाणं मुलाच्या लग्नाचा बहाणा केला आणि लग्नाच्या जेवणावळीसाठी शेठजीकडील मोठमोठी भांडीकुंडी मागितली. रीतसर भाडं द्यायचं कबूल केलं.

मोतीचंद म्हणाला, ''अरे सावजी, तुझ्या पोराची शादी म्हणजे आमच्याच घरचं कार्य! त्यासाठी जरूर भांडी घेऊन जा! तुझा आमचा व्यवहार फार जुना आहे. भांड्यांच्या भाड्याचा काही वांदा येणार नाही. भांडी घेऊन जा.''

सावजीनं मोतीचंदशेठकडून तांब्याची आणि पितळेची हंडा, पातेली, घागरी अशी मोठाली भांडी आणली.

चार दिवस झाल्यावर तेनालीराम सावजीला म्हणाला, ''आता असं कर या सगळ्या मोठया भांड्यातून आपलीच काही लहान लहान भांडी घाल आणि ती सगळी मोतीचंदला नेऊन दे!''

सावजी म्हणाला, ''भले! म्हणजे त्याच्या भांडयाबरोबर आपलीच भांडी जायची!''

''जाऊ दे! माझं ऐक! भांडी देताना मोतीचंदला तू असं सांगायचं की शेठजी, तुमच्याकडून तुमची भांडी नेताना ती गरभारशी असली पाहिजेत; कारण चार दिवसात त्यांना ही लहान लहान पिलं झाली आहेत. ही त्यांची पिलं तुमचीच आहेत, म्हणून ती त्यांच्याबरोबर परत करीत आहे!''

तेनालीरामनं पढवल्याप्रमाणं सावजी मोतीचंदकडं गेला आणि त्याच्या मोठ्या भांड्यातून भरलेली लहान लहान भांडी त्याच्यापुढं ठेवून तेनालीरामनं शिकवल्याप्रमाणं बोलला!

त्याचं बोलणं ऐकून मोतीराम पहिल्यांदा चकित झाला! पण मग त्याच्या लक्षात आलं की, सावजी हा एक भोळाभाळा आणि खुळा माणूस आहे! तर ही संधी उगाच शहाणपण

चालवून घालवू नये. तो म्हणाला, ‘‘सावजी! अरे, हो रे हो! तुला भांडी देताना ते सांगायचं विसरूनच गेलो होतो. बरं झालं, तू विसरला नाहीस. तुझ्या लक्षात आलं, तू तसा फार प्रामाणिक माणूस आहेस. म्हणूनच माझा तुझ्यावर विश्वास आहे, मी तुझ्याकडं व्यालेली ही माझी मोठी भांडी आणि त्यांची ही लहान लहान पिलं ठेवून घेतो. आणि लक्षात ठेव, काही लागलं सवरलं तर जरूर मागायला ये. संकोच करू नको!’’

मग काही दिवस गेल्यावर तेनालीरामानंच पुन्हा पढवल्याप्रमाणं सावजी एकदा मोतीचंद शेठजीकडं गेला आणि म्हणाला, ‘‘शेठजी, मुलाचं लग्न झालं, आता मुलीचं लग्न ठरलं आहे. यावेळी चांदीची भांडी लागणार!’’ मोतीचंद म्हणाला, ‘‘अरे लागणार तर घेऊन जा! काय काय पाहिजे बोल!’’

सावजीनं चांदीच्या मोठमोठया भांड्यांची यादी दिली. त्याप्रमाणं मोतीचंदनं ती भांडी सावजीला काढून दिली. सावजी ती घरी घेऊन आला. मोतीचंद मनातून खूष झाला होता. त्यानं भांडी देतानाच यावेळी सावजीला सांगून ठेवलं होतं, ‘‘बघ रे बाबा सावजी, चांदीची भांडी देत आहे, पण ही देखील तशीच गरभार आहेत! तुझ्याकडं बाळंत होतील. पिलांच्यासह ती आणून दे म्हणजे झालं!’’

भांडी आणली, त्याला आठ दहा दिवस होऊन गेले. मोतीचंद आधाशीपणानं व्यालेल्या छोट्या भांड्यासह मोठ्या भांड्यांची वाट बघत होता.

दरम्यान तेनालीरामनं सावजीला पढवून ठेवलं होतं की, जर मोतीचंद चांदीची भांडी मागायला आला तर त्याला दुःखी कष्टी झाल्याचा बहाणा करून सांगायचं की, ‘‘शेठजी, फार



वाईट झालं, तुमची भांडी आणली खरी, पण ती माझ्याकडं व्याली तेव्हाच पिलांसह मरून गेली! आता ती कशी परत देणार? मेलेली भांडी मी कुठून आणणार? क्षमा करा. फार वाईट झालं!''

आणि पुढं घडलंही तसंच! वाट बघून बघून दहा बारा दिवसांनी हावरट मोतीचंद सावजीच्या घरी आला आणि आपली भांडी मागू लागला. तेव्हा सावजीनं देखील तेनालीरामनं शिकवल्याप्रमाणं दुःखी कष्टी होऊन सगळं नाटक बरोबर वठवलं!

'भांडी मेली' हे ऐकून मोतीचंदला धक्काच बसला! तो सावजीला वाटेल तसं बोलू लागला आणि शेवटी आपली फिर्याद राजा कृष्णदेवराव यांच्याकडं घेऊन गेला.

राजांचा दरबार भरलेला होता. मोतीचंदशेठजी आणि सावजी दोघांनाही बोलावलेलं होतं. राजांनी मोतीचंदला आपली फिर्याद पहिल्यापासून सविस्तर मांडण्यास सांगितली. मोतीचंदनं आपली फिर्याद मांडली. त्यावर राजांनी सावजीला विचारलं, ''तुला हे मान्य आहे का?'' सावजी म्हणाला, ''होय महाराज, मागच्यावेळी शेठजींची भांडी माझ्याकडं व्याली म्हणून ती मी त्यांच्या पिलांसह त्यांच्याकडं पोचती केली. यावेळी त्यांची चांदीची भांडी माझ्याकडं व्याली तेव्हाच मरून गेली! मेलेली भांडी मी कशी परत करणार? ती आता देवाघरी गेली!''

राजा कृष्णदेवराय यांनी रागारागानंच विचारलं, ''सावजी, भांडी कशी मेली? भांडी का मरतात?''

हे ऐकताच तेनालीराम उठून राजांना म्हणाला, ''महाराज, भांडी जर बाळंत होतात आणि जर त्यांना पिलं होतात आणि जर ती मोतीचंद ठेवून घेतो, तर भांडी बाळंत होताना मरणार कशी नाहीत? प्रसूतीच्यावेळी काही अपघात होतो. बाळबाळंतीण मृत्यू पावतात.''

तेनालीरामचा युक्तीवाद ऐकून राजांच्या डोक्यात प्रकाश पडला! या प्रकारामागं तेनालीरामचं डोकं आहे, हेही त्यांनी जाणलं. लोभी मोतीचंशेठजींना अशी एकदा अद्दल घडवायला पाहिजे होतीच, हे ओळखून त्यांनीही शेठजीला धमकावलं आणि दरबारातून घालवून दिलं.

* * *



# माणसाची किंमत

एक होता राजा. एक होती राणी. राजाचं राज्य भलं मोठं होतं, दूरवर पसरलेलं होतं. राज्यात आबादी आबाद होती. सुख-समृद्धी नांदत होती. राजा मोठा शूर-वीर होता. तसाच न्यायप्रिय देखील होता. न्यायासाठी तो तत्पर असे. न्यायापुढं तो कुणाची पर्वा करीत नसे. न्यायासाठी तो धोकादेखील पत्करीत असे. अन्यायाने कधी वागत नसे.

राजाच्या ह्या न्यायप्रियतेची ख्याती दूरवर पसरली होती.

राजाच्या ह्या गुणांची परीक्षा पाहाण्यासाठी इंद्राने एकदा एक युक्ती केली. कारण इंद्रही मनातून घाबरला होता. राजाच्या न्यायप्रियतेमुळे आपल्या सिंहासनाला धोका पोहोचू नये असे त्याला वाटू लागले होते. म्हणून इंद्राने माणसाची तीन शिरे राजाकडे धाडली आणि कळविले की, राजाने न्यायीपणाने जर ह्यांचे 'उचित मूल्य' सांगितले तर त्याच्या राज्यात सगळीकडे सुवर्णाचा पाऊस पडेल आणि जर का त्याला उचित मूल्य सांगता आले नाही तर त्याच्या राज्यावर वीज कोसळेल. भयंकर मानवी संहार होईल!

ती तीन मानवी शिरे आणि इंद्राचा हा निरोप मिळाल्यावर राजानं आपल्या दरबारातल्या पंडितांना पाचारण केलं. राजाच्या दरबारात मोठमोठे विद्वान, पंडित, पारखी, व्यासंगी असे गुणवान लोक होते. दरभार भरल्यावर राजाने ती तीन मानवी शिरे दाखवून त्यांना आवाहन केले की, 'आपण या तीन शिरांची उचित मूल्यं सांगावीत!'

विद्वान पंडितांनी, जाणत्यांनी त्या तीन शिरांकडे पुष्कळ न्याहाळून पाहिले. बारकाईने पारखण्याचा प्रयत्न केला पण त्यांना त्यांचे उचित मूल्य काही सांगता येईना. कारण शिरे तीन होती तरी त्यांच्यात विलक्षण असे साम्य होते. ती एकसारखीच दिसत होती. दिसण्यात त्यांच्यामध्ये लेशभरही फरक नव्हता. एकाच माणसाची ती असावीत असे दिसत होते. त्यामुळे सगळेच पंडित गोंधळून गेले होते. कशातच कमी-जास्त नसल्यामुळे त्यांना डावे-उजवे असे काही ठरवताच येत नव्हते. कसलाच निर्णय ते करू शकत नव्हते. म्हणून ते सगळे मौन पाळून गप्प बसले. दरबारात गंभीर शांतता पसरली होती. एकमेक एकमेकांच्या तोंडाकडे नुसते पाहात होते. राजाला नवल वाटले! विद्वान-पंडितांनी ही अवस्था पाहून राजाच्या मनातही चिंता उत्पन्न झाली. कुणीच काही बोलत नाही, कुणीच काही

सांगत नाही असे पाहून राजानं आपल्या पुरोहिताला बोलावून सांगितले की, ''आजपासून तीन दिवस मी तुम्हाला विचार करण्यासाठी मुदत देत आहे. या अवधीत जो कोणी या तीन शिरांचे उचित मूल्य सांगेल त्याला मोठे इनाम दिले जाईल. नाहीतर जबर शिक्षा ठोठावली जाईल.''

दोन दिवस उलटून गेले. विचार कर करून पुरोहित थकून गेला. पण त्याला काहीच निर्णय करता येईना. तिसरा दिवस उजाडला आणि तो घाबरून गेला. शिक्षेच्या भयानं व्याकुळ झाला. खाणे - पिणे देखील त्याने सोडून दिले. तोंडावरून पांघरूण घेऊन तो चिंता करीत पडून राहिला. बराच वेळ झाला तेव्हा त्याची पत्नी त्याच्याकडे येऊन म्हणाली, ''अहो उठा, असं किती वेळ झोपून राहाता. झालंय तरी काय तुम्हाला ? असे घाबरल्यासारखे काय दिसता ?'

पुरोहिताने आपल्या पत्नीला आपल्यावर आलेल्या आपत्तीची हकीकत सांगितली. म्हणाला, ''काय करावं कळत नाही. राजा मला कदाचित फाशीसुद्धा देईल.''

हे ऐकताच पुरोहितापेक्षा त्याची पत्नीच अधिक घाबरून गेली. काय करावे हे तिलाही कळेनासे झाले. ती शोक करू लागली. दुःख करू लागली. तिला वाटले. उद्या आपल्या नवऱ्याला फाशी होण्याच्या आधी आपणच का मरून जाऊ नये ? नवऱ्याचा मृत्यु पाहाण्यापेक्षा हे बरे. ती जीव देण्याच्या तयारीने गावाबाहेरच्या तलावावर आली आणि तिथं बसून रडू लागली.

त्याचवेळी पार्वती शंकराला म्हणाली की, ''एका सतीवर संकट आले आहे. आपण काहीतरी केले पाहिजे.''

भगवान शंकर म्हणाले, ''हा संसार आहे. इथं हे असं घडतच राहाणार. तू कुणाकुणाची चिंता करणार ?''

पण पार्वतीने ऐकले नाही. ती म्हणाली, ''नाही. काही ना नाही उपाय केलाच पाहिजे.''

'तर मग ठीक आहे. चल.'

शंकर आणि पार्वती या दोघांनी मग लांडगा - लांडगिणीचा वेष परिधान केला. तळ्याच्या काठी आले. जीव देण्यासाठी तयार झालेल्या पुरोहिताच्या पत्नीने कुणीतरी जोरजोराने हसताना ऐकलं. लांडगा वेड्यासारखं हसत होता. लांडगीण त्याला म्हणाली,

''तुम्हाला काय वेड लागलंय हसायला ? कशासाठी एवढं हसू येतंय तुम्हाला ?''

लांडगा म्हणाला, ''अगं, तुला ठाऊक नाही ? आता आपल्याला खूप खायला मिळणार आहे. पुष्कळ खाऊ आणि मोठे ताजेतवाने होऊ.''

लांडगीण म्हणाली, ''काय सांगता ? मला तर काहीच कळत नाही. सरळ सांगा बघू.''

मग लांडग्यानं लांडगिणीला त्या शिरांची सगळी हकिकत सांगितली. आणि म्हणाला, ''त्या तीन शिरांचे उचित मूल्य कुणालाच सांगता येणार नाही. त्यामुळे राज्यावर संकट

कोसळेल आणि पुष्कळ माणसं मरतील. मग आपल्याला खूप खायला मिळेल ...' लांडगा पुन्हा जोरजोराने हसू लागला.

लांडगिणीने त्याला विचारले, "तुम्हाला तरी ते ठाऊक आहे काय?"

"हो. पण मी सांगणार नाही."

"का?"

"ते कुणी ऐकलं तर?"

"अशा रात्रीच्या वेळी इथं कोण आहे ऐकायला?"

"मग ऐकच! त्या तीन शिरांमध्ये एक शिर असे आहे की, सोन्याची सळई त्याच्या कानात घालून फिरवली, हलवली तरी नाका-तोंडातून बाहेर येत नाही. त्याचे मूल्य अमूल्य आहे. दुसऱ्या शिराच्या कानात सोन्याची सळई घालून फिरवली तर ती त्याच्या तोंडातून बाहेर येईल. म्हणून त्याचे मूल्य दहा हजार रुपये आहे. आणि तिसऱ्या शिराच्या कानात सळई घालून फिरवली तर तोंड, नाक, डाळ सगळ्यांतूनच बाहेर येईल म्हणून त्याचे मूल्य दोन दिडक्या आहे..."

पुरोहिताच्या बायकोनं हे सर्व हळूच लपून ऐकलं होतं, नवऱ्याला वाचविण्याचा उपाय तिला कळला होता. म्हणून ती गुपचुप घरी परत फिरली.

ती घरी आली, तेव्हा ती हसतमुख व आनंदात होती. पुरोहित मात्र काळजीनं खंगून गेला होता. पत्नीने येऊन त्याला उठवले आणि म्हणाली, "असं काळजी करीत काय बसलात? चला उठा. उगाच काळजी करू नका. मी सांगते त्या शिरांची उचित मूल्यं."

तेवढ्यात राजाचा शिपाई बोलावण्यास आला. पुरोहित दरबारात गेला. जाण्यापूर्वी आपल्या पत्नीकडून त्याने सगळे ऐकून घेतले होते.



दरबारात गेल्यावर पुरोहिताने ती तीन शिरे इकडून तिकडून उलट सुलट करून पाहिली. आणि सांगितले एक सोन्याची सळई मागवा. ताबडतोब सोन्याची सळई आली. मग त्याने एक शिर हातात घेऊन त्याच्या कानात ती सळई घातली. चोहोबाजूंनी ती फिरवली, पण ती कुठूनच बाहेर आली नाही. पुरोहित म्हणाला, "हा माणूस फार गंभीर आहे. याचे मूल्य अमूल्य आहे."

मग त्यानं दुसऱ्याच्या कानात सळई घालून फिरवली तर ती तोंडातून बाहेर आली. पुरोहित म्हणाला, "हा माणूस कानाचा हलका आहे. जो कानाने ऐकतो ते तोंडाने बोलून टाकतो. याचे मूल्य दहा हजार रुपये आहे."

मग त्याने तिसऱ्याच्या कानात सळई घातली आणि हलवली. तर ती तोंड, नाक, डोळे सगळीकडून बाहेर आली. पुरोहित म्हणाला, "महाराज, हा माणूस कसल्याच कामाचा नाही. याचे मूल्य फक्त दोन दिडक्याच आहे."

पुरोहितांचे उत्तर ऐकून राजा खूष झाला. त्याने त्याला मोठे इनाम दिले आणि इंद्राला हे सगळे कळवले. इंद्रही प्रसन्न झाला आणि त्याने त्या राज्यावर सुवर्णांचा पाऊस पाडला. राजा - प्रजा आनंदी झाले!

***



# संगत

एक घनदाट अरण्य होतं. त्या अरण्यात सिंह, वाघ, अस्वल, चित्ता, लांडगा, कोल्हा, हरिण - असे बरेच प्राणी वसतीला होते. सिंह तर वनाचा राजा! वनराज! केसरी! सिंहाचा दरारा सगळ्या अरण्यावर चालत असे. त्यातून गोष्टीतला सिंह तर एकदम तरणाबांड होता. बलशाली होता. त्याची आयाळ भरगच्च होती आणि त्याची गंर्जना घनघोर होती! सगळे प्राणी या सिंहाला दबकून-वचकून-भिवून वागत असत. शिकारीसाठी हा गुहेतून बाहेर पडला की, सगळं जंगल चिडीचूप होऊन जात असे. जो तो प्राणी आपला जीव वाचवण्यासाठी लपून छपून बसत असे.

पण याच अरण्यात असा एक लांडगा होता की जो भलताच लुच्चा होता! वस्ताद होता! एकदा या लुच्च्या लांडग्याच्या मनात आलं की, 'रोज रोज उठायचं आणि जीव वाचवीत शिकारीसाठी धावायचं, हा काय त्रास आहे? बरं, रोजरोज शिकार मिळतेच असंही नाही. कधी मिळते, कधी मिळत नाही. दोन दोन दिवस मिळत नाही. अशावेळी उपास काढावे लागतात. भुकेनं जीव व्याकूळ होतो. हा त्रास, ही दगदग आणि ही उपासमार थांबलीच पाहिजे, काय करावं बरं? ...' विचार करता करता लुच्च्या लांडग्याला एक लुच्चेगिरी सुचली. त्यानं ठरवलं की तरण्याबांड वनराजाशी संधान जुळवायचं. अर्थात यात धोकाही तसाच मोठा होता, जबरदस्त होता. प्राणही गमवावा लागला असता. पण लुच्च्या लांडग्याला हे देखील ठाऊक होतं की, स्तुतीनं भले भले म्हणवणारे थोर मोठेदेखील पाघळतात. स्तुती केली तर देवदेखील वश होतो. माणसं तर फुगून जातात. मग या वनराजाचा काय पाड!

एके दिवशी तरण्याबांड वनराजाच्या गुहेजवळ लुच्चा लांडगा टेहळणी करीत थांबला. शिकारीसाठी गुहेतून वनराज बाहेर पडला, तशी लुच्चा लांडगा धावत धावत जाऊन त्याच्या पायाशी लोळू लागला. लोटांगण घालू लागला. केविलवाणेपणानं म्हणू लागला, "महाराज, दया करा! कृपा करा! या दासाला जवळ करा! पदरात घ्या!"

वनराजानं गुरकावत विचारलं, "काय रे लांडग्या, काय म्हणतोस?"

लांडग्यानं अजीजीनं सांगितलं, "महाराज मी असा दीनदुबळा आहे. आपण महाबलशाली आणि प्रतापी आहात, या जंगलाचे अधिपती आहात. माझ्या मनी अशी इच्छा उत्पन्न झाली आहे की, आपल्यासारख्या शूर राजाची आपण

जन्मभर सेवा करावी आणि आयुष्याचं सार्थक करावं! बास. महाराज या दासाचं दुसरं काही मागणं नाही. आपल्या सेवेची संधी फक्त द्यावी."

तरुण वनराज लांडग्याच्या स्तुतीनं, अर्थातच भाळून गेला. म्हणाला, "बरं-बरं, माझ्याबरोबर राहात जा. माझी कामं करत जा."

त्यावेळेपासून लुच्चा लांडगा तरुण वनराजाच्या बरोबर राहू लागला. त्याच्या मागंमागं फिरू लागला. तो गुहेत असताना हा बाहेर पहारा देऊ लागला. अधूनमधून वनराजाची तोंड फाटेपर्यंत स्तुतीस्तोत्रंही गाऊ लागला.

भूक लागली म्हणजे वनराज बाहेर पडायचा. एखाद्या जनावरावर झडप घालून तो पोटभर खायचा आणि उरलं सुरलेलं लांडग्याला द्यायचा. तेवढयानं लांडग्याचं पोट भरायचं. कधी थोडं कमी पडलं तरी तो निभावून न्यायचा. मनाशी म्हणायचा, 'एवढं आयतं खायला मिळतं आहे, हे काय थोडं झालं? हा म्हणे वनराज! पण शिकार त्यालाच करावी लागते. शिकारीसाठी धावपळ त्याचीच होते. मला मात्र त्याच्या शिकारीतलं काहीच खटपट न करता खायला मिळतं.'

गोड बोलून बोलून आणि खुशमस्करी करून लुच्चा लांडग्यानं तरुण वनराजांचा जवळजवळ कबजाच घेतला होता. सिंहासारखा सिंह! राजा! पण अरण्यातल्या एका हलक्या लांडग्याचा मांडलिक बनल्यासारखा झाला होता. लांडगा सांगेल तसंच सिंह वागायचा.

एकदा तरुण वनराजानं लुच्या लांडग्याला आपल्याबरोबर घरी नेलं. त्याच्या जुन्या पुराण्या गुहेच्या घरात तरुण वनराजाचे म्हातारे आई-बाप राहात होते, म्हातारे झाले तरी सिंह तो सिंहच आणि सिंहिण ती सिंहिणच! मुलगा भेटल्याचा त्यांना आनंद झाला, पण लांडग्याचं लोढणं बघून त्यांना राग आला. तशात तरुण वनराज त्या लांडग्याची बरीच चहादारी करताना पाहून तर त्या दोघांना संतापच आला. पण दोघंही उघडपणानं लांडग्याच्यादेखत काही बोलले नाहीत. म्हाताऱ्या सिंहाला तर पंजाच्या एका फटक्यातच लांडग्याला लोळवण्याची इच्छा झाली होती, पण त्यानं तसं काही केलं नाही.विचारपूस केल्यावर आणि इकडील तिकडील बोलणी झाल्यावर तरुण वनराज आपल्या गुहेकडं जायला निघाला. लांडगाही त्याच्यामागं निघाला. दोघं काही पावलं चालून गेल्यावर म्हाताऱ्या सिंहानं तरुण वनराजाला हाक मारून परत बोलावलं. लांडग्याला तिथंच उभं करून तरुण वनराज गुहेत गेला. विचारलं, "काय बाबा? काय आई? काही पाहिजे का?.."

म्हातारा सिंह म्हणाला, "आम्हाला काहीही नको आहे."

"मला का बोलावलं?" वनराजानं विचारलं.

म्हातारी सिंहीण म्हणाली अरे, तो फतुरडा लांडगा कशासाठी तुझ्याबरोबर हिंडतो आहे?"

म्हातारा सिंह तक्रारीच्या सुरात गुरगुरला, ''जंगलातल्या बऱ्याच जणांकडून मी याबद्दल ऐकलं होतं. तू म्हणे या लांडग्याबरोबर सारखा फिरत असतोस? आणि लांडगा म्हणे तुझ्याजवळच राहतो?

''अरे पोरा! लांडग्याची जात फार लबाड असते. लबाडापासून सतत सावध असावं. लबाडांना पन्नास पावलं लांब ठेवावं.''

सिंहीणीनं सांगितलं. ''अरे, आपण जन्मानं सिंह! जंगलचे राजे! राजानं आपल्याच दिमाखात राहिलं पाहिजे. आपल्या बरोबरीच्या जनावरांशीच जवळीक ठेवली पाहिजे. तरच आपला मान राहतो आणि भलं होतं. हलक्या आणि वाईट लबाडांची संगत ठेवल्यानं आपला दरारा तर कमी होतोच, शिवाय धोकाही होण्याचा संभव असतो. तेव्हा सावध राहा. या लांडग्याला हाकलून दे, नाहीतर त्याचा घास करून टाक!'' म्हाताऱ्या सिंहानं आपल्या तरुण मुलाला उपदेश केला. पण हा उपदेश तरुण वनराजाला पटला नाही. त्याच्या मनावर लुच्चा लांडग्यानं आपली चांगलीच पकड बसवलेली होती. वनराज म्हणाला, ''बाबा! आई! तुम्ही म्हणता ते खरं असलं, तरी ते या माझ्या मित्राच्या बाबतीत मात्र खरं नाही. हा लांडगा इतर लांडग्यासारखा नसून फार फार चांगला आणि सज्जन लांडगा आहे. मी त्याची मैत्री सोडणार नाही. मित्रघात करणार नाही.

तुझी मर्जी! पण सांभाळून राहा!'' म्हाताऱ्या सिंहानं आणि सिंहिणीनं अखेरचं बजावलं.



तरुण वनराज आणि लुच्चा लांडगा नेहमीसारखंच वागत होते. हिंडत - फिरत होते. तरुण वनराज शिकार करीत होता आणि लांडगा आयतं झोडीत होता.

एकदा अशीच एका सांबराची शिकार वनराजानं केली. सांबर पोटात ढकलताना लुच्चा लांडगा म्हणाला, "वनराज, सांबराचं मांस रुचकर आहे, हे खरंच! पण तुम्हाला सांगू का? मांसात मांस घोडयाचं चांगलं. त्याच्या इतकं रुचकर आणि उत्तम मांस दुसऱ्या कोणाचंच नाही. आपण घोडा खाल्ला आहेत का?"

"नाही बुवा! अरे मित्रा, घोडा आहेच कुठं आपल्या या जंगलात? मी सुद्धा ऐकलंय त्याच्याबद्दल पण चव कधी घेतलेली नाही. कशी मिळाणार ती?"

"ह्यॅ! त्यात काय अवघड आहे? आणि तुमच्यासारख्या वनराजाला काय अशक्य आहे? अहो, मी एकदा हिंडत हिंडत या अरण्याच्या टोकाशी बाहेर गेलो होतो. तिथून काही अंतरावरच पुढं मला माणसांचं एक गाव दिसलं. माणसांजवळ घोडे असतात. माणसं घोडे पाळतात. आणि त्या गावातल्या माणसांचे घोडेदेखील मी गावाजवळच्या नदीवर पाहिले. नदीच्या काठावरल्या हिरवळीत काही घोडे चरत होते. काही नदीचं पाणी पीत होते. आणि काही नदीत डुंबत होते. म्हणत असाल, तर तिकडं जाऊ या, आणि एखाद्या तरी घोड्याचा फडशा पाडू या! मला गावाकडची वाट माहीत आहे."

घोडयाच्या रुचकर मांसाच्या चविष्ट कल्पनेनं वनराजाच्या तोंडाला पाणी सुटलं होतं. तो म्हणाला, "मित्रा, चल!" आत्ताच जाऊ या! असल्या कामाला वेळ कशाला?" आणि वनराज लांडग्याच्या पाठोपाठ गावाच्या दिशेनं निघाला.

जंगल तुडवीत दोघं जंगलाच्या बाहेर आले. वनराजानं पाहिलं तर खरंच पलिकडं अंतरावर गाव दिसत होतं. गावाजवळच्या नदीवर घोडेही होते. तो ढांगा टाकतच उतावीळपणानं पुढं गेला आणि एका घोडयावर झेप टाकून त्याला लोळवला. सिंहाला पाहताच बाकीचे सगळे घोडे, गाई, कुत्री आणि माणसंदेखील घाबरून पळून गेली. वनराजानं मग आपल्या ताकदीनं मारलेला घोडा ओढत जंगलात नेला. त्याचा यथेच्छ पोटभर समाचार घेतला. भला मोठा मांसाचा गोळा लांडग्यालाही दिला. खरंच घोड्याच्या मांसाची चव काही वेगळीच लागली. ती वनराजाला फार फार आवडली. म्हणून पुन्हा दुसरे दिवशी त्यानं तोच प्रकार केला, आणि दोन घोडे मारले. एक स्वतःला व लांडग्याला ठेवून घेतला. आणि दुसरा आपल्या म्हताऱ्या आईबाबांना नेऊन दिला. त्यांनी विचारलं, "कुठून रे आणलास हा घोडा? कुठं शिकार साधली?"

तरुण वनराजानं सगळी हकीकत सांगितली. ती ऐकून म्हातारा सिंह म्हणाला, "अरे तू राजाचे घोडे मारले आहेस? त्या

गावात राजा राहतो आणि इतके चांगले घोडे त्याचेच असणार! पोरा, लक्षात ठेव! सिंहानं शिकार करायची असते, पण ती जंगलात! गावात घुसून लोकांची जनावरं आणि विशेषतः राजाचे घोडे कधीच मारायचे नसतात. कारण राजा बलशाली असतो. त्याच्याजवळ सैन्य असतं. शस्त्रं असतात. त्यांच्या बळावर तो आपल्यासारख्या सिंहाला देखील लोळवू शकतो! म्हणून असलं धाडस करू नकोस!''

परंतु तरुण वनराजानं बापाच्या बोलण्याकडं दुर्लक्ष केलं. पुन्हा तो नदीकाठी गेला अणि पुन्हा त्यानं घोडा मारला.

खरंच, ते घोडे राजाचे होते. राजाच्या कानी ही वार्ता गेली, तेव्हा राजानं हुकूम दिला की, ''घोडे नदीवर पाठवू नका! त्यांना पाणी पिण्यासाठी गावात तबेल्यागवळच मोठा हौद बांधा!'' हौद बांधण्यात आला. राजाचे घोडे हौदावरच पाणी पिऊ लागले. वनराज रोज नदीवर चक्कर मारू लागला. पण एकही घोडा त्याला दिसेनासा झाला. लुच्चा लांडग्यानं कुठूनतरी घोडयांचा सुगावा काढला. म्हणाला, ''वनराज, घोडे आता हौदावरच पाणी पितात.''

''मग आपण हौदावर धाड घालू या!'' वनराज म्हणाला. आणि गावात घुसून हौदाकडं वळला. तिथं घोडे होतेच. वनराजानं एका घोड्यावर झडप टाकली आणि त्याला ओढत जंगलात नेलं. पुढं दोन-चार वेळा असंच घडलं. तेव्हा राजानं आज्ञा दिली, ''घोडे अश्वशाळेतच बांधून ठेवा. त्यांना तिथंच पाणी पाजा.'' घोडे अश्वशाळेत बंदिस्त झाले. त्यांना तिथंच चारापाणी दिलं जाऊ लागलं. वनराजाला घोडा पुन्हा दिसेनासा झाला.

आठदहा दिवस असेच गेले. वनराजाला आता घोड्याशिवाय दुसरा प्राणी चालेनासाच झाला होता. त्यामुळं उपासमार होऊ लागली. लांडगा तर फारच घायकुतीला आला होता.



३२३५ ६।१२।२००१

त्याने कुठूनतरी घोडयाच्या बंदीवासाची बातमी आणली. ती ऐकताच भुकेजलेला वनराज उसळून म्हणाला, "मी अश्वशाळेवर हल्ला चढवीन! मी सिंह आहे! वनराज आहे!"

लांडगा म्हणाला, "महाराज अशी घाई करून चालणार नाही. तिथं हत्यारबंद सैनिक असतात. म्हणून रात्री अंधारात गेलं पाहिजे आणि शिकार साधली पाहिजे."

रात्री अंधार पडल्यावर दोघं अश्वशाळे-जवळ पोचले. सगळीकडं शांत-निवांत होतं. लांडग्यानं अश्वशाळेभोवती हिंडून पाहिलं, तेव्हा एक खिडकी उघडी दिसली. तो वनराजाला म्हणाला, "महाराज, या खिडकीतून आत झेप घ्या आणि शिकार करा!"

वनराजानं कसलाही विचार न करता दाणकन् आत उडी घेतली. पण त्याचं सगळं शरीर काही खिडकीतून जाऊ शकलं नाही. ते खिडकीतच अडकून राहिलं. घोडे खिंकाळू लागले! वनराज गर्जना करू लागला! खिडकीतून सुटण्याची धडपड करू लागला! हलकल्लोळ उडाला! गाव जागं झालं! सैनिक धावत आले! सिंहाच्या बातमीनं घबराट उडाली.

राजाच्या कानी वार्ता गेली. राजा म्हणाला, "घोड्यांकरता लाचावलेल्या सिंहाला सोडू नका! ठार करा!"

सैनिकांनी आपल्या धनुष्यावर विषारी बाण चढविले आणि सिंहाला घायाळ करून टाकले. तरणाबांड तरुण वनराज घायाळ होऊन करुण किंकाळ्या फोडीत होता.

आणि त्याचवेळी लुच्चा लांडगा आपल्या मनाशी पुटपुटत होता, "चला, आता येथून पळालेलं बरं. दुसरं कूळ गाठलेलं बरं!"

घायाळ सिंहाला मरता मरता आई-बाबांचे शब्द आठवत होते. "हलक्याशी संगत करू नकोस..."

***



# अलीची गोष्ट

गोष्ट आहे इराण देशातली. फार फार जुना. इतकी की, शंभर वर्षे होऊन गेली असतील!

इराणमधल्या एका गावात एक मूर्ख राहात होता. म्हणजे खरं तर, मुर्खांना कुठंही कोणत्याही देशात किंवा गावातसुद्धा मुळीच तोटा नसतो. एक शोधायला गेलात तर हजार मिळतील!''

तर असाच हा एक मूर्ख! अली त्याचं नाव.

पण गंमत अशी होती की सगळीजणं अलीला फार शहाणा समजत असत. विद्वान मानत असत. त्याच्या पांडित्याची आणि विद्वत्तेची कीर्ती फार लांबवर पसरली होती!

आणखी मजा अशी होती की, अली बोलायला लागला की, फार मोठ्या मोठ्या गोष्टी बोलत असे. या त्याचा बोलण्याची छाप ऐकणाऱ्या लोकांवर पडायची आणि लोकांना अली हा माणूस फार फार शहाणा आणि विद्वान वाटायचा. मग हे लोक अलीच्या शहाणपणाची कीर्ती तीखट–मीठ लावून सगळीकडं सांगत असत. ते नवीनं ऐकणारे आणखी आपल्या पदरचं तिखट–मीठ भरून अलीच्या हुशारीची ख्याती पसरवीत असत.

या ख्यातीमुळं अलीला लांबलांबचे लोक भेटायला येत असत आणि आपल्या गावी प्रवचन देण्यासाठीही बोलावीत असत. त्यामुळ तर आणखीही अलीची ख्याती वाढत असे.

राजदरबारातूनही मोठ्या आदरानं, सन्मानानं त्याला निमंत्रित केलं जात असे.

एखाद्या दरबारात अलीला उच्चासनावर बसवल्यावर तिथला राजा हात जोडून नम्रपणानं अलीला विनंती करीत असे, "हे बुद्धिमान खाविंद, मला आणि आमच्या दरबारातील या लोकांना शहाणपणाच्या चार गोष्टी कृपा करून सांगव्यात!"

मग अली बराच वेळपर्यंत जोरदार भाषण झोडीत असे. सगळी मंडळी त्याचं भाषण लक्षपूर्वक ऐकत असत. ते समजून घेण्याचा प्रयत्नही करीत असत. पण बहुतेक सगळयांच्या डोक्यावरून ते वाहून जात असे.

भाषण संपल्यावर मात्र ती दरबारी मंडळी आपसात मोठ्या आदरानं बोलत असत. एकजण म्हणायचा, "अली महाशयांच्याजवळ दहा माणसांची बद्धी एकवटलेली आहे!"

दुसरा सांगायचा, "केव्हढ्या विद्वतेच्या गोष्टी अलीमहाशय सांगतात."

तिसरा म्हणायचा, "केवढं सखोल ज्ञान अली महाशयांना आहे!"

चवथा सांगायचा, "अशा विद्वानांची

बरोबरी कोण करू शकणार?''

मग पाचवा निर्णय द्यायचा, ''या विद्वान् रत्नापुढं ''आपण सगळे मूर्ख आहोत!''

राजाचीदेखील अशीच समजूत होत असे. अली सोन्या–चांदीच्या नाण्यांनी भरलेल्या थैल्या घेऊन परतत असे.

अली रस्त्यानं चालला की, लोक त्याच्याकडं बोट दाखवून म्हणत असतं. ''अरे, बघा बघा, अलीमहाशय चालले आहेत. इराण देशातला सगळ्यात बुद्धिमान माणूस आहे ना!' '

काही लोक तर अलीला घेराव घालून म्हणत असत, ''अली महाशय, आम्हाला काही ज्ञानाच्या गोष्टी सांगा. आम्ही आपले आभारी होऊ.''

या सगळ्याचा परिणाम व्हायचा तोच झाला. अली गर्वानं ताठला. त्याच्या डोक्यात अहंकाराचं वारं खूप जोरानं शिरलं. तो घमेंडखोर बनला आणि त्याला मनापासून वाटू लागलं की, ''आपण सगळ्याहून श्रेष्ठ आहोत! बुद्धीवान आहोत! विद्वान आहोत! आपल्यापुढे सगळे सगळे लोक मूर्ख आहेत. तुच्छ आहेत. अशा लोकांशी बोलणं, भेटणं म्हणजे देखील अपमानास्पद आहे. राजे महाराजे माझा आदर करतात. सन्मान करतात. कोण आहे माझ्याइतका हुशार ?''

पुढं पुढं तर अली फारच गर्विष्ठ बनून गेला. लोकांनी शहाणपणाच्या गोष्टी सांगायची विनंती केली की, एक तर तो त्यांना धुडकावून लावायचा किंवा भाषणाची सुरुवातच 'हे मूर्खांनो–' अशी करायचा.

खूप दिवसांपासून अलीनं एका गावाबद्दल ऐकलं होतं. गावाचं नाव होतं, नसिराबाद. पण तिथले लोक अत्यंत मूर्ख असल्यामुळं त्या गावाला 'मूर्खाबाद' असंच नाव पडलं होतं.

मूर्खाबादच्या मूर्खांच्या कथाकहाण्या ऐकून ऐकून लोक पोट धरधरून हसायचे. गंमत करायचे.

अलीच्याही कानावर मूर्खाबादच्या मूर्खांच्या कथा – कहाण्या पोचल्या होत्याच. एकदा त्याच्या मनात आलं की, मूर्खाबादला जावं आणि तिथल्या मूर्खांच्या पुढं एक लांबलचक भाषण झोडून त्यांना शहाणं करावं, अक्कल शिकवावी, हुशारी पढवावी....

अलिनं आपलं तट्टू बाहेर काढलं. त्याच्यावर खोगीर ठेवला आणि निघाला मूर्खाबादकडं. जाता जाता दिवस मावळू लागला. सायंकाळच्या सावल्या उतरू लागल्या. अली आणि त्याचं तट्टू चालून चालून थकून गेले होते. तरी तसेच निघाले होते.

जाता जाता लांबवर एक गाव दिसलं. जवळच एका शेतात एक शेतकरी काम करीत होता. अलीनं त्याला बोलावलं आणि विचारलं, 'नसिराबाद कुठं आहे?''

'ते काय पुढंच दिसतंय!' शेतकऱ्यानं गावाकडं हात दाखवीत सांगितलं.

अली त्याला म्हणाला, ''जा, गावात जा आणि सगळ्या गावकऱ्यांना 'मजलीस' मध्ये जमायला सांग. विद्वान अली त्यांना शहाण-

पणाच्या चार गोष्ट सांगेल. भाषण करील!''

'मजलीस' म्हणजे गावातला मोठा हॉल. गावकरी मजलीसमध्ये उपदेशाची प्रवचनं ऐकण्यासाठी जमत असतात.

शेतकरी झप – झप पावलं टाकीत गावाकडं गेला. थोडी विश्रांती घेऊन अलीही मजलीसकडे गेला. मनाशी ठरवत होता, ''या मूर्खांना चांगलं दोन – तीन तास असं भाषण सुनावतो की, त्यांना याची याद जन्मभर राहील!''

अली मजलीसजवळ आला. तट्टू एका झाडाजवळ बांधलं आणि तो आत गेला. आश्चर्यचकीत झाला! कारण मजलीसमध्ये एका कोपऱ्यात बसलेल्या एका माणसाशिवाय दुसरं कुणीच नव्हतं. ! सगळी मजलीस रिकामीच होती.

अली तावातावानं त्या कोपऱ्यातल्या माणसाजवळ गेला नि म्हणाला, ''या गावातल्या मूर्खांना काही शहाणपणाच्या गोष्टी सांगाव्यात, या हेतूनं मी इथं आलो होतो. पण इथं तर तू एकटाच दिसत आहेस! तर सांग मी तुला काय सांगू?''

कोपऱ्याला तो एकटा माणूस म्हणाला, ''मी मूर्ख माणूस, तुम्हाला काय सांगणार? मी एका घोड्यांची राखण करणारा सामान्य माणूस आहे. पागेतल्या घोड्यांची देखभाल करणं, हे माझं काम आहे. माझ्या पागेत दहा घोडे आहेत. मी तर इतकं जाणतो की मी जर घोड्यांना चारा देण्यासाठी गेलो आणि मला जर तिथं एकच घोडा दिसला तर त्या एकट्यालाच चारा खायला देईन।''

हे ऐकताच अली मनाशी म्हणाला, ''हा मूर्ख बोलतोय तर बरोबर. सांगतोय ते ठीकच आहे. आपण यालाच भाषण सुनवू या!''

अलीनं भाषण द्यायला सुरुवात केली. धो धो धो धो..... शब्दांचा पाऊस पडायला लागला. खळ खळ खळ.... भाषणांचा पूर वाहू लागला. दोन तास अलीनं त्या माणसाला आपल्या भाषणानं चांगलं झोडून काढलं! तो गरीब बिचारा माणूस खाली मान घालून शांत बसून राहिला होता.

भाषण संपल्यावर अलीनं त्याला विचारलं, ''काय, कसं वाटलं भाषण तुला?''

तो गरीब माणूस म्हणाला, ''मी मूर्ख माणूस काय सांगणार? मी एक घोडे राखणारा गरीब माणूस आहे आणि माझ्या पागेत असलेल्या दहा घोड्यांची देखभाल करीत असतो. पण मी इतकं तर नक्कीच जाणतो की, जर मी घोड्यांना चारा द्यायला गेलो आणि मला तिथं दहांच्या ऐवजी एकच घोडा दिसला तर मी त्या एकट्या घोड्याला त्याच्यापुरताच चारा देईन. दहा घोड्यांचा चारा त्याच्यापुढं टाकणार नाही!''

हे ऐकताच विद्वान अलीचं शहाणं डोकं शरमेनं खाली झुकलं.

मूर्खाबादच्या एका मूर्खानं अलीला शहाणपणाची साधीच गोष्ट सांगितली होती.

अली गूपचूप आपल्या तट्टावर बसून, गुपचूप आपल्या घरी परतला.

# पंपू

नाही म्हटलं तरी आता तीस वर्षं तरी झाली असतील! माझीच चाळीशी उलटली त्याला तीन-चार वर्षं झाली. पंपू भेटला त्यावेळी मी आणि तो जवळपास एकाच वयाचे होतो. असलाच तर सात-आठ महिन्यांचा फरक असेल नसेल इतकंच! तर पंपू आणि मी त्यावेळी बारा वर्षांचे होते. पंपू उणंपुरं वर्ष सव्वावर्ष आमच्याकडं असावा. आणि त्यावेळी तो जो घर सोडून गेला, तो गेलाच! कसा गेला? कुठं गेला?... हे अद्यापही कळलेलं नाही. पण का गेला, हे मात्र अजून तीस वर्षांनंतरही पक्कं लक्षात आहे!

पंपू घर सोडून गेला, एवढंच नव्हे, तर पंपूसुद्धा जसाच्या तसा ध्यानात आहे. अगदी डोळ्यांपुढं उभा आहे. अर्थात त्यावेळी तो जसा होता तसाच हं! या तीस वर्षांत मी जसा बदलून गेलो आहे, तसा पंपूदेखील पार बदलून गेला असेल! त्यावेळी माझ्या डोक्यावर कुरळे, काळेभोर, दाट केस होते; पण आता भलं मोठं टक्कल, डोळ्यांना दिसेनासं झालं आहे! पंपूतही असा काही काही बदल झालेला असणारच! वाढतं वय आपल्या खुणा देहावर उमटवीत असतं!

पण मला जो पंपू आठवतो, दिसतो, तो लुकडा पण चिवट, कष्टाळू, गरीब, सालस व प्रेमळ स्वभावाचा. गुडघ्यापर्यंतची अर्धी चड्डी आणि वर एक कोपरीसारखी बंडी. हा त्याचा कायमचा वेष.

पंपू आमच्या घरी आला तो माझ्या वडिलांच्या एका मित्रांबरोबर. त्यांना आम्ही नाना म्हणत असू. नाना वऱ्हाडातले. यवतमाळकडले. त्यावेळी त्यांची तिकडे एका खेड्यात शेतीवाडी होती. वर्षाकाठी एकदोनदा नाना आपल्या खेड्यात जायचे. शेती बघायचे. कुळाकडून पैसे, धान्यधुन्य वसूल करायचे. त्यावेळी धनी आणि कुळ यांच्यात बऱ्याच ठिकाणी सामंजस्य नांदत होतं. कडवट वैरभाव नव्हता.

तर एकदा नाना असेच खेड्यावर गेले असताना त्यांच्या शेतावर कसणाऱ्या पांडू आबाचा अचानकच मृत्यू झाला होता. पांडू आबाचा पंपू हा मुलगा. त्याचं नाव पंढरी. पंढरीचाच पंपू झाला होता. पंपूची आई त्याच्या लहानपणीच वारली होती. पांडूआबाच पंपूचे आई आणि वडील झाले होते. पंपू खेड्यात शेतीवाडीवरच वाढला. गुराढोरात वावरला. बाकी शाळाबिळा त्याला ठाऊकच नव्हती. लिहित्या-वाचत्या जगाशी त्याचा संबंध नव्हता.

पांडूआबा गेल्यावर पंपू अनाथ बनला.

एकटाच राहिला. म्हणून नानांनी येताना त्याला आपल्याबरोबर घरी आणलं होतं. नाना शिक्षक होते. घर लहान होतं. आवक बेताची होती. हे सगळं लक्षात घेऊन त्यांनी माझ्या वडिलांकडं पंपूला आणलं, आणि म्हणाले, "बळवंतराव, हा पंपू तुमच्या स्वाधीन करीत आहे." नानांनी पंपूची सगळी हकीकत त्या आधीच माझ्या वडिलांना सांगितलेली होती.

पंपूला आमच्याकडं सोडून नाना, शाळेची वेळ झाली म्हणून, निघून गेले. या नव्या पाहुण्याकडं मी तो आल्यापासूनच टक लावून कुतूहलानं पाहात होतो. त्याच्या अवतारावरून तो एक खेडवळ मुलगा आहे, एवढं माझ्या लक्षात आलं होतं. पण तो कोण आहे, कसा आहे, कुठून आला आहे, कशासाठी आला आहे?.... हे काहीसुद्धा मला ठाऊक नव्हतं. पुढं हे सगळं कळलं.

पण त्याची आणि माझ्या वडिलांची पहिली मुलाखत मला आठवते आहे; नाना गेल्यावर माझ्या वडिलांनी त्याला जवळ बोलावून विचारलं होतं, "पंपू आमच्याकडं काम करशील ना?"

मान हलवीत पंपूनं सांगितलं, "हो! करीन की!"

वडिलांनी विचारालं, "काय काम करशील?"

"सांगाल ते करीन! झाडलोट करीन, पाणी भरीन, गुरंढोरं चरायला नेईन. पडेल ते काम करीन!..."

"बरं, महिन्याला किती पगार घेशील?"

पगार हा शब्द ऐकताच पंपूच्या चेहऱ्यावरचे भाव बदलले, रंग पालटला, आणि तो वडिलांना सरळ म्हणाला, "नाही, मी तुमच्याकडं काम करणार नाही!"

वडिलांना आश्चर्य वाटलं! त्यांनी विचारलं, "का रे, आत्ता हो म्हणालास आणि लगेच नाही म्हणतोस? काय झालं एवढ्यात?"

पंपूनं सांगितलं, "आपण पगाराबद्दल विचारलं म्हणून. मी या घरात पगारी मजूर म्हणून काम करणार नाही. माझंच घर म्हणून मी इथं राहीन. आणि सगळं काम करीन!" वडिलांचे डोळे पाणावल्यासारखे दिसले. त्यांनी पंपूला जवळ घेतलं त्याच्या पाठीवरून प्रेमानं हात फिरवला. आणि दाटलेल्या स्वरातच म्हणाले, "बरं बरं. आमच्या घरचाच म्हणून या घरी राहा. शाळेत न जातासुद्धा किती शहाणा आहेस रे तू! आणि हा बघ आमचा रघू! रघू इकडं ये, आजपासून तुझा हा नवीन मित्र आला आहे इथं. इथंच राहाणार आहे. याच्याशी नीट वागायचं, गोड बोलायचं, खेळायचं, बरं का!"

आणि त्याच क्षणापासून माझी आणि पंपूची गट्टी जमली!

मी शाळेत गेलो म्हणजेच तेवढा पंपू बरोबर नसायचा. बाकी एरवी तो आणि मी जवळजवळ एकत्र असायचो. सुटीच्या दिवशी तर मी त्याच्या बरोबर गुराढोरांच्या मागं रानातही जायचा. पंपू कितीतरी बोलायचा. कितीतरी गोष्टी सांगायचा. झाडं, फुलं, फळं, पक्षी, जनावरं – यांच्याविषयी पंपूला कितीतरी माहिती होती. मला ती मुळीच नव्हती. घरात किंवा

शाळेत कुणीच सांगितली नव्हती. पंपूच्या तोंडून अशा गोष्टी ऐकताना मी गुंगून जायचा. मला त्या फार फार आवडायच्या. त्यामुळं पंपूही फार फार आवडायचा.

कधी कधी विटीदांडू खेळत असू. पंपूचा नेम असा काही बरोबर असायचा की, मी फेकलेल्या विटीला तो ताडकन् दांडूनं लांब उडवायचा. मग मी पळायचा. पंपू असं मला खूप खूप पळवायचा. ताण काढायचा. पिदवायचा!.... मी घामाघूम व्हायचा. विटी दांडूच नव्हे, तर कुठलाही खेळ घेतला तरी पंपू माझी उशी काढायचा! खेळण्यात तो फार पटाईत होता. खेळातल्या एकसारख्या पराभवानं मी खट्टू बनलो, म्हणजे पंपू मुद्दाम पडतं घ्यायचा. खेळातले बारकावे मला समजावून सांगायचा. पंपू धाडसीसुद्धा होता. एकदा माळावरून जाताना त्याला एक साप दिसला. त्यानं तो मला दाखवला. मी घाबरून गेलो. पण पंपूनं पुढं होऊन चलाखीनं तो साप पकडला आणि हाताच्या मुठीत घट्ट धरून माझ्यापुढं आणला. भीतीनं माझी पार गाळण उडाली होती! बोबडी वळली होती! मी भीतीनं घाबरून मागं मागं सरकू लागलो. पंपू म्हणाला, 'रघू, अरे भागूबाईसारखं घाबरतोस काय? बघ तरी हात लावून. कसा मऊ मऊ आणि गार गार आहे साप. अरे, मी आहे ना! ये!'' पंपूनं असा खूप धीर दिल्यावर मी दबकत दबकत पुढं झालो आणि भीतभीतच सापाच्या शेपटीला हात लावला. पंपूनं एकदा एक बेडूक पकडून माझ्या खिश्यात सोडला. मी किंचाळलो! ओरडलो! पंपू खो खो हसत होता. म्हणाला, ''रघू, अरे बेडकाला का घाबरतोस, एवढा शाळेत जातोस, शहाणा म्हणवतोस, पहिला नंबर मिळवतोस आणि बेडकाला, उंदराला, सरड्याला घाबरून पळतोस?''

पंपूनं असं चिडवून मला धीट बनवलं. झाडावर चढायला शिकवलं, पोहायला लावलं, दिवसेंदिवस पंपूची आणि माझी दोस्ती दाट होत गेली!

पंपूशिवाय मला करमेनासं झालं. गमेनासं झालं. शाळेत वर्गात बसल्यावरदेखील पंपूची मला सतत आठवण यायची. अभ्यासाकडं लक्ष लागायच नाही. शाळेच्या कोंडवाड्यातून कधी एकदा बाहेर पडतो आणि पंपूबरोबर खेळायला जातो, असं मला होऊन जायचं.

तर एकदा शाळेत असाच गुदमरून गेलो असताना शाळेची घंटा झाली आणि शाळा सुटली. मी लगबगीनं, घाईनं घरी आलो. अंगणातूनच पंपूला हाक दिली. पण पंपूकडून साद आली नाही. मी घरात जाऊन सगळीकडं शोधलं. पंपू कुठंच दिसला नाही. म्हणून सैपाकघरात आईकडं गेलो. आईला विचारलं तर ती म्हणाली, ''अरे रघू, पंपूला आज काय झालंय कुणास ठाऊक? बोलत नाही, हसत नाही, न्याहरीही केली नाही, गुराढोरांना चरायला रानात घेऊन गेला नाही!....''

मी तिथून निघालो आणि आमच्या गोठ्याकडे गेलो, तर खरचं! सगळी गुरंढोरं, वासरं

दावणीलाच बांधलेली होती. तिथंच कडबा खात उभी होती. मी सगळा गोठा फिरून पाहिला. वैरणीची खोली तपासली, विहीरीत डोकावून आलो. पंपू कुठंच दिसला नाही. मग केळीच्या बागेच्याकडेला असलेल्या चिंचेच्या झाडाखाली गेलो. ती आमची गप्पागोष्टी करण्याची खास जागा होती. ती आम्हा दोघांनाच ठाऊक होती. मी तिथं गेलो तर पंपू तिथंच सापडला. चिंचेच्या भल्या मोठ्या बुंध्याला टेकून तो बसला होता. उदास दिसत होता. दु:खी–कष्टी झाला होता. त्याचा चेहरा पार उतरलेला होता. डोळे रडवेले झाले होते. मी जवळ गेलो आणि त्याला विचारलं, "पंपू, काय झालं? कुणी रागावलं का? बाबा काही बोलले का?"

पंपू डोळे पुशीत म्हणाला, "बाबा बोलते तर मी का रागावीन? रडत बसीन? बाबा बोलते तर तो त्यांचा हक्कच आहे!"

"मग काय झालं तुला? असा का रुसलास? दु:खी झालास? आई म्हणाली तू न्याहरीदेखील केली नाहीस?"

पंपूचे डोळे पुन्हा भरून आले. कंठ दाटून आला. आणि गदगदलेल्या स्वरातच तो म्हणाला, "आपल्या गीताला काका विकून टाकणार आहेत!"

मी आश्चर्यानं विचारलं, "खरचं? कुणी सांगितलं तुला?" "काकांनी सौदा केलाय त्या सिताराम वाण्याशी. मी ऐकलं माझ्या कानांनी. रघू आपली गीता किती चांगली गाय आहे! माझी तिच्यावर खूप खूप माया आहे. ती मला आईसारखीच वाटते. अशा गाईला विकायचं? मला नाही सहन होत." पंपू हमसाहमशी रडू



लागला. मी त्याला आईकडं घेऊन गेलो. आईनं त्याची समजूत घालण्याचा प्रयत्न केला, पण पंपूनं ऐकलं नाही. तो जेवायला तयार झाला नाही.

काकांच्या कानावर जेव्हा ही गोष्ट गेली, तेव्हा काकांनी तरातरा येऊन रागानं पंपूलाच खडसावलं. म्हणाले, "तुला काय करायच्या आहेत रे नसत्या उठाठेवी? गुरांची राखोळी करायची, त्यांचा गोठा साफ करायचा, असली कामं तुझी. नस्त्या गोष्टीत पडू नकोस!" काका असे तडकूच होते! एककल्ली होते!

पंपूला आणखीनच दुःख झालं.

संध्याकाळची वेळ झाली. बाबांना घरी आल्यावर हा प्रकार कळला. बाबांनी पंपूच्या पाठीवरून हात फिरवीत त्याची समजूत घालण्याचा प्रयत्न केला. म्हणाले, "पंपू, आपली गीता गाय आता आटली आहे. दूध देत नाही. शिवाय थोडी म्हातारी पण झाली आहे!"

त्याबरोबर पंपू उसळून म्हणाला, "बाबा, गीता गाय आटली आणि म्हातारी झाली म्हणून विकायची म्हणता, मग आपले आईबाबा म्हातारे झाले आणि त्यांच्याकडून काम होईनासे झाले तर मग त्यांनाही विकायचं?"

पंपूच्या या प्रश्नानं बाबा चांगलेच चमकले! वरमले! पंपूची समजूत कशी घालावी, हेच त्यांना समजेनासं झालं. आईसुद्धा चकीत झाली होती! पंपू जेवला नाही म्हणून आईदेखील जेवली नव्हती. बाबांनी तर बाहेरून आल्यावर चहा देखील घेतला नाही.


संध्याकाळ होऊन गेली, दिवे लागणी झाली. आणि तेवढ्यात काका अंगणातूनच सांगत घरात आले, "अरे रघू, गीता विकायचा आमचा सौदा फिसकटला बरं का! सांग पंपूला." काकांची ही बातमी ऐकून आम्हा सगळयांनाच आनंद झाला! पंपू तर भलताच खूष होऊन गेला. तो पळत पळत गोठ्यात गेला आणि गीता गाईच्या गळयात पडला. तिच्या अंगावरून त्यानं मायेनं हात फिरवला. वैरणीची एक पेंढी तिच्यापुढं टाकली. आईबाबांनाही हायसं वाटलं! रात्री सगळयांनी समाधानानं नेहमीसारखं गप्पागोष्टी करीत जेवण केलं. रात्री निजण्यापूर्वी पंपूनं सगळ्या जनावरांना पाणी पाजलं. वैरण टाकली. गीताला मस्तकावर थोपटलं. आणि मग तोही झोपी गेला.

पंपू सकाळी लवकरच उठायचा, तसा तो दुसऱ्या दिवशी उठला. उठल्या उठल्या गोठ्याकडं जायचा; तसा तो त्याही दिवशी गेला. गेला, पण दावणीला जाग्यावर गीता दिसली नाही, म्हणून मनात चरकला! त्याला धक्काच बसला! पळत पळत येऊन त्यानं मला उठवलं. गीता दावणीला नाही, हे सांगितलं. मी ते आईला सांगितलं. आईनं ते बाबांना सांगितलं. पण ते ऐकूनसुद्धा पंपूएवढा धक्का कुणालाच बसला नाही, हे पंपूला जाणवलं! तो गप्प गप्प झाला. रडवेला बनला. पुन्हा अबोल झाला. मी शाळेत निघालो, तेव्हा मला एका बाजूला घेऊन तो एवढंच म्हणाला, "रघू, मला काकांनी फसवलं. बनवलं. सगळेच माझ्याशी बहुधा खोट्यानं वागलेले आहेत.

मला फार फार वाईट वाटतंय.....''

डोळे पुसत पंपू गोठ्याकडं गेला. मी शाळेत गेलो. पण शाळेत काही लक्ष नव्हत. गुदमरून गेलो होतो. शाळा सुटली तसा धावतच घरी परतलो. पंपूला हाक दिली. पण पंपूकडून साद मिळाली नाही. मी सगळीकडं शोध शोध शोधलं. पण पंपू दिसला नाही. अगदी आमच्या त्या केळीच्या बागेकडच्या त्या चिंचेच्या झाडाखालीसुद्धा तो सापडला नाही!..... त्या दिवशीच नव्हे, तर तेव्हापासून तो आत्तापर्यंत पंपू आम्हा कोणालाच दिसला नाही? सापडला नाही!.....

तीस वर्षं होऊन गेली! पंपू कुठं असेल? ..... कसा असेल?.......



# वीर वझीर

काश्मीर म्हणजे भारताचे नंदनवन! निसर्गाचं अपूर्व लावण्य या भूमीला लाभलं आहे! पूंच हा याच लावण्यभूमीतला एक जिल्हा आणि मेंधार हे या जिल्ह्यातील एक लहानसंच गाव. काश्मीरी लावण्यानं नटलेला आणि भोळ्या-भाबड्या काश्मीरी माणसांची वस्ती असलेला. पोटासाठी शेतीभाती करावी, कलाकुसरीचा हस्तोद्योग करावा, परमेश्वराचा दुवा मागावा आणि बंधुभावानं, गुण्यागोविंदानं गुजराण करावी, त्यांचा नित्यक्रम.

वझीर महंमद असाच एक भोळाभाबडा सरळ मनाचा शेतकरी. आपल्या शेतात कष्ट करावेत आणि आपली भाकरी मिळवावी, आपल्या कुटुंबातल्या माणसांचं पालनपोषण करावं, अशा तऱ्हेचं कष्टाचं, प्रामाणिकपणाचं आयुष्य जगणारा वझीर होता. त्याचं आपल्या कुटुंबावर जसं प्रेम, तसंच आपल्या जमिनीवर देखील होतं आणि आपल्या गावावरही होतं. लाडक्या काश्मीरच्या भूमीचा वझीरला अभिमान वाटे! तो आपल्या मुलुखावर प्यार करी!

आणि म्हणूनच वझीर एके दिवशी चांगलाच चरकला! मनातून किंचित हादरला देखील! क्षणभर त्याचं अंतःकरण चिंतेनं काळवंडून गेलेलं असणार!

गोष्ट वरवर पहायला गेलं तर तशी साधीच होती. पण भोळ्या वझीरच्या मनानं तिच्यातलं गांभीर्य चटकन हेरलं होतं. पुरतं जाणलं होतं.

झालं होतं असं की, त्या दिवशी संध्याकाळी वझीर शेतातून काम आटोपून घरी परत येत होता. दिवसभराच्या कष्टानं थकला–भागला होता. पण घराच्या ओढीनं तो चालला होता. घरच्या मुलांबाळांत बसून हुक्का पिण्यासाठी, त्यांच्याशी चार गोष्टी मजेनं बोलण्यासाठी तो उत्सुक होता. आपले पाय गावच्या दिशेनं भराभर उचलीत वझीर चालला होता.

रोजचीच पायाखालची वाट. तीच जमीन, तीच शेती, तेच आभाळ, तीच झाडं, तेच डोंगर, तेच ओहोळ, तेच चष्मे – झरे........ पण त्या खेरीज वझीरला काही नवीन अनोळखी दिसलं. काही माणसंच होती ती. पण वझीरच्या गावातली नव्हती शेजारपाजारच्या गावातलीसुद्धा नव्हती. वझीरनं त्यांना कधी यापूर्वी पाहिलंच नव्हतं. बरं, ते नवीन–अनोळखी तर होतेच, पण त्या माणसांच्या हालचालीदेखील काही वेगळ्याच तऱ्हेनं चाललेल्या वझीरनं पाहिल्या. ती माणसं आपसात काही खाणाखुणा करून बोलत होती, काही तरी न्याहाळीत होती, काही तरी बेत आखीत होती.

वझीरच्या मनानं घेतलं. ही माणसं काही साधीसुधी नाहीत. यांच्यापासून काही दगाफटका आहे खास! गावाला धोका आहे हे नक्की!

आणि वझीरचा हा तर्क खराही ठरला. त्यानं थोडं आडबाजूला होऊन निरखून पाहिलं, तेव्हा त्याला आढळून आलं की, या नवीन आलेल्या माणसांजवळ शस्त्रास्त्रं आणि दारूगोळाही आहे. सुरुंग पेरण्यासाठीच ते जागा पाहात आहेत.

"या अल्ला!" वझीर मनात पुटपुटला. "म्हणजे हे हैवान गावाला लुटायला आले आहेत तर? काश्मीरवर मागच्यासारखा हल्ला करण्याचा तर यांचा डाव नसेल?"

टोळीवाल्यांनी आणि पाकिस्तान्यांनी स्वातंत्र्यानंतर १९४७ साली आपल्या प्रिय काश्मीरवर केलेल्या दुष्ट हल्ल्याची याद वझीर अद्याप विसरलेला नव्हता. त्या घातकी हल्ल्याची आठवण येताच त्याचं रक्त त्यावेळी देखील उसळून उठलं! कानशीलं गरम झाली! डोळयात निखारे फुलले! तो आडबाजूला होता. तो सरळ पुढं झाला आणि त्यानं त्या अनोळखी माणसांना हटकलं.

वझीरच्या हटकण्यानं ती माणसंसुद्धा थोडी चपापली! गांगरली! पण वझीरला आता गप्प करणं त्यांना भागच होतं, म्हणून त्यांनी त्याच्याशी गोड गोड बोलायला सुरुवात केली. वझीरच्याही लक्षात येऊन चुकलं होतं की, आपण एकटे आहोत. अंधार पडायला थोडाच अवकाश आहे. शिवाय या अनोळखी माणसांजवळ शस्त्रास्त्रंही आहेत. वझीरनं त्यांचं बोलणं ऐकून घेतलं. आपण एक गरीब भाबडे शेतकरी आहोत असाच बहाणा त्यानं केला. अनोळखी माणसांच्या बोलण्यामधून हळूहळू त्याच्या लक्षात आलं की, गावाजवळच्या जंगलात हल्लेखोर दबा धरून बसलेले आहेत. काश्मीरवर हल्ला करण्याचा त्यांचा मनसुबा आहे. या बेतात सामील करून घेण्यासाठी त्यांनी वझीरच्याही तोंडाला मधाचं बोट लावण्यास कमी केलं नाही. वझीर सामील झाला तर त्यांना हवाच होता. कारण स्थानिक माणसाकडून सर्व काही कळू शकतं.

वझीरला त्या अनोळखी माणसांनी आता वेढलंच होतं. वझीर एकटाच होता. तो सामील झाला तर ठीकच, नाही तर, – नाही तर वझीरला आता जिवंत सोडणंही त्यांच्या दृष्टीनं धोक्याचं ठरलं असतं. कारण या त्यांच्या गुप्त हालचालीची माहिती वझीरलाच होती.

वझीरनंही सारा डाव ओळखला होता. सगळा प्रसंग जाणला होता. हल्लेखोरांच्या नरडीचा घोट घ्यायला त्याचे हात शिवशिवत होते रक्त सळसळत होतं. पण धीरानं शहाणपणानं, संयमानं वागणंच अवश्य होतं. म्हणून त्यानंही त्या अनोळखी माणसांशी गोड गोड बोलायला सुरुवात केली आणि बोलता बोलता संधी साधून त्यांच्या तावडीतून तो सुटला!

हल्लेखोरांना हुलकावणी देऊन वझीर निसटला तो तडक भारतीय सैन्याच्या छावणीवर येऊन धडकला! तिथल्या लष्करी अधिकाऱ्यांची भेट

घेऊन वझीरनं त्यांना सारी हकीकत सांगितली. अधिकाऱ्याला धोक्याची तत्काळ कल्पना आली. त्यानं जवानांना ताबडतोब सिद्ध होण्याची आज्ञा दिली आणि वझीरला बरोबर घेऊनच भारतीय सैन्याची तुकडी त्या जंगलाजवळ पोचली.

संध्याकाळची वेळ टळून गेली होती. अंधार पडला होता. सैनिकांची हालचाल कानावर येताच हल्लेखोर जंगलाच्या आडोशानं दडून बसले. झाडाझुडपात व खडकाच्या आडोशानं दबा धरून राहिले. भारतीय सैनिक निर्धारानं पुढं सरकले, तोच हल्लेखोरांनी मशीनगन्सचा मारा सुरू केला. शांत संध्याकाळची वेळ, पण गोळ्यांच्या वर्षावानं धरणीही थरारून गेली! डोंगर–कपारीतून आवाज घुमले!

भारतीय जवानही काही कमी नव्हते. ते तर हल्लेखोरांचा नक्शा उतरविण्यासाठीच आलेले होते. आपल्याही जवानांनी मोर्चे बांधले. बंदुका सरसावल्या आणि शत्रूंवर गोळ्यांच्या फैरी झाडण्यास सुरुवात केली. हा निर्धार आणि शौर्य पाहून हल्लेखोर घाबरले. खरं तर, ते संख्येनं आपल्या जवानांपेक्षा जास्तीच होते-शंभराच्यावर तरी असावेत, शिवाय त्यांच्याजवळ मशीनगन्स आणि उखळी तोफाही होत्या. पण भारतीय जवानांचे धैर्य व शौर्य पाहून त्यांना पळता भुई थोडी झाली! हातातली शस्त्रास्त्रं तिथल्या तिथं टाकून ते पळून गेले. ते पळून गेल्यावर बराचसा शस्त्रसाठा, दारूगोळा आणि इतरही युद्धसामुग्री आपल्या जवानांनी हस्तगत केली. या चकमकीत दहा हल्लेखोरांना आपल्या बहादूर जवानांनी यमसदनास धाडलं होतं.

एक फार मोठं अरिष्ट टळलं होतं आणि याला कारणीभूत होता वीर वझीर महंमद! त्यानं जर काही खबर वेळेवर लष्करी अधिकाऱ्याला दिली नसती तर? तर हल्लेखोरांनी किती आणि कसा धुमाकूळ घातला असता, किती आयाबहिणींची अब्रू लुटली गेली असती, किती निरपराध स्त्री–पुरुष बालबच्चे बळी गेले असते, किती घरंदारं – शेतमळे उजाड बनले असते, या अनर्थाची कल्पनाही करवत नाही!

पण वीर वझीर महमदच्या देशाभिमानानं, हुशारीनं व चलाखीनं गावाला आणि काश्मीरला वाचवलं आहे! वीर वझीर महंमद भारतमातेचा एक थोर सुपुत्र ठरला आहे!

काश्मीरवर हल्ला करण्यापूर्वी टोळीवाल्यांची व पाकिस्तानची अशी कल्पना असावी की, काश्मीरमधली बहुसंख्य मुस्लीम प्रजा आपणास साथ देईल. पण काश्मीरमधील मुस्लीम बांधवांनी हल्लेखोरांना आधार न देता भारतीय स्वातंत्र्याचा ध्वज उचलून धरलेला आहे. काश्मीरची जनता, मग ती हिंदू-मुस्लीम-शीख कोठल्याही धर्माची वा पंथाची असो, प्रथम भारतीय आहे व काश्मीर हा भारताचाच एक अविभाज्य भाग आहे, हे आपल्या निष्ठेनं, त्यागानं व बलीदानानं देखील तिनं सिद्ध केलं आहे!

# किसनची चतुराई

असंच एक गाव होतं. लहानसं खेडेगाव होतं. गावात शेतकरीच अधिक राहात होते. शेती कसत होते. पीक काढत होते. जीयन जगत होते.

त्या शेतकऱ्यांतच एक शेतकरी होता. त्याचं नाव किसन होतं. किसन शेतात मेहनत करायचा. घाम गाळायचा. शेत पिकवायचा.

एक वर्षी किसननं आपल्या शेतात नुसती ज्वारी आणि भुईमूग यांचच पीक घेतलं होतं. भुईमुगाचं पीक भरपूर आलं होतं. भईमुगाच्या शेंगांनी शेतातली सगळी जमीन भरून गेली होती.

शेंगा चांगल्या मोठ्या झाल्या, तशी जंगलातली डुकरं वासावर शेतात येऊ लागली. शेतातल्या शेंगा पंजानं उकरून खाऊ लागली. डुकरं रात्री यायची आणि शेंगांचा फडशा पाडायची! सकाळी किसनच्या लक्षात यायचं. हे नुकसान कसं थांबवावं? डुकरांचा बंदोबस्त कसा करावा? याचा विचार त्यानं केला आणि शेतातच एक उंच मचाण बांधलं. किसन दिवसभर शेतात काम करायचा, रात्री मचाणावर बसून शेत राखायचा.

एकदा रात्रीच्या वेळी किसन मचाणावर बसला होता आणि त्याचवेळी एक सिंह त्या बाजूनं चालला होता. सिंहाला माणसाचा वास आला. वासाच्या मागावर सिंह मचाणाजवळ आला. वर पाहिलं तर किसन त्याला दिसला. सिंहाला आनंद झाला. त्याला भूक लागलीच होती. मनाशी म्हणाला, "बरं झालं; आयतीच शिकार मिळाली!"

सिंहानं मचाणाचा एक वासा जोरजोरानं हलवायला सुरुवात केली. मचाण हलू–डोलू लागलं. किसननं मचाणावरूनच विचारलं, "कोण आहे? कोण मचाणाशी झटतंय?"

"मी आहे. या जंगलाचा राजा–सिंह!"

किसननं खाली पाहिलं तर खरोखरच सिंह होता! मोठा तगडा दिसत होता. मानेवरची आयाळही भरपूर दिसत होती. डोळे पेटलेल्या निखाऱ्यासारखे भासत होते! तो भयंकर सिंह पाहून किसन मनातून, खरं तर, घाबरूनच गेला होता. पण किसन चतुरही होता. त्यानं जाणलं की, असं घाबरून आता चालणार नाही. काहीतरी युक्ती केली पाहिजे आणि प्राण वाचवला पाहिजे.

भीती दडपून किसननं सिंहाला दमदार आवाजात विचारलं, "काय रे जंगलच्या राजा, काय पाहिजे तुला?" सिंहदेखील गुरकावीत त्याला म्हणाला, "अरे शेतकऱ्या, तूच मला

पाहिजे आहेस. मी तुला खाऊन टाकणार आहे. मला फार फार भूक लागली आहे.''

हे ऐकून किसन आणखीनच घाबरून गेला होता. पण सगळी भीती मनातल्या मनात दाबून तो सिंहाला म्हणाला, ''एवढंच ना! अरे, राजा झालास तरी तुला पोट आहेच. आणि पोटाला भूक लागणारच! मग माझ्यासारखी शिकार तुला मिळाल्यावर तू मला खाणारच! पण थांब, अशी घाई करू नकोस. थोडी कळ काढ. मी तुला वरच बोलावून घेतो. उगाच त्रास करून घेऊ नकोस.''

किसननं झटकन् घमेल्यातली शेकोटी पेटवली आणि आपला कोयता चांगला तापवून घेतला. मग तो सिंहाला म्हणाला,

''हं. आता वर ये!''

सिंहानं वर झेप घेतली. त्याबरोबर किसननं तापलेला कोयता त्याच्या जबड्यावर ठेवला. सिंहाचं तोंड भाजलं! तो खाली कोसळला. ह्या भाजण्यानं आणि अशा तऱ्हेच्या अचानक हल्ल्यानं सिंह घाबरून गेला, आणि आपला जीव वाचवण्यासाठी शेपटी पाडून तिथून पळून गेला!

पळता पळता थोड्या अंतरावर त्याला आणखी एक सिंह भेटला. त्या दुसऱ्या सिंहानं त्याला विचारलं, ''काय महाराज असं पळायला काय झालं?'' धापा टाकीत सिंह त्याला सांगू लागला, ''अरे विचारतोस काय? बाबा, जमाना बदलला आहे, काळ उलटा फिरला आहे. चोरच शिरजोर बनला आहे!''....

''दुसऱ्या सिंहानं विचारलं, 'अरे, पण एवढं भाषण देण्यापेक्षा काय झालं हे तरी सांग.''

पळपुटा सिंह म्हणाला, ''अरे बाबा, आता आणखीन् काय व्हायचं राहिलं आहे? हे बघ एका फडतूस शेतकऱ्यानं माझं तोंड असं भाजून टाकलं आहे.''

सिंहाचं भाजलेलं तोंड पाहून दुसऱ्या सिंहाला राग आला. एका माणसानं जंगलच्या राजाचं असं तोंड भाजून टाकावं म्हणजे काय? हा घोर अपराध आहे! रागावलेला तो दुसरा सिंह पहिल्याला म्हणाला, ''असं! चल माझ्याबरोबर दाखव तो शेतकरी मला. घाबरू नकोस! मीच त्याला खाऊन टाकतो!''

पण पहिला सिंह इतका घाबरलेला होता की, तो दुसऱ्या सिंहाबरोबर जायलाही तयार होईना. पण दुसऱ्या सिंहानं फारच ताणल्यावर तो म्हणाला, ''अरे बाबा, तो माणूस नसावा. राक्षस असावा! मी नाही तिथपर्यंत येणार. तोंड भाजलंय एवढंच पुरे. फारतर मी तुला लांबून त्याचं मचाण कुठं आहे ते दाखवतो.''

दोघं दबकत दबकतच मचाणाकडं निघाले. मचाण जवळ येताच पहिला सिंह थबकला! दुसऱ्याला म्हणाला, '' ते पहा तिथं त्याचं मचाण आहे. जा तू. मी इथंच थांबतो.''

दुसरा सिंह अवसान आणून तावातावानं मचाणाजवळ गेला. मचाणाचा वासा धरून जोरजोरानं हलवू लागला. मचाण डूल–डोलू लागलं. किसननं वरूनच विचारलं, ''कोण आहे?'' खालून सिंह म्हणाला, ''मी आहे सिंह.

जंगलचा राजा!" किसननं विचारलं, "असं! काय ये राजा, कुठं चाललास? काय पाहिजे तुला?" सिंह म्हणाला, "तुझ्याकडंच आलो आहे. तुला मी खाणार आहे."

पहिल्या सिंहाची फजिती पाहून किसनची भीती आता गेली होती आणि युक्तीही हाताशी आली होतीत तो हसत हसतच सिंहाला म्हणाला, "असं! म्हणजे तुला फार भूक लागलेली दिसत आहे. हरकत नाही. मला खा. पण थोडं थांब. मी तुला वर बोलावतो."

किसननं पुन्हा झटपट शेकोटी पेटवली आणि कोयता चांगला तापवला. मग म्हणाला, "अरे जंगलच्या राजा, आता वर ये!" सिंहानं वर झेप घेतली तशी किसननं खाली उडी मारली आणि तापलेल्या कोयत्यानेच सिंहाचे कुल्ले भाजून टाकले. त्या भयंकर चटक्यानं आणि अचानक मागून झालेल्या हल्ल्यानं दुसरा सिंहही घाबरून गेला! जीव वाचवण्यासाठी खाली उडी टाकून पळू लागला. त्याला आसं पळताना पाहून लांब उभा राहिलेला सिंहदेखील त्याच्या मागोमाग घाबरून पळू लागला!

दोघंही पळता पळता दाट जंगलात पोचले. तिथं त्यांची वस्ती होती. वस्तीवर आणखी दहा सिंह लोळत पडले होते. आराम करीत होते. ह्या दोघांना पळत धापा टाकत येत असताना पाहून ते ताडकन् उठून उभे राहिले आणि विचारू लागले, "अरे, काय झालं रे? असे घाबरलात काय? आणि धापा टाकत पळत कुठून आलात?"

आपल्या वस्तीवर आणि आपल्या भाईबंदात पोचल्यावर त्या दोन सिंहांच्या जिवात जीव आला. धापा टाकतच त्यांनी घडलेली हकिकत



दहा सिंहांना सांगितली. ती हकिकत ऐकताच त्या दहा सिंहांना देखील भयंकर राग आला. आपल्या सिंह जमातीचा हा घोर अपमान त्यांना सहन झाला नाही. त्यांना वाटलं की, जर आपण असे घाबरलो आणि गप्प बसलो, तर हा माणूसच एके दिवशी जंगलाचा राजा बनेल! आणि आपल्यालाच त्याचं गुलाम व्हावं लागेल!

ते दहा सिंह त्या दोन सिंहाना म्हणाले, "चला बरं! दाखवा आम्हाला ते मचाण आणि त्यावरचा तो बदमाश माणूस. घाबरू नका. आम्ही दहाजण आहोत. त्यांचे तुकडे तुकडे करून गिळून टाकू चला!"

पण ते दोन सिंह भाजलेल्या चटक्याने इतके घायाळ झाले होते की, त्यांची भीती कायम होती. भाजलेल्या ठिकाणी आग आग तर होतच होती. काकुळतीला येऊन ते दहा जणांना म्हणाले, "नको नको. अरे, तो माणूस नाही, तो राक्षस आहे! आम्ही काही तिकडे येणार नाही. भाजण्यावरच भागलं. जीव वाचला. आता परत तिकडं येऊन जीव गमावणार नाही. माफ करा तुमचं तुम्ही जा."

परंतु दहाजणांना त्या दोघांचं हे असलं घाबरणं आवडलं नाही. ते म्हणाले, "अरे भ्याडांनो, तो माणूस असो अथवा राक्षस असो, तुमच्यासारखं असं आम्ही घाबरत नाही. नका येऊ तिथपर्यंत, पण लांबून तर दाखवाल की नाही त्याचं मचाण? चला, आपल्या जमातीची काही लाज राखा!'

त्या दहाजणांबरोबर ते दोघंही नाइलाजानं गेले. त्यांनी त्यांना लांबूनच ते मचाण दाखवलं. मग दहाजण मचाणाकडं गेले. मचाणाचे वासे धरून हलवू लागले. मचाण गदागदा हलू लागलं. डोलू लागलं. मचाणावरून किसननं पाहिलं, तर त्याला दहा सिंह दिसले! संकट मोठं होतं, पण किसननं धाडस केलं. दरडावून विचारलं, "कोण आहे रे?"

दहा सिंह गुरकावत म्हणाले, "आम्ही आहोत जंगलचे राजे!"

"अरे वा! राजांनो, कुठं निघालात? काय पाहिजे तुम्हाला?"

दहा सिंह म्हणाले, "आम्ही तुझ्याकडंच आलो आहोत आणि तुला खाणार आहोत!"

वरून किसन खो खो हसला आणि त्यांना म्हणाला, "वा! चांगली गोष्ट आहे. राजे आहात, पोट आहे, भूक लागली असेल तुम्हाला, पण थोडे थांबा! तुम्ही आहात दहाजण, मी आहे एकटा. त्यातून असा फाटका. किडमिडीत. हाडं आणि कातडी. तुमचं पोट कसं भरणार? म्हणून राजांनो, मी सांगतो तसं करा. माझ्या शेतात मी बरीच ज्वारी पेरलेली आहे. भुईमूगही लावलेला आहे. दोन्ही पिकं आता तयार झाली आहेत. काढणीला आली आहेत. म्हणून असं करा की, दहाजणं मिळून आधी ज्वारीची कापणी करा. कणसं तोडून खळं करा. ज्वारीची रास घाला. मग भुईमूग खणून काढा. त्याचीही रास घाला. भुईमुगाच्या तेलाबरोबर मी ज्वारीच्या भाकरी खाईन. चांगला धट्टाकट्टा होईन. अंगावर मांस

चढेल. मग तुम्ही मला खा! म्हणजे मग तुमचं तरी पोट भरेल!''

किसनचा हा विचार दहा सिंहाना पटला. ते आपसात म्हणू लागले, ''बरोबरच आहे त्या शेतकऱ्याचं म्हणणं. चला तर मग, ज्वारीची कापणी करू या!''

दहाही सिंह ज्वारीची कापणी करायला शेतात गेले. बोलून चालून सिंहच ते! त्यांनी शेतातल्या सगळ्या ज्वारीची कणसं तोडून आणली. खळं तयार केलं. कणसं पसरून, विखरून टाकली, आता ती तुडवून दाणे बाहेर काढायचे तर सगळ्यांनी एक साथ तुडवायचं काम करायला हवं! त्यांनी, बांधलेली बैलं कसं काम करतात हे पाहिलेलं होतंच. ते किसनला म्हणाले, ''एक दोर दे. दोरानं आम्ही एकमेकांना बांधून घेतो आणि खळं करायला सुरुवात करतो.'' किसननं मला मोठा दोर दिला. सिंहांनी तो एकमेकांच्या गळयाला घट्ट बांधून घेतला आणि लागले खळं तुडवायला!

ही संधी साधून किसन हळूच गावात गेला. गावकऱ्यांना ही हकीकत सांगून म्हणाला, 'चला प्रत्येकानं आपला कोयता तापवून घ्या. सिंहांना अद्दल घडवू या! आपली बरीच जनावरं त्यांनी मारलेली आहेत. बराच उपद्रव दिलेला आहे!''

सिंहाच्या उपद्रवामुळं गावकऱ्यांचा त्यांचेवर राग होताच. प्रत्येकानं आपला कोयता लालीलाल तापवून घेतला आणि पाचपन्नास गावकऱ्यांनी त्या सिंहांवर हल्ला केला! त्यांना चांगलेच चटके दिले! एकमेकांना बांधून घेतल्यामुळे सिंहांना काहीच करता येईना. ते नुसतेच ओरडत राहिले. एकमेकांना ढकलू लागले. या ढकलण्यात दोरी सैल पडली आणि एकेक सिंह घाबरून पळून गेला.... दाहीजण पळून गेले आणि—त्यांच्या आधीच लांब उभे असलेले पहिले दोघं तर केव्हाच पळून गेले होते!....

किसननं आपलाच नव्हे, तर सगळ्या गावाचा बचाव केला होता. दहा सिंहांकडून काम करून घेतलं होतं आणि त्यांना पळवून लावलं होतं!

गावकऱ्यांनी किसनच्या बहादुरीची खूप वाखाणणी केली. त्याच्या साहसाची आणि अकलेची खूप स्तुती केली! बारा सिंहांना वठणीवर आणणारा किसन त्यांना गावचा मोठा आधार वाटला!



# वाट दाखविणारी मुलगी

अशीच एक गोष्ट. गोष्टीत एक मुलगी. मुलगी गोरी गोरी पान. दिसायला छान! चालायची तुरूतुरू. बोलायची चुरूचुरू! खूप खूप खेळायची, नाचायची–गायची! सगळयांना आवडायची. पण आई–बापांना आणि शिक्षकांना या आवडत्या मुलीची काळजी वाटायची, चिंता वाटायची. कशासाठी?.... तर मुलगी अभ्यासातलं विसरून जायची. सगळं लक्षात ठेवायची. पण शिकवलेलं शाळेतलं सगळंच विसरायची.

अशानं झालं काय, तर मुलगी परीक्षेत झाली नापास! आई–वडील–शिक्षक म्हणून काळजी करायचे. या मुलीला काय करावं? कसं शिकवावं?... एकदा मुलगी आजारी पडली. तापानं तापली. डॉक्टरांनी तपासलं. औषध दिलं. पण मुलीचा ताप उतरला नाही. जराही कमी झाला नाही. आई मुलीच्या शेजारीच बसली होती. कपाळावर मिठाच्या पाण्याची पट्टी ठेवत होती. फुलासारखी नाजूक–देखणी मुलगी, पण तापानं तापली. कोमेजून गेली, मलूल दिसू लागली. आईच्या डोळयांत पाणी आलं, मन गलबलून गेलं. डोळे पुसताना एक थेंब ओघळला. मुलीच्या गालावर घरंगळला. मुलीनं पाहिलं, आईच्या डोळयात पाणी! मुलगी क्षीण हसली. धीर देत म्हणाली, ''आई रडू नकोस. काळजी करू नकोस. मला काहीं होणार नाही. तुला सोडून जाणार नाही. मला अजून पुष्कळ पुष्कळ कामं करायची आहेत. पुष्कळ गोष्टी करायच्या आहेत....''

आणि खरंच! मुलीचा ताप उतरला. आजार पळाला. मुलगी हळूहळू ठाकठिक झाली. तिचं तिनंच मनावर घेतलं. शाळेतलं शिकवणं लक्षात ठेवलं. परीक्षेत तिचा पहिला नंबर आला! बक्षीसही मिळालं. पहिला नंबर तिनं मग कधी सोडलाच नाही. बक्षीसही हातचं घालवलं नाही! या हुशार मुलीचं नाव होतं: मारिया मॉटेसोरी!

मारियाचं शिक्षण पूर्ण झालं की तिनं शिक्षक बनावं असं आई–वडिलांना वाटायचं. पण मारियाच्या मनात होतं. आपण इंजिनीअर व्हावं!

चौदा वर्षांची मारिया मुलांच्या तंत्रशाळेत दाखल झाली. पण तिला यश मिळालं नाही. त्या काळी मुलींना शिक्षण घेणं तसं अवघडच होतं. मुलं चिडवायची. टिंगल–टवाळी करायची.

मग मारियानं रोममधल्या मेडिकल स्कूलमध्ये प्रवेश मिळवला. पण तिथंही तेच! एक प्रोफेसर महाशय दात विचकत तिला म्हणाले, ''डॉक्टर

होणार! अशक्य."

पण मारियानं असल्या शेरेबाजीकडं, थट्टा–मस्करीकडं दुर्लक्ष केलं. झटून अभ्यास केला. आणि अखेरीस अशक्य ते शक्य करून दाखवलं! इटली देशातली मारिया मॉंटेसोरी ही पहिली महिला डॉक्टर झाली!

डॉ. मारिया मग रोममधल्या मनोरुग्णांच्या हॉस्पिटलमध्ये काम करू लागली. त्या रुग्णालयात वेडीपिशी, मंदबुद्धी आणि विकृत बालकं किती तरी होती. मारिया या बालकांवर उपचार करता करता त्या बालकांना प्रेमाची, मायेची ऊब देऊ लागली. त्यांना जवळ घेऊन त्यांच्या पाठीवरून हात फिरवू लागली. गोष्टी सांगू लागली. गाणी म्हणू लागली. गप्पा मारू लागली. खेळू–बागडू लागली. हसता–खेळता त्यांना थोडंथोडं शिकवू लागली. आणि वेडी वेडी म्हणणारी ती मुलं मारियाबरोबर शिकूही लागली. उत्साहानं, आनंदानं ती टवटवीत दिसू लागली!

मारियासुद्धा त्यांच्याकडून पुष्कळच शिकली. ती म्हणू लागली, "वेडसर, मतिमंद, विकृत मुलांना औषधपाण्याची नाही, तर आधाराची गरज आहे! प्रेमाची जरूर आहे! त्यांना जर ममतेनं जवळ घेऊन शिकवलं तर ती देखील उत्तम नागरिक बनू शकतील!"

हा एक नवीन शोधच मारियाला लागला होता. इस्पितळाच्या प्रयोगशाळेत तिनं मुलांवर केलेल्या प्रयोगाला छानदार आशादायी फळं लागली होती!

मग काय! मारियाचा उत्साह शतगुणित झाला! ती त्या मुलांच्या सेवेत पूर्णपणानं गढून गेली, रंगून गेली!

दिवस-मास उलटले. आणखी पुष्कळ पुष्कळ तिला मुलांकडून शिकायला मिळालं. मग डॉ. मारिया मॉंटेसोरीनं एक शाळाच उघडली!



या शाळेत वेडसर, भटकी, विकृत, नानातऱ्हेची मुलं मारियानं आस्थेनं घेतली.

सुरुवातीला ही मुलं भीतीनं, धास्तीनं, दबून–दबून असायची. काही मुलं मनात आलं की जोरजोरानं ओरडून गोंधळ करायची! विचारलं तर बोलायचीच नाहीत. गप्प गप्प राहायची!

मारिया मात्र दिवस–रात्र त्यांच्यात राहायची. मायेनं, प्रेमानं त्यांचं सगळं सगळं करायची. जिव्हाळयानं वागायची, आस्थेनं बघायची.

बघता बघता वर्ष गेलं आणि सुरुवातीचं रूप नकळतच पालटून गेलं! मुलांचा रंग–ढंग बदलला. चालणं–बोलणं, करणं–सवरणं निराळं झालं!

वेडसर म्हणवणारी, मतिमंद म्हणवणारी मुलं आता इतर मुलांसारखंच शिकू लागली. लिहू–वाचू लागली! इतकंच काय, परीक्षेत पासदेखील होऊ लागली!

मारियाला खूप खूप समाधान मिळालं, खूप खूप आनंद मिळाला. तिच्या या शाळेची कीर्ती दूरवर पोचली. डॉ. मारिया मॉंटेसोरीला ठिकठिकाणाहून बोलावणी येऊ लागली. शिक्षण जगतात नवीन चैतन्यदायी हालचाल सुरू झाली. आई–वडिल, शिक्षक सगळीजणं आपल्या मुलांच्या शिक्षणासंबंधी नव्यारीतीनं विचार करू लागली.

हाणा–मारा–ठोका–बडवा, ही शिक्षकातली आजवरची रीत. 'छडी लागे छम् छम् विद्या येई घम् घम्''.... ही धारणा. डॉ. मारिया मॉंटेसोरीने या धारणेला धक्का दिला. आणि 'जवळ घ्या – प्रेम द्या, कुरवाळा, हसत खेळत मनोभूमीत बीज पेरा!' ही ज्ञानदानाची नवीन रीत नम्रपणानं सांगितली. विद्यादानाची नवीन वाट दाखवली!



# धाडसी लहानग्या

एका माणसाला दोन मुलगे होते. एक मोठा. एक छोटा. मोठा हुषार होता, पण छोटा मूर्ख होता. दोन तऱ्हेच्या दोन भावांना पाहून लोक म्हणायचे, "यांच्या बापाला कसली ना कसली काळजी असावी!" काही कामधाम निघालं की मोठाच पुढं होऊन करायचा. पण रात्रीचं कुठं जायचं झालं तर तो बापाला सांगायचा, .

"बाबा, मला भीती वाटते. मी नाही जाणार!" लहानगा कोपऱ्यात बसून हे ऐकत असे. त्याच्या लक्षात कधीच आले नाही की, भीती असते तरी कसली? मोठा नेहमी म्हणायचा, "मला भीती वाटते, मला भीती वाटते!" लहानग्याला वाटायचे, "मला तर कधीच भीती वाटत नाही. भीती म्हणजेसुद्धा आपल्याला न कळणारा, न जमणारा एखादा उद्योग तर नव्हे? एखादी कारागिरी तर नव्हे?"

कोपऱ्यात बसलेल्या लहानग्याला एकदा बाप म्हणाला, "अरे, तू आता मोठा झालास. तुला काही तरी शिकलंसवरलं पाहिजे. स्वतःचं पोट भरता आलं पाहिजे. बघ, तुझा मोठा भाऊ किती काम करतो ते! तू मात्र उगाच, स्वस्थ पडून राहतोस!"

लहानगा म्हणाला, "मी खरंच काही तरी शिकेन, बाबा. मला भीती वाटत नाही, तर मी भ्यायलाच शिकेन. मला भीतीबद्दल काहीच माहीत नाही. भ्यायला येतच नाही.मी ते शिकेन, मग तर झालं!"

मोठ्यानं हे ऐकलं आणि तो खो खो हसू लागला. मनाशी म्हणाला, "किती मूर्ख आहे हा लहानग्या. कसं व्हायचं याचं?"

बाप हताश होऊन म्हणाला, "भ्यायला शिकशील, पण त्यानं पोट नाही भरता यायचं!" थोड्या वेळानं पादरीसाहेबांकडचा एक माणूस आला आणि बापाला म्हणाला, "तुझा लहान्या तर अडाणी टोणपाच आहे नुसता! त्याला काही येत नाही. तो काही शिकत नाही. मी त्याला विचारलं की, लहान्या, अरे पोट कसं भरणार आपलं? तर म्हणतो मला, मी भ्यायला शिकणार आहे."

"मलाही तसंच म्हणाला. काय करू?"

"माझ्याकडं धाडून दे. मी बरोबर सरळ करतो त्याला."

"बरंच होईल. येतो त्याला घेऊन."

बाप लहान्याला घेऊन चर्चमध्ये गेला. तिथं चर्चची घंटा वाजवायचं काम लहान्याकडे सोपवलं गेलं.

असेच काही दिवस गेले. अकदा मध्यरात्रीच

लहानग्याला त्या माणसानं उठवलं आणि चर्चच्या उंच टॉवरवर जाऊन घंटा वाजवण्यास सांगितली.

पादरीमहाशयाच्या त्या माणसानं, "याला भ्यायलाच शिकवू या" असा विचार केला होता आणि त्याप्रमाणं तो आधीच गुपचूप टॉवरवर जाऊन बसला होता.

लहानग्या टॉवरवर गेला आणि घंटेची दोरी हातात घेऊन लगला; तोच जिन्यावर अंधारात त्याला एक पांढरी आकृती दिसली. त्यानं विचारलं, "कोण आहे ?" पण आकृतीनं उत्तर दिलं नाही. ती बोलली नाही तशी हाललीही नाही.

लहानग्या दरडावून म्हणाला, "कोण आहे ते सांग. नाही तर कर तोंड काळं इथून. जा. रात्री-अपरात्री यायचं कारण काय ?"

पण तो माणूस तरीही न बोलता, न हालता तसाच स्तब्ध राहिला. त्याची कल्पना अशी की यामुळं लहानग्याला भूत आहे असं वाटेल आणि तो भिऊन जाईल !

लहानग्या परत ओरडला, "रात्रीच्या काळोखात इथं आलासच कशाला तू? बऱ्या बोलानं सरळ सांग नाही तर ढकलून देईन जिन्यावरून बघ !"

हे ऐकून तो माणूसच हादरला ! "हा तर मलाच घाबरून टाकत आहे !" तो मनाशी पुटपुटला आणि तसाच स्तब्ध राहिला. दगडी पुतळ्यासारखा.

लहानग्यांने मग आणखी एकदा खडसावलं, आणि तरीही जेव्हा तो इसम तसाच स्तब्ध राहिला तेव्हा त्यानं त्याला खरोखरच ढकलून दिलं. ढकलल्याबरोबर तो माणूस तीन चार जिने गडगडत खाली गेला आणि लोळागोळा होऊन एका कोपऱ्यात जाऊन पडला.

लहानग्याने घंटा वाजवली आणि काही न बोलताच तो परत आपल्या अंथरुणावर येऊन झोपला.

तिकडे त्या माणसाची बायको नवऱ्याची वाट पाहून पाहून थकली. बराच वेळ झाला तेव्हा घाबरली आणि नवऱ्याला शोधायला निघाली. लहानग्याला उठवून तिनं चौकशी केली तेव्हा त्यानं सांगितलं, "मला ठाऊक नाही. पण जिन्यावर कुणी तरी माझी वाट अडवून उभं होतं, त्याला ढकलून दिलं आणि आलो. तो जर तुझा नवरा असेल तर पाहा."

ती बाई लगबगीने निघाली. जिन्याजवळ येऊन पाहते तर खरंच; तिचा नवराच पडलेला ! त्याची तंगडी मोडलेली होती. तो जखमी होऊन विव्हळत पडलेला होता. बाईने आपल्या नवऱ्याला कसेबसे घरी नेले. मग रागारागाने ती लहानग्याच्या बापाकडे जाऊन म्हणाली, "तुझ्या पोरट्यानं माझ्या नवऱ्याला ढकललं. घेऊन जा त्याला माझ्या घरतून. मला नको असलं उपद्व्यापी पोरटं !"

बापानं कपाळावर हात मारून घेतला. लहानग्याकडे जाऊन त्याला रागावला, त्याला दटावलं. लहानग्या म्हणाला,

"बाबा, रात्रीच्या वेळी अंधारात भूतासारखा

येऊन त्यानं माझी वाट अडवली. तीन वेळा त्याला रस्ता सोडून बाजूला व्हायला सांगितलं; पण त्यानं ऐकलं नाही. मग दिलं ढकलून, यात काय चुकलं माझं?''

''मूर्ख पोरा, बडबड बंद कर आणि चालता हो इथून. माझ्या दृष्टीलाही पडू नकोस, जा!'' बाप ओरडला.

''बाबा, जातो मी. पण उजाडेस्तोवर थांबू द्या. मग सकाळी जाईन. भ्यायला शिकीन. आणि पोट भरीन!'' लहानग्या म्हणाला.

''तुला जे काही शिकायचं असेल तें शीक, जा! हे घे पन्नास रुपये. जा. नीघ येथून! मात्र एक लक्षात ठेव—''

''काय बाबा?''

''तू कुणाचा मुलगा आहेस हे सांगू नकोस कधी. शरमेनं मान खाली घालायची पाळी आणू नकोस माझ्यावर.''

''बरं. नाही सांगणार.''

सकाळ होताच खिशात पन्नास रुपये ठेवून लहानग्या वाट फुटेल तिकडे निघाला. स्वतःशी पुटपुटत होता, 'मला भ्यायला आलं असतं तर! मला भ्यायला आलं असतं तर!' लहानग्याचं पुटपुटणं एका माणसानं ऐकलं. तो त्याच्या-बरोबर चालत राहिला. जाता जाता ते दोघे एका झाडाजवळ आले. त्या झाडावर सात माणसांना फासावर लटकवलेलं होतं. त्यांच्याकडे बोट दाखवत तो माणूस लहानग्याला म्हणाला, ''ही प्रेतं टांगलेली आहेत. इथं रात्रभर राहिलास तर भ्यायला शिकशील.''

''खरं म्हणता? इतकं सोपं आहे भ्यायला शिकणं? मग तर मी चटकन शिकेन. पन्नास रुपये देईन तुम्हांला, मला भ्यायला आलं तर!''

लहानग्या खुषीनं तिथं रात्रभर राहिला. पहाटे पहाटे थंडी वाजायला लागली तशी त्यानं पालापाचोळा पेटवून शेकोटी केली. पण तरीही थंडी राहीना. तेव्हा त्यानं झाडावरची सातही प्रेतं खाली काढली. शेकोटीच्या भोवती ठेवली. त्याला वाटलं की, यांनासुद्धा थंडी वाजत असणारच की! प्रेतांना उद्देशून म्हणाला, ''शेका हात पाय. गरम करून घ्या.'' पण बोलून चालून प्रेतं ती! ती काय हालचाल करणार! उलट, वाऱ्याच्या झोतानं जाळ पसरला आणि प्रेतांच्या अंगावरचे कपडे जळून गेले. लहानग्याला त्यांचा खूप राग आला. ''आळशी लेकाचे!'' तो म्हणाला आणि पुन्हा सगळ्यांना त्यानं झाडावर टांगून टाकलं.

सकाळी तो माणूस आला. म्हणाला, ''कळलं भीती म्हणजे काय ते?''

''कसं कळणार? यातल्या एकानंही तोंड उघडलं नाही रात्रभर!'' लहानग्यानं रात्रीची हकिकत सांगितली, तेव्हा तो माणूस चकित झाला. याला कोण भीती शिकवणार आणि पन्नास रुपये मिळवणार? माणूस गुपचुप निघून गेला. लहानग्याही आपल्या रस्त्यानं पुढं चालला. रस्ताभर त्याची बडबड चालूच होती. ''मला जर भ्यायला आलं असतं तर किती बरं झालं असतं?''

त्याची ही बडबड एका गाडीवानानं ऐकली.

त्यानं लहानग्याला विचारलं, "कोण रे तू?"
"मला नाही ठाऊक!"

"तुझा बाप तरी कोण?"

"ते मी सांगणार नाही."

"बरं' बडबडत तरी काय होतास?"

"मला भीती शिकायची आहे. भ्यायला आलं पाहिजे मला. पण कोणी शिकवतच नाही!" "बरं बरं चल माझ्याबरोबर."

लहानग्याला घेऊन गाडीवान एका खानावळीत आला. लहानग्यानं तिथं पाऊल ठेवताच म्हटलं, "मला भ्यायला शिकायचं आहे."

हे ऐकून खानावळवाल्याला हसूच फुटलं. तो म्हणाला, "पोरा, तुझी अशी इच्छाच असेल तर इथं झकास संधी आहे. मात्र कठीण आहे."

"असे ना का, मी शिकायलाच आलोय इथवर." खानावळवाल्यानं सांगितलं, 'इथून थोड्याच अंतरावर एक भूतमहाल आहेत तुला भ्यायला शिकायचं असेल तर तीन रात्री तिथं राहावं लागेल. राजानं असा वायदा केलाय की जो तीन रात्री तिथं राहील त्याचं राजकन्येशी लग्न लावून देण्यात येईल. राजकन्या खूप देखणी आहे. आणि त्या महालात म्हणे मोठ्ठा खजिना असून काही भुतं तो सांभाळीत आहेत. आजवर तो कुणालाही मिळाला नाही. जे त्यासाठी गेले ते परत आलेच नाहीत महालाच्या बाहेर!" लहानग्या सकाळी उठला आणि राजाकडे गेला. म्हणाला, 'महाराज, आपण आज्ञा कराल तर मी तीन रात्री भूतमहालात काढण्यास तयार आहे.' राजाने त्याच्याकडे पाहिलं. राजाला तो आवडला. राजा म्हणाला, "अवश्य जा. जाताना तीन निर्जीव वस्तू नेण्यास माझी तुला परवानगी आहे." लहानग्याने आपल्याबरोबर विस्तव पाडायची चकमक, चाकू आणि सुताराचा रंधा घेतला. रात्र व्हायच्या आधीच तो भूतमहालात गेला. रात्र पडल्यावर गारठा वाढला तशी लहानग्याने चकमक चालवून विस्तव तयार केला आणि केरकचरा, लाकूडफाटा गोळा करून शेकोटी पेटवली. निवांतपणानं शेकत बसला. अर्ध्या रात्री एका कोपऱ्यातून आवाज आला, "म्याँऊ, म्याँऊ, मी येऊ? मला थंडी वाजते आहे."

"मूर्खा, मग ये की! ओरडतोस कशाला?" लहानग्या म्हणाला. तशी दोन लठ्ठ मांजरं उड्या मारीत आली. त्याच्या शेजारी बसली. लालभडक डोळयांनी त्याच्याकडं पाहून गुरगुरायला लागली. थोडा वेळ तसाच गेला. मग ती मांजरं लहानग्याला म्हणाली, "चल रे गड्या आपण पत्ते खेळू या!"

"चला, खेळू या. पण आधी तुमचे पंजे दाखवा पाहू?" मांजरांनी आपले पंजे पुढं केले. लहानग्या म्हणाला, "अरेरे! केवढी नखं वाढलीत ही! थांबा कापून टाकतो ती!" त्यानं मांजरांचे पंजे बांधून टाकले. म्हणाला, "तुमची नखं पाहिली मी. आता नाही मला पत्ते खेळायचे," एक एक तडाखा लगावून त्यानं मांजरांना बाहेर फेकून दिलं.

त्यानंतर चोहोबाजूंनी किती तरी काळीकुट्ट

मांजरं आणि कुत्री त्याच्यावर धावून आली. गुरकावू लागली. शेकोटी विझवू लागली. तशी लहानग्यानं चाकू काढला आणि म्हणाला, "दुष्टांनो, पळा येथून." त्यांच्यावर त्याने चाकूचे वारही केले. काही मांजरी, कुत्री घाबरून पळाली. काहींना मारून लहानग्यानं खालच्या तलावात फेकून दिलं. परत शेकत बसला. बसता बसता डुलकी आली. त्यानं चोहोबाजूला न्याहाळलं तर मोठा बिछाना पसरलेला त्याला दिसला. 'छान झालं' म्हणून तो उठला आणि त्या बिछान्यावर जाऊन झोपला. त्याबरोबर तो बिछाना सगळ्या महालभर गरगर फिरायला लागला. "वा ! हे तर आणखी-नच छान झालं !" लहानग्या म्हणाला.

बिछाना फिरता फिरता जिन्याजवळ गेला आणि झरझर झरझर खाली उतरला, तसाच भरभर भरभर वरती चढला. लहानग्याने उशी, पांघरूण फेकून दिले. तो शेकोटीजवळ आला. रात्रभर शेकत बसला. तिथंच झोपी गेला. सकाळी राजा आला. जमिनीवर झोपलेल्या लहानग्याला पाहून म्हणाला, "भूतांनी याला मारून टाकलं असावं. किती चांगला मुलगा होता !"

लहानग्या ताड्कन उठून म्हणाला, "मी जिवंत आहे अजून !" राजाला आश्चर्य वाटलं.


"कशी गेली रात्र ?"

"अगदी मजेत !"

खानावळवालाही चकित झाला. त्यानं विचारलं, "कळली का भीती कशी असते ती ?"

"छे ! खोटं सगळं. मला जर भ्यायला आलं तर किती बरं चांगलं होईल !"

दुसऱ्या रात्री लहानग्या भूतमहालात गेला. शेकोटी पेटवून शेकत बसला. मध्यरात्री एक किंचाळी ऐकू आली. त्याबरोबर एक अर्धाच माणूस त्याच्यापुढं येऊन पडला ! "अरे ! हा तर अर्धाच आहे. दुसरा अर्धा कुठाय ?" लहानग्या म्हणाला. पाठोपाठ दुसराही अर्धा भाग वरून



आदळला. "बरं, थांब थोडं. जाळ करतो चांगला." असे म्हणून त्यानं जाळ फुंकला. तोवर ते दोन्ही भाग जोडले जाऊन एक भयंकर कुरूप माणूस तयार झाला होता आणि तो लहानग्याच्या जागेवर जाऊन बसला होता. लहानग्यानं त्याला एक ठोसा लगावला आणि धाड्‌कन पाडून आपल्या जागेवर बसला. त्यानंतर आणखीही अशी काही हिडिस, कुरूप माणसं आली. लहानग्या त्यांच्याशी बोलला, खेळला. मग झोपी गेला.

सकाळी राजाने येऊन विचारले, "रात्र कशी गेली ?" लहानग्या म्हणाला, "मजेत !'

"भीती नाही वाटली ?"

"छे ! मला तर भ्यायला शिकायचंय !"

तिसऱ्या रात्री पुन्हा लहानग्या शेकोटी पेटवून बसला. मध्यरात्री सफेत दाढीवाला आला आणि म्हणाला, "पोरा, भीती कशी असते ते तुला आता कळून येईल. हे बघ, आपणापैकी जास्ती ताकद कुणाची हे पाहू या."

"ठीक आहे."

म्हाताऱ्याने जमिनीत एक लोखंडी मेख ठोकली. लहानग्याने त्याच्याहून जोराने धाव घालून दुसरी मेख ठोकली, – आणि ठोकतानाच मेखेखाली म्हाताऱ्याची दाढीही अडकवून टाकली. तो ओरडायला लागला. म्हणाला, "पोरा, मी हरलो. मला सोडलंस तर मोठ्ठा खजिना देईन ! लहानग्यानं मेख उपसून त्याला सोडवलं. म्हाताऱ्यानं महालातल्या सोन्याच्या पेटाऱ्यातून भरलेला बहुमाल खजिना दाखवला. म्हातारा म्हणाला, "यातला एक भाग राजाचा, एक गोरगरिबाचा, आणि एक तुझा." एवढ्यात मध्यरात्र संपली. म्हातारा अदृश्य झाला. लहानग्या झोपून गेला.

सकाळी राजा आला. म्हणाला, "कळली भीती कशी असते ती ?" लहानग्यानं सांगितलं, "नाही. रात्री एका दाढीवाल्यानं खजिना दाखवला. पण भीती दाखवलीच नाही !"

हे ऐकताच राजाला नवल वाटले. आनंदही झाला. तो म्हणाला, "तरुणा, तू हा महाल भुतांच्या तडाख्यातून सोडवला आहेस. माझी मुलगी तुला देणार !"

"हे सगळं ठीक आहे महाराज, पण भीती कशी असते ते कुणीच सांगितलं नाही."

खजिना ताब्यात घेतला. लहानग्याचं लग्न थाटामाटानं झालं. तो आपल्या राणीवर खूप प्रेम करायचा. पण अधूनमधून म्हणायचा "मला भ्यायला शिकायचं आहे !"

राणी म्हणाली, "मी शिकवीन ते."

राणीनं एकदा दासीकडून बादलीभर थंड पाणी आणवलं. त्यात लहान लहान मासेही होते. लहानग्या झोपला असताना त्याच्या तोंडावरचे पांघरूण काढून राणीने बादलीभर पाणी तोंडावर ओतले. त्याबरोबर लहान लहान मासेही पडले. तोंडावर वळवळू लागले. लहानग्या घाबरून उठला आणि म्हणाला,

"राणीसाहेब, आता मला कळलं भीती कशी असते ती !"

# भूक की पाप ?

असंच एक गाव. गोपीपूर त्याचं नाव. गावात रहात होता एक शेतकरी. घरात फार गरीबी. मुलगा, दोन मुली, बायको अशी परिवारातली माणसं. ना शेती ना भाती, ना काम ना धाम.

शेतकरी होता दमेकरी. तो सतत असायचा आजारी. त्याच्याकडून काम व्हायचं नाही. प्रपंचाचा भार पेलवायचा नाही. शेतकरीण कुठंतरी मोलमजुरी करायची. थोडंफार कमवायची. पण तेवढ्यात भागायचं नाही. सगळ्यांच पोट भरायचं नाही. सगळे उपाशी पोटानं रहायचे. कसेबसे दिवस काढायचे.

असेच काही दिवस गेले आणि एके दिवशी गावात धान्य दळण्याची गिरणी सुरू झाली. मोतीलाल शेठजींनी ही गिरणी टाकली होती. पिठाची गिरणी गावात आली, तशी घराघरातली जाती बंद पडली. गावातल्या सगळ्या महिला दळणासाठी गिरणीत जाऊ लागल्या. शेतकरणीचा रोजगार बंद पडू लागला. लोकांचं दळणकांडण करून ती चार पैसे मिळवत होती.

घरातली हलाखी फारच वाढली. मग तिने विचार केला की, आपला मोठा मुलगा गोपू यालाच आता काही तरी कामधंदा बघावा. गोपू आता अकरा - बारा वर्षांचा झाला होता. गोपूला घेऊन शेतकरीण मोतीलाल शेठकडं गेली. त्यांना आपली सगळी कहाणी सांगितली. गोपूला कामाला ठेवून घेण्याची पदर पसरून विनंती केली.

मोतीलाल शेठला तिची दया आली. त्यांनी गोपूला आपल्या पिठाच्या गिरणीत कामाला ठेवून घेतलं. त्यांनाही कुणीतरी कामाला माणूस हवाच होता. दिवसभर काम केल्यावर संध्याकाळी कामाचं दाम म्हणून मोतीलालशेठ गोपूला अर्धा किलो पीठ देत असे. तेवढ्या पिठाने सगळ्यांचं पोट भरत नसे. पण पाण्याला तेवढाच आधार मिळत असे.

गोपूचं वय शिकण्यासवरण्याचं होतं. खेळण्या-बागडण्याचं होतं. पण शाळा बंद करून त्याला हे काम करावं लागत होतं. शेतकऱ्याला याचं फार फार दुःख झालं होतं. पण इलाज नव्हता.

थंडीचे दिवस होते. संध्याकाळची वेळ होती. गिरणीतली दळणं घेऊन लोक आपापल्या घरी गेले होते. मजुरीचे अर्धा किलो पीठ एका फडक्यात बांधून गोपूदेखील घरी जाण्याच्या तयारीत होता.

फडक्यात पीठ बांधून घेता घेता त्याला आतून भडभडून येत होतं. पोटात कालवा-कालव होत होती. डोळे रडवेले झाले होते.

गोपूला वाटलं, एवढ्या पिठात किती भाकरी होणार? सगळयांची पोटं कशी भरणार? किती दिवस अशी उपासमार चालणार? लहानग्या बहिणी तर भुकेनं रडत असतात. कशी त्यांची समजूत घालणार? त्यांचं पोट भरावं म्हणून आईनं दोन दिवसांत भाकरीचा तुकडाही तोंडात घातलेला नाही...

गोपूचं मन गलबलून गेलं. समोर पिठानं भरलेली चार पाच पोती भिंतीला लावलेली होती. त्याच्या मनात आलं की, त्यातलं दोन मुठी पीठ आणखी घेतलं तर दोन भाकरी जास्त होतील. सगळयांना दोन तुकडे जास्ती मिळतील.

पण लगेच गोपूच्या मनात असंही आलं की, असं दोन मुठी पीठ घेतलं तर ही चोरी नाही का होणार? चोरी करणं तर पाप आहे.

गोपू गोंधळून गेला! भूक की पाप ? अशा विचारांच्या चक्रात सापडला! काय करावं.....?

'भूक की पाप.....?' 'भूक की पाप'? गोपूला वाटलं, असं न विचारता दोन मुठी जास्ती पीठ घेणं हे जर पाप असेल तर दोन धाकट्या बहिणींना उपाशी ठेवणं हेदेखील पाप नाही का? आईला उपाशी ठेवणं हे पाप नाही का?

गोपू दोन मुठी पीठ घेण्यासाठी पोत्याजवळ गेला. पोत्यात हात घालणार तेवढ्यात पुन्हा त्याचं पापभीरू मन गोंधळून गेलं. गोपूनं पुढं केलेला हात मागं घेतला. काय करावं? पाच सहा वेळा असंच झालं. गोपू हात पुढे करायचा आणि परत झटक्यानं मागं घ्यायचा. भूक की पाप..?

शेवटी भूकेनं पापावर मात केली! आईचा उपाशी चेहरा, बहिणीचं रडणं, वडिलांची असहाय्यता गोपूला बघवेनाशी झाली. त्यानं मनाशी काही तरी निर्णय केला आणि पिठाच्या भरलेल्या पोत्यातून दोन मुठी पीठ फडक्यात बांधून घेतलं. धडधडत्या मनानं घरी आला.

आईनं चूल पेटवली. गोपूनं आणलेल्या पिठाच्या भाकरी केल्या. दोन भाकरी आज जास्त झाल्या! सगळयांना एक एक तुकडा जास्त मिळाला! धाकट्या बहिणी खूष झाल्या! आनंदानं आईला बिलगल्या! आईला म्हणाल्या, "आई, गोपूदादा किती चांगला आहे. त्यानं आज जास्त पीठ आणलं, आमचं पोट भरलं...!"

आजारी वडिलांनी गोपूच्या पाठीवरून हात फिरवत विचारलं, "बाळ, मोतीशेठनं तुझी मजुरी वाढवली काय ?"

"नाही बाबा! मीच आज दोन मुठी पीठ पोत्यातून जास्त घेतलं." गोपूनं भीतभीतच सांगितलं.

बाबा म्हणाले, "म्हणजे गोपू, तू चोरी केलीस?"

"होय बाबा! मी आज चोरी केली. मला तुम्हा सगळयांची उपासमार पहावेनाशी झाली. मनात कालवाकालव झाली. किती दिवस अशी उपासमार सहन करायची, म्हणून मी चोरी केली." गोपूनं सरळ सांगून टाकलं, कबुली दिली.

"पण गोपू, तू हे चांगलं केलं नाहीस. अरे,

आपण गरीब, दरिद्री जरी असलो तरी इमानदारीनं, धर्मानं थोडंच गरीब आहोत? आपल्या जवळ पैसे नाहीत, पण इमान आहे ना! धर्म आहे ना! हे बघ गोपू, उद्या गिरणीत मोतीलाल शेठना हे सांग, आपला गुन्हा कबूल कर.... आणि संध्याकाळी तुझ्या मजुरीचं, ठरल्याप्रमाणं जे अर्धा किलो पीठ मिळेल, ते दंड म्हणून त्यांनाच देवून टाक! पुन्हा असं कधी वाईट काम करू नकोस! आपलं इमान सोडू नकोस!''

थकलेला दमेकरी बाप गोपूला गळ्याशी घेऊन मुसमूसुन रडला.

दुसऱ्या दिवशी नेहमीप्रमाणं गोपू सकाळी गिरणीत कामाला गेला. दिवसभर काम केलं. संध्याकाळी मोतीलाशेठजीला म्हणाला, ''मालक, आज मी माझ्या मजुरीचं पीठ घेणार नाही? ते दंड म्हणून तुम्हालाच देणारआहे.'' ''कसला दंड? कशासाठी?'' मोतीलाल शेठजींनी विचारलं.

गोपूनं कालची हकीकत सांगून टाकली. चोरीची कबुली दिली. चोरी का केली, हेही सांगून टाकलं. सांगता सांगता गोपूचं मन भरून आलं होतं, डोळयातून अश्रू पाझरत होते. तोंडातून हुंदके फुटत होते.

मोतीलालशेठचं मन दयेनं भरून आलं. त्यांनी गोपूला जवळ घेतलं. त्याच्या पाठीवर प्रेमानं हात फिरवीत म्हणाले, ''गोपू तुझ्यासारखा प्रामाणिक मुलगा मी पाहिला नाही. माणूस गुन्हा करतो, पण त्याची कबुली देण्याची हिंमत त्यात नसते. तू गरीब असलास तरी हिंमतवान आहेस! इमानदार आहेस! गोपू, मी धंदेवाईक माणूस आहे. धंद्यात भलेबुरे मी करीत असतो. असत्यानं वागत असतो. तू आज मला सन्मार्गाचा प्रभाव दाखवला आहेस! गोपू आजपासून तुझी मजुरी मी वाढवली आहे. रोज संध्याकाळी घरी जाताना एक किलो पीठ घेऊन जा! सगळीजणं पोटभर जेवा!''

एक किलो पीठ घेऊन गोपू घरी आला. आई–बाबांपुढे त्यानं ते ठेवलं आणि सगळी हकीकत सांगितली. दोघांनाही आनंद झाला. त्यांनी गोपूला पोटाशी धरला! म्हणाले, ''गोपू, इमान सोडू नको.''



# फुलांची दरी

गोष्ट आहे जुनी पुराणी :

भारताच्या उत्तरेला हिमालय पर्वत आहे. हिमालयाच्या कुशीत एक खोरं आहे. खोऱ्यात एका ऋषींचा आश्रम होता. पांढऱ्याशुभ्र दाढी आणि जटांचे, लालसर वर्णाचे, वृद्ध पण ताठ असलेले एक ऋषी तिथं राहात होते. ऋषींचा बहुतेक वेळ तपश्चयेतच व्यतित होत असे. पण जेव्हा केव्हा ऋषी ध्यानात नसत, तेव्हा ते उदास होऊन जात. त्याचं कारण होतं सभोवार पसरलेला बर्फच बर्फ! पर्वताची हिमाच्छादित शिखरं सुंदर दिसत खरी, पण ती रोज रोज सदानूकदा पाहायची तरी किती!

ऋषी उदास बनले म्हणजे स्वस्थ बसून राहात किंवा कधी कधी आपल्याशीच मोठमोठ्यानं बोलू लागत. पण व्हायचं काय, की त्यांचेच शब्द त्या बर्फाळ खोऱ्यात घुमायचे. प्रतिध्वनीत होऊन कानावर यायचे. ऋषी आणखीनच उदास बनायचे.

एकदा ध्यानात मग्न असतानाच ऋषींनी प्रार्थना केली, "देवा, इथं मी एकटाच आहे. साथी–सोबती कोणीच नाही. ध्यानाच्या दृष्टीनं हा एकांत फार फार चांगला आहे. पण देवा, कधी कधी ध्यान लागत नाही. मन उदास बनतं. भोवतालची विलक्षण शांतता आणि एकच एक दृश्य मन अस्वस्थ करून टाकतं. देवा, मनाला उदासी येणार नाही, असं काही तरी करा!"

ऋषी अजून ध्यानातच होते. तेवढ्यात कुठून तरी 'छुम्-छुम्-छुम्-छुम्' असा घुंगुरांचा आवाज त्यांच्या कानी आला. ऋषींनी डोळे उघडून पाहिलं. त्यांच्यापुढं एक हिमासारखीच धवल वर्णाची, अतीव सुकुमार आणि अतीव गोड, प्रेमळ व आकषक अशी एक बालिका पांढऱ्याशुभ्र वस्त्रात नटून थटून उभी होती! तिला पाहताच ऋषी मंत्रमुग्ध झाले. तिच्याजवळ गेले आणि त्या बालिकेला त्यांनी आपल्या कुशीत घेतलं. ऋषींचं अंतःकरण पुलकित होऊन गेलं. डोळयातून आनंदाचे अश्रू वाहू लागले.

ऋषींच्या डोळयातले ते वाहते अश्रू पाहून त्या धिटुकलीनं विचारलं, "बाबा, कशासाठी रडता!"

"मी रडत नाही बेटा. हे अश्रू दुःखाचे नाहीत. अतीव आनंदाचे आहेत." ऋषींनी डोळयातले अश्रू पुसले आणि विचारलं, "तुझं नाव काय, बेटा? तू कोणाची मुलगी आहेस?"

धिटुकली म्हणाली, "मी पलीकडल्या खालच्या दरीतून आले आहे. माझ्या आईनं मला

तुमच्याकडं पाठवलं आहे. माझ्या आईचं नाव आहे प्रकृती आणि माझं नाव आहे सुषमा!''

''सुषमा! छान आहे हं तुझं नाव. प्रकृतीची सुषमा! बेटा सुषमा, तू माझ्याजवळ किती दिवस राहाणार आहेस? मला तर असं वाटू लागलंय की, आता तुझ्याशिवाय एक क्षणभर देखील मला इथं एकटं राहाणं अशक्य होऊन जाईल. सुषमा, आता तू माला सोडून इथून कधीच कुठं जाऊ नकोस!'' वृद्ध ऋषी आनंदहर्षानं फुलून म्हणाले.

सुषमा म्हणाली, ''नाही बाबा. मी तुम्हाला सोडून जाणार नाही. तुमच्याजवळ राहीन. माझ्या आईनं मला सांगितलंय की, मुनिवर्यांच्या भोवती सगळीकडं आनंद, हर्ष सौंदर्य आणि प्रसन्नता यांची उधळण करून टाक! असं सौंदर्य आणि आनंद सगळीकडं फुलव की, भविष्यातसुद्धा हिमालयाच्या कुशीत कधी कोणाला उदास-उदास वाटू नये! बाबा, मी तुम्हाला कधीच सोडून जाणार नाही. आजपासून तुम्ही माझे बाबा आहात आणि हा हिमालय आपलं घर आहे!''

ऋषी आनंदविभोर झाले! छोट्या सुषमाचा हात धरून ते कधी पर्वताच्या डोंगराळ शिखरावरून फिरत असत, तर कधी तिच्याबरोबर गप्पा-गोष्टी करीत लांब लांब अंतरावर दऱ्याखोऱ्यातून हिंडत असत.

कधी कधी ऋषी सुषमाला गोष्टीही सांगत असत. एकदा अशीच एक गंमतीची हसवणारी मनोरंजक गोष्ट ऋषींनी सांगितली. ती ऐकता ऐकता सुषमा मनमोकळं हसत होती. आणि तिच्या मंजुळ हसण्याबरोबरच रंगीबेरंगी, सुंदर सुंगधी फुलं टपकत होती! फुलं फारफार सुंदर होती! छान होती! देखणी होती! हलक्या वाऱ्याबरोबर तरंगत तरंगत लांबवर जात होती. सगळीकडं परिमळत होती.


गोष्ट संपली. सुषमाही हसायची थांबली. ऋषींनी उठून आजुबाजूला आणि दूरवर पाहिलं तर सगळीकडं रंगीबेरंगी छान सुंगधी फुलंच फुलं दिसली.

ते विलोभनीय दृश्य पाहून ऋषी हर्षभरीत होऊन गेले! आनंदून गेले! पटकन उद्‌गारले, ''फुलांची दरी! वाहवा ही आहे फुलांची दरी! फुलोंकी घटी!... पृथ्वीवरचा स्वर्ग!....

फुलांच्या सौंदर्यानं वेडावून गेलेले ऋषी फुलांनी बहरून आलेल्या दरीतून लहानग्या सुषमाबरोबर रोज कितीतरी वेळ हिंडत–फिरत असत.

एकदा ऋषींचं बोट धरून सुषमा ठुमकत ठुमकत चालली होती. हसण्या–गाण्या–बोलण्यात दंग होती. तेवढ्यात एकाएकी तिचा पाय घसरला आणि तिला लागलं. ती फुलासारखीच कोमल होती. 'ऊं ऊं' करून रडू लागली. तिच्या मोठ्या मोठ्या डोळयांतून मोत्यासारखे अश्रू झरू लागले. खाली धरतीवर पडू लागले. ऋषींनी तिला सावरलं. उठवलं. तिची समजूत घातली. तिला शांत केलं.

सुषमा गप्प झाली. पण ऋषींनी आजूबाजूला पाहिलं तर जिथं जिथं तिच्या डोळयांतून अश्रूंचे



थेंब पडले होते तिथून तिथून निर्मळ जलधारा वाहू लागल्या होत्या! सुंदर, निर्झर झरू लागले होते! ते अतीव सुंदर दृश्य पाहून ऋषी चकीत झाले! तृप्त झाले!

लहानग्या सुषमानं ऋषींची उदासी पार कुठल्या कुठं पिटाळून लावली होती. ऋषींबरोबर ती हिमालयात दूरदूर जायची, हिंडायची, फिरायची, नाचायची, गायची, हसायची!.... आणि तिच्या हसण्यांतून सगळीकडं रंगीबेरंगी, सुगंधी सुकुमार फुलंच फुलं फुलून यायची. हिंडता–फिरतांना ती घसरून पडायची. रडायची. आणि तिच्या अश्रूंतून निर्मळ पाण्याचे झरे वाहू लागायचे!

पांढराशुभ्र एकच एक रंग ल्यालेला हिमालय आता दऱ्याखोऱ्यांतून रंगी–बेरंगी फुलांनी खूप खूप सुंदर होऊन गेला होता!

ऋषी प्रसन्न होते! सुषमा आनंदी होती!

दिवसांमागून दिवस गेले. महिने–वर्षे उलटली. हिमालयाची दरी–खोरी फुलांनी आणि नद्यांनी फुलून गेली! भरून गेली!

आज तो काळ फार फार जुना–पुराणा झाला आहे. हिमालयात आता ते ऋषी नाहीत आणि ती लहानगी सुषमाही नाही. पण ऋषींची उदासी घालवण्यासाठी प्रकृतीनं सुषमाकडून फुलवलेली सुंदर सृष्टी मात्र अजूनही आहे! ती नित्य फुलते आहे, खुलते आहे!

# साधाभोळा तुम्मी

गोष्ट आहे चीन देशातली. तिथल्या लोकांच्या सांगण्यातली, ऐकण्यातली. म्हणूनच हिला म्हणायचं लोककथा. अशा कथा लोकांनीच रचलेल्या असतात.

तर एक खेडेगाव होतं. तिथं एक गरीब बाई राहात होती. बाईला दोन मुलं होती. एकाचं नाव लुशी, दुसऱ्याच नाव तुम्मी. लुशी मोठा होता, तुम्मी छोटा होता. लुशी कष्टाळू होता. कामसू होता. काम करायचा आणि चार पैसे मिळवून आईला मदतही करायचा. आईला बरं वाटायचं. तिच्यावरचा भार हलका व्हायचा. लुशी तिला आवडायचा.

तुम्मी लहान होता. भोळाभाबडा होता. साधासुधा होता. कामातही आळशी होता. डोक्यानंही बेताचाच होता. म्हणून आई त्याला आळसट म्हणायची, तर लोक बावळट म्हणायचे.

तुम्मी आळसातच मोठा झाला. चांगला सतरा अठरा वर्षांचा बनला. सुरुवातीला आईनं त्याच्याकडं दुर्लक्ष केलं, पण मग मात्र चांगलंच लक्ष पुरवलं!

आईनं एके दिवशी चटणी–भाकरीची पुरचुंडी तुम्मीच्या हातात ठेवली आणि म्हणाली, "ही चटणी–भाकरी घे आणि घरातून जा! कामाला लाग, कुठंही जा. काम कर. चार पैसे मिळव आणि मगच घरी परत ये. हात हालवित येण्यापेक्षा न आलास तरी चालेल!"

तुम्मीला घराबाहेर जायचं जीवावर आलं. कामाचं तर संकटच वाटू लागलं. पण आता इलाजच उरला नव्हता. आईनंच घराबाहेरचा रस्ता दाखवला होता.

पुरचुंडी घेवून तुम्मी निघाला. वाट तुडवित चालला. चालला....चालला... पण कुठं जायचं, काय करायचं, कसे पैसे मिळवायचे... हे काही त्याला कळत नव्हतं. त्याच्या डोक्यात गोंधळच उडाला होता.

जाता जाता दुपार झाली. तुम्मीला भूक लगली. एका विहिरीजवळ बसून त्यानं चटणी–भाकरी खाल्ली. भाकरी खाता–खाताच त्याचं लक्ष इकडं तिकडं भिरभिरत असताना जवळच पडलेल्या एका सापाकडं गेलं. तुम्मी सापाजवळ गेला. साप मोठा लांबलचक होता, पण जागचा हलू शकत नव्हता. तो आजारलेला होता. तुम्मीला दया आली. कीव आली. त्यानं सापाला पाणी पाजलं. भाकरीचा चुरा खाऊ घातला. जवळच्या पिशवीत ठेवून दिला. त्याच्या डोक्यात आलं या सापाला विकलं तर चार पैसे मिळतील!

पुढं तीन चार दिवस तुम्मीनं सापाला

आपल्या बरोबरच ठेवलं. त्याला खाऊपिऊ घातलं. त्याची सेवाशुश्रूषा केली. काही दिवसातच साप बरा झाला. खाऊन–पिऊन भला दांडगा बनला. पिशवीत मावेनासा झाला. मग तुम्मीनं एक मडकं मिळवलं आणि त्यात सापाला ठेवलं.

ऐतं खाऊन पिऊन काही दिवसांनी साप आणखीन मोठा झाला. वाढला. मग मडक्यातही मावेनासा झाला. काय करावं? तुम्मी चिंतेत पडला. मग सापच त्याला म्हणाला, "मला आता तू नदीत सोडून दे!"

तुम्मी सापाला म्हणाला, "वा रे वा! मी बरा तुला सोडीन. मी तुला विकणार आहे. तुझ्यावर पैसे कमावणार आहे आणि ते आईला नेऊन देणार आहे! आईनं मला बजावलेलं आहे की, पैसे कमावल्याशिवाय घरात येवू नको!"

सापाला तुम्मीच्या प्रांजळपणाची आणि भाबडेपणाची गंमत वाटली. तो तुम्मीला म्हणाला, "अरे, तू मला नदीपर्यंत घेवून चल. मी तुला चांगलं बक्षीस देतो."

भाबड्या तुम्मीनं सापाला नदीपर्यंत नेलं आणि सोडून दिलं. सापानं सळसळत नदीच्या पाण्यात उडी घेतली. थोड्या वेळानं तो पाण्याबाहेर आला, तेव्हा सोनेरी फणीचा तो नाग बनलेला होता!

नागोबा तुम्मीला म्हणाला, "तू माझी बरीच सेवा केली आहेस. मला जगवलं आहेस. मी तुझ्यावर खुष आहे. हे लहानसं गाढव तुला मी बक्षीस देत आहे!" तुम्मीनं पाहिलं तर खरंच एक गाढव त्याच्यापुढं उभं होतं.

तुम्मी म्हणाला, "या गाढवाला घेवून मी काय करू? आधीच सगळे मला 'गाढव' म्हणतात! गाढव पाहून आईदेखील मला गाढवातच काढील!"

नागोबानं सांगितलं, "हे गाढव इतर गाढवांसारखं नाही. तू जे काही याच्याकडे मागशील ते हे गाढव तुला देईल! पैसे माग, द्रव्य माग, सोनं, चांदी काहीही माग!"

असं गाढव मिळाल्याबद्दल तुम्मीला आनंद झाला. गाढव घेऊन घरी जायला परतला.

जाता जाता एका गावात रात्र झाली. तुम्मी थकूनही गेला होता. म्हणून एका धर्मशाळेत निवाऱ्यासाठी पोहोचला. धर्मशाळेच्या माणसानं तुम्मीला राहायला जागा दिली. आणि गाढव गोठ्याकडं घेवून निघाला. तुम्मी त्याला म्हणाला, "बघ बरं, गुपचूप नेवून गाढवाला बांधा नाही तर त्याला म्हणशील, "दे सोनं, दे चांदी!"

धर्मशाळेच्या माणसाला तुम्मीच्या बोलण्याची आधी गंमत वाटली आणि मग यात काहीतरी रहस्य असावं असं जाणवलं. त्यावेळी तो काही बोलला नाही. पण मध्यरात्री उठला आणि गाढवाकड जाऊन म्हणाला, "हे गर्दभा, दे सोनं, दे चांदी!"

हे ऐकताच गाढवाच्या एका कानातून सोन्याच्या आणि दुसऱ्या कानातून चांदीच्या लडी पडू लागल्या!

त्या माणसाला भलताच आनंद झाला आणि तो मोहात सापडला. तुम्मीच्या भोळसटपणाची कल्पना त्याला आलेलीच होती. त्यानं काय

केलं. दुसरं एक गाढव आणून या गाढवाच्या जागी बांधलं आणि तुम्मीचं गाढव आपल्या घरात नेऊन ठेवलं.

उजाडल्यावर तुम्मीनं गोठ्यातलं गाढव घेतलं! घराकडं निघाला. तुम्मीला दारात पाहाताच आईनं विचारलं, "आलास? काय काम केलंस? किती पैसे कमावलेस? काय आणलं आहेस?"

तुम्मी म्हणाला, "आई, मी हे गाढव आणलं आहे!" गाढव पाहून आईनं कपाळावर हात मारून घेतला आणि रागारागानं ती म्हणाली, "वा, काय रे दिवटा मुलगा तू. तू एक गाढव आणि आता दुसरं गाढवच आणलं आहेस. दोन गाढवाला मी कशी पोसू?" तुम्मीनं सांगितलं, "आई, हे गाढव तसलं नाही. वेगळं आहे. पैसे मागितले तर पैसे देतं. सोनं मागितलं तर सोनं देतं, चांदी मागितली तर चांदी देतं!"

आई आणखीनच रागावली आणि म्हणाली, "तू खरोखरच गाढव आहेस! निव्वळ गाढव आहेस! गाढव का पैसे, सोनं, चांदी देतं!"

तुम्मी म्हणाला, "बघच तू!"

तुम्मी म्हणाला, "गाढवा रे गाढवा, दे मला सोनं, दे मला चांदी, दे मला पैसे !..."

पण गाढव ढिम्म-ढिम्म उभं होतं! त्यानं काहीच दिलं नाही. तुम्मीनं वरचेवर गाढवाकडं मागितलं, पण गाढव गाढवासारखंच उभं होतं!...

आई आणखीन रागावली, "मूर्ख आहेस तू तुम्मी. तुला अक्कल कशी ती नाही. जा. चालता हो इथून. पैसे कमावल्याशिवाय येऊ नकोस."

तुम्मी तिथून परत फिरला. नदीकाठी नागोबाकडं आला. त्याला पाहताच नागोबानं विचारलं, "का आलास तुम्मी परत? काय हवं आहे तुला?"



तुम्मीनं त्याला सांगितलं, "नागोबा, तुम्ही देखील मला बावळट ठरवलंत, फसवलंत. हे गाढव गाढवासारखंच आहे. मला नको असलं गाढवं."

नागोबा म्हणाला, "बरं, गाढव नको तर हे घोंगडं घे! या घोंगड्यावर बसून काहीही खायला माग, जेवायला माग, लगेच तुझ्या आवडीच्या पदार्थांचं ताट पुढं येईन!"

तुम्मी घोंगडं घेऊन घराकडं निघाला. जाता जाता रात्र झाली. त्याच धर्मशाळेत तुम्मी आसऱ्याला गेला. तुम्मी जवळचं घोंगडं पाहून खाणावळीतल्या माणसानं ओळखलं की, त्या गाढवासारखंच हे घोंगडंदेखील रहस्यमय असणार! तो तुम्मीला म्हणाला, "तू माझ्या बिछान्यावर झोप, तुझं घोंगडं मी सांभाळतो."

भोळ्या तुम्मीनं त्या माणसाकडं घोंगडं दिलं आणि सांगितलं, "असंच ठेव, याच्यावर बसून काही खायला मागू नकोस!"

तुम्मीच्या बोलण्यातनं घोंगडीचं रहस्य त्या लबाड माणसाच्या लक्षात आलं होतं. मध्यरात्री तो उठला. घोंगडी टाकून बसला. म्हणाला, "मला पंचपक्वान्न जेवायला हवीत!" त्याबरोबर त्याच्यापुढं भलं मोठं ताट वाढून आलं. त्या माणसानं ते फस्त करून टाकलं, तो घोंगडीच्या मोहात अडकला. मग त्यानं तसलंच घोंगडं आणून ठेवलं आणि ते घोंगडं घरी नेलं.

उजाडल्यावर तुम्मी घोंगडं घेवून घरी गेला. त्याला दारात पाहताच आईनं रागानंच विचारलं, "आता काय आणलं आहेस?"

तुम्मीनं सांगितलं, "हे घोंगडं आणलं आहे." आईनं घोंगडं बघून कपाळावर हात मारून घेतला. म्हणाली, "किती रे दळभद्रा आहेस तू! पोटाला अन्न नाही. ते आणायचं सोडून घोंगडं कशाला आणलंस?" तुम्मी म्हणाला, "आई, हे घोंगडं तसलं नाही. वेगळ आहे. याच्यावर बसून काहीही खायला मागितलं की लगेच मिळतं!"

"किती रे बावळट आहेस तू? घोंगडं कसं खायला देईन?" "बघच तू आई!" असं म्हणून तुम्मीनं घोंगडं अंथरलं. त्यावर तो बसला आणि म्हणाला, "घोंगड्या रे घोंगड्या, मला भूक लागली आहे. जेवणाचं ताट दे!" पण घोंगड्याकडून ताट नाही की जेवण पुढं आलं नाही. तुम्मीनं पुन्हा पुन्हा तेच मागितलं, पण घोंगडं घोंगड्यासारखंच पडलं होतं. एक नाही, दोन नाही. आई संतापली. म्हणाली, "तुम्मी तुझ्यासारखा निर्बुद्ध मुलगा मी पाहिलेला नाही. वेडा आहेस तू. पैसे मिळवल्याशिवाय घरी येऊ नकोस."

घोंगडं घेऊन तुम्मी तडक नागोबाकडं आला. नागोबानं विचारलं, "आता काय झालं? काय हवं तुला?" तुम्मीनं रागानंच म्हटलं, "नागोबा, तुम्ही मला दुसऱ्यांदा फसवलं, बनवलं, हे घोंगडं जेवायला खायला काहीच देत नाही. मला नको तुमचं घोंगडं."

नागोबाच्या लक्षात आलं की साध्याभोळ्या गरीब तुम्मीला कुणीतरी फसवत आहे. लुबाडत आहे. मग तो त्याला म्हणाला, 'तुम्मी, आता मी

तुला एक वेगळीच वस्तू देतो. ही काठी घे, तू जेव्हा या काठीला म्हणशील, 'काठी काठी माझ्यावर दया कर!' तेव्हा ही काठी तुला हवं तेच देईल!'

काठी घेऊन तुम्मी घराकडं निघाला. वाटेत रात्र झाली. त्याच धर्मशाळेत निवाऱ्याला गेला. त्याला पाहताच धर्मशाळेतल्या माणसानं म्हटलं, "या या. चार घास खा. माझ्या बिछान्यावर झोपा. काठी माझ्याकडं द्या. मी सांभाळून ठेवतो."

हातातली काठी त्या माणसाकडं देत तुम्मी म्हणाला, "ही काठी ठेव. मात्र तिच्यापुढं दयेची याचना करू नका" तुम्मीच्या बोलण्यातून काठीचं रहस्य त्या लबाड माणसाच्या लक्षात यायला वेळ लागला नाही. मध्यरात्री तो उठला काठीपुढं गेला आणि म्हणाला, "काठी काठी, माझ्यावर दया कर!"

त्याबरोबर काठीचे तडाख्यावर तडाखे त्याच्या पाठीवर, पोटावर, डोक्यावर बसू लागले. सगळं शरीर काठीच्या तडाख्यांनी सडकून निघू लागलं. तो माणूस बेजार झाला! हैराण झाला! काठीच्या मारानं विव्हळू लागला. त्याला काही सुचेचना. काठीला कसं थांबवायचं हे कळेचना काठीचे तडाखे एकसारखे अंगावर बसतच होते. शेवटी तो मोठमोठ्यानं ओरडू लागला. तुम्मीला हाक मारू लागला. तुम्मी त्याच्याकडं आला. पाहातो तर काठीचे तडाखे त्या माणसाच्या अंगावर एकसारखे बसत होते आणि तो माणूस गुरासारखा ओरडत होता. तुम्मीला पाहून हात जोडून म्हणू लागला,

"महाराज, माझ्यावर दया करा. या काठीच्या तडाख्यातून मला वाचवा! पाहिजे तर तुमचं



गाढव आणि घोंगडी परत देतो! माझी सुटका करा! जीव वाचवा! अशी लबाडी मी करणार नाही!''

तुम्मीच्या डोक्यात लख्ख प्रकाश पडला. सगळं काही तो समजून चुकला. त्या माणसाला म्हणाला, ''आधी माझं गाढव आणि घोंगडं आणून दे!''

काठीच्या मारानं हैराण झालेल्या माणसानं तुम्मीचं गाढव आणि घोंगडं परत दिलं. ते घेतल्यावर तो काठीला म्हणाला, ''काठी काठी, गप्प बैस!''

काठी थांबली.

मग गाढव, गाढवावर घोंगडं आणि हातात काठी घेऊन तुम्मी घरी परतला. तुम्मीला दारात पाहताच आईनं रागातच विचारलं, ''आता काय आणलं आहेस? तुम्मीनं सांगितलं, ''आई, आता आणलंय गाढव, घोंगडं आणि ही काठी!''

''आहाऽ हाऽ किती रे, खुळा तू? अजून कशी तुला अक्कल येत नाही? पुन्हा तेच गाढव. तेच घोंगडं घेऊन आलास आणि ही काठीदेखील तसलीच असणार?''

''नाही आई, हे सगळं वेगळंच आहे. बघच तू आता.'' असं म्हणून तुम्मीनं गाढवाला सांगितलं, ''गाढवा, गाढवा, पैसे दे!'' गाढवाच्या दोन्ही कानातून खळखळ करीत चांदीचे रुपये पडू लागले!''

मग तुम्मी घोंगडं अंथरून त्यावर बसला. म्हणाला, ''घोंगड्या, घोंगड्या, पंचपक्वान्नाचं जेवण दे!'' त्याबरोबर भलं मोठं ताट पक्वान्नानी भरून पुढं आलं!''

हे सगळं पाहून आई चकित झाली! आनंदून गेली! म्हणाली, ''तुम्मी किती रे मिळवून आणलंस हे! कसं मिळवलंस?''

तुम्मीनं सगळी हकीकत आईला सांगितली. ती ऐकून आईनं त्याला जवळ घेतलं. त्याला कुरवाळीत म्हणाली, ''तुम्मी, तुझ्या प्रांजळपणाचं, साध्याभोळ्या स्वभावाचं हे बक्षीस आहे!''

तुम्मी म्हणाला, ''पण आई, तू मला घराबाहेर हाकलून दिलंस त्यामुळंच माझ्यातला आळस गेला. कामचुकारपणा संपला. तुझीच कृपा आहे!''

* * *

# वाघभाऊ

सोनसळी बंगाल म्हणजे भारताची शान! कला-क्रांती–साहित्य–संगीत यांनी बंगालची सस्यश्यामल भूमि श्रीमंत आहे. समृद्ध आहे.

तर त्याच बंगालमधली ही एक लोककथा.

बंगालमधल्या सुंदरवनात एक आहे गाव. भीखमपूर हे त्याचं नाव, गाव लहानसंच, छोटं, पण तिथं राहात होतं एक कुटुंब मोठं. कुटुंबात होते सात भाऊ. सात भावांच्या सात बायका. मुलंबाळं... गजबजलेला परिवार! खाऊनपिऊन सुखी. समाधानी.

दरवर्षीप्रमाणं अश्विनाचा महिना जवळ आला होता. दुर्गापूजेच्या उत्सवाची तयारी सुरू झाली होती. लहान–मोठे आपापल्यापरीनं कामाला लागले होते. घरात–गावात सगळीकडं उल्हास–उत्साह ओसंडत होता.

दुर्गापुजेची तयारी चालली होती. सासुरवाशिणींचे डोळे माहेरच्या वाटेकडं लागले होते.

बंगालमध्ये प्रथा अशी आहे की, दुर्गापूजेच्या उत्सवाला भावानं यायचं आणि बहिणींना भेट द्यायची. महाराष्ट्रातल्या भाऊबीजेसारखीच ही रीत!

भाऊ बहिणीला सुंदर सुंदर साडी, दागिना, वस्तू, पैसे, काही ना काही देतात. बहीण भावाला गोडधोड करून घालते. आनंदी होते.

तर दुर्गापूजा आली. मोठ्या सहा सुनांचे सहा भाऊ आले. बहिणींना भेट घेऊन आले. बहिणी आनंदून गेल्या.

पण सातवी धाकटी सून दुःखी झाली. खट्टू बनली. तिला ना आनंद ना उत्साह. तिचे डोळे पाण्यानं डबडबले. अश्रू वाहू लागले.

मोठ्या सुनेनं पाहिलं. तिनं धाकटीला जवळ घेतलं. तिची समजूत काढू लागली. तशी धाकटी म्हणाली,

"मला देवानं भाऊ ठेवला नाही. कोण माझ्यासाठी येणार? कोण मला भेट देणार?..... माझा भाऊ असता तर आला असता. वाघ होता वाघ माझा भाऊ!"

आणि नेमका याचवेळी एक वाघ रस्त्यानं चालला होता. वाघानं धाकट्या सुनेचे शब्द ऐकले. तो थबकला. होता वाघ, पण दयाळू, मायाळू, कनवाळू. त्यात धाकट्या सुनेनं त्याला 'भाऊ' म्हटलं होतं. वाघाला वाटलं, "या बहिणीकडं गेलंच पाहिजे. दुर्गापूजेची भेट दिलीच पाहिजे. मी तर वाघ आहे! मग बहिणीची इच्छा पुरी करायलाच हवी!"

वाघानं बहिणीकडं जायचं ठरवलं. पण विचार मनी आला, "कसा जाऊ? बहिणीला भेट कशाची देऊ? ना जवळ पैसा ना अडका!

आणि त्याहून मोठी अडचण अशी की या बहिणीकडं कसं जायचं? आपल्याला बघून ती तर घाबरून जाईल! मग काय करावं?''

वाघ विचारात पडला. काय करावं?.... मग शेवटी त्यानं ठरवलंच, ''काही होवो, या बहिणीकडं जायचंच. तिला भेट द्यायचीच. आनंदी करायचंच. नाही तर कसला मी वाघ!''

वाघ रस्त्यातून हळूहळू निघाला. धाकट्या सुनेच्या दारात आला. दरवाजा बंद होता. वाघानं दारावर पंजा मारला. दार ठोठावलं. म्हणाला, ''दार उघडा दार!''

घरातल्यांनी दारावरची दणकट थाप ऐकली होती. त्या पाठोपाठ वाघाचा घनगंभीर आवाज!... सगळीजणं घाबरून गेली.

''दार उघडा दार!'' वाघानं पुन्हा आवाज दिला. पुन्हा दारावर पंजा दणकावला.

''कोण आहे?'' धीर करून मोठ्या सुनेनं विचारलं.

''मी आहे. धाकटीचा भाऊ.''

''धाकटीचा भाऊ?''

''हां. बहिणीला भेटायला आलोय.''

''कोण भाऊ?''

''वाघ!''

''वाघ?''

''हां. वाघ आहे मी वाघ! दार उघडा!'' वाघ म्हणाला. वाघ म्हटल्यावर मोठी पण घाबरली. तिचं अवसान विरलं.

''दार उघडा दार!'' वाघानं पुन्हा आवाज दिला. पुन्हा दारावर थाप मारली.

''थांब हं भाऊ. आले मी.'' धाकटी म्हणाली, आणि न घाबरता धावत दाराकडं गेली. कडी काढली. दार उघडलं. पाहाते तर खरंच दारात वाघ उभा!

धाकटीला पाहून म्हणाला, ''ताई, ये. बैस माझ्या पाठीवर. घाबरू नको. तूच म्हणालीस ना, माझा भाऊ वाघ होता म्हणून. मग मी आलो आहे. चल बैस पाठीवर.''

धाकटीही बहादूर. बसली वाघाच्या पाठीवर. तिची भीती पार पळाली होती. भावाची माया मनी दाटली होती.

धाकटी सून पाठीवर स्वार झाल्यावर निघाला वाघ तिथून ढांगा टाकत! गेला जंगलाच्या वाटेनं!

घरवाले, गावकरी थक्क! पाहतच राहिले! कुणी धाकटीच्या धाडसाचे कौतुक करू लागले, तर कुणी ''भोळीभाबडी वाघाला फसली'' म्हणू लागले. 'जंगलात गेल्यावर धाकटीला खाणार,' म्हणून कुणी रडूही लागले. नाना तर्क नि वितर्क!...गावभर चर्चा!...

इकडं वाघ धाकटीला घेऊन जंगलात आला. आपल्या एका गुहेत आणून धाकटीला खडकावर बसवलं. म्हणाला, ''ताई, घाबरू नकोस. बैस. मी येतोच लवकर.''

वाघानं झेप घेतली नि जंगलात गेला. जंगल पार करून पलीकडल्या सोनपूर गावात आला. बाजार भरला होता. गजबजला होता. वाघ घुसला. भर बाजारात वाघाला पाहतच लोकांच्या तोंडचं पाणी पळालं भीतीनं. घाबरून ओरडत

ओरडत सैरावैरा पळू लागले. गल्लीबोळात, घरात, दुकानाच्यामागं जाऊन दडले..... बाजार ओस पडला.

वाघ रिकाम्या रस्त्यानं राजाच्या ऐटीत निघाला. एका मोठ्या कापडाच्या दुकानात शिरला. दुकानदार केव्हाच गायब झाले होते. वाघानं रेशमी लालबुंद कापडाचं एक ठाण उचललं. जरीचे, लोकरीचे काही कपडेही काढले. मग शेजारच्या सराफी दुकानात शिरला. सोन्या–मोत्यांचा हार घेतला. हिऱ्याची अंगठी घेतली. बिलवर–पाटल्या घेतल्या. पाणीदार मोत्यांची नथही घेतली आणि सगळं घेऊन परत गुहेत आला. धाकटी पुढं ते ठेऊन म्हणाला, ''ताई, ही माझी वाघ भावाची भेट घे ! आनंदी हो !''

धाकटीला आनंद झाला. ती हसू लागली. खुष झाली.

वाघ म्हणाला, ''ताई, सगळी भेट घेऊन पाठीवर बैस. चल, तुला तुझ्या घरी पोचवतो. उशीर नको व्हायला.''

धाकटी सून वाघावर परत स्वार झाली. वाघ ढांगा टाकत भीकमपुरात आला. धाकट्या सुनेच्या दारात उभं राहून म्हणाला, ''दार उघडा दार !''

वाघाचा आवाज ! दारावरती दणकट पंज्याची थाप ! आता तर घरवाली मंडळी आणखीनच भेदरून गेली ! घाबरून गेली !

''दार उघडा दार !'' वाघानं पुन्हा आवाज दिला. थाप मारली.

मग थोरली सूनच धीरानं आतून म्हणाली, ''सकाळी आलास, धाकट्या सुनेला घेऊन गेलास. आता काय पाहिजे बाबा, तुला ?''

थोरल्या सुनेचा आवाज ऐकून बाहेरून धाकटी म्हणाली, ''थोरल्या बाई, मी आले आहे. धाकटी. दार उघडा !''



थोरली सून भीतभीतच पुढं झाली. दार उघडून पाहू लागली, तर धाकटी वाघावर स्वार झालेली! पुढ्यात भेटवस्तूंचं ओझं! घरची मंडळी अवाक्! थक्क!

धाकटी सून वाघावरून उतरली. घरात आली. वाघानं गाठोडं ठेवलं आणि म्हणाला, "ताई, जातो मी, सुखात रहा!"

वाघ ढांगा टाकत निघून गेला.

मग धाकट्या सुनेनं गाठोडं सोडलं. रेशमी, जरीचे, लोकरीचे कपडे आणि हिऱ्या–मोत्यांचे, सुवर्णाचे दागिने बघून सगळ्या सुना आणि सगळे भाऊ चकित झाले! सगळेजणं धाकटीचं कौतुक करू लागले. धाडस वाखाणू लागले. मोठ्या सुनेनं तर धाकटीची मीठ–मोहऱ्या उतरून दृष्ट काढली!

धाकटीच्या कौतुकानं मधली मात्र जळफळू लागली. तिला धाकटीचा मत्सर वाटू लागला. हेवा वाटू लागला. कारण तिचा भाऊ येऊन गेला होता. दुर्गापुजेची भेट देऊन गेला होता. तिची भेट छान होती. चांगली होती. दरवर्षीच तिचा भाऊ तिला सुंदर भेट देऊन जायचा. पण यावर्षी आता धाकटीची भेट तिच्या भेटीहून उजवी ठरली होती. धाकटीच्या भेटीपुढं मधलीची भेट फारच तुच्छ ठरली होती. मधली धाकटीचा द्वेष करू लागली. दुःखी झाली.

मग मधलीनंही तसंच करायचं ठरवलं. एकदा दारापाठीमागं बसली. वाघ बघून म्हणाली, "मी किती अभागी. मला कोणी भाऊ नाही. नाही तर मला देखील भारी भेटवस्तू मिळाल्या असत्या!"

दारावरून जाणारा वाघ थबकला. दारावर पंजाची थाप देत म्हणाला, "दार उघडा दार!"

मधलीनं घाईघाईनं दार उघडलं. वाघानं विचारलं, "मधली सून ना तू?"

"होय वाघ भाऊ."

"तू का दुःखी?"

"धाकटीसारखीचं मी!"

"तुला पण भाऊ नाही?"

"तूच माझा भाऊ वाघोबा."

"मग बैस माझ्या पाठीवर." वाघानं सांगितलं. मधली झटकन् वाघावर स्वार झाली. वाघ लांब लांब ढांगा टाकत निघाला. जंगलातल्या गुहेत आला. मधलीला म्हणाला, "उतर खाली. माझं घर आलं. बस त्या खडकावर."

मधली झटकन् उतरली. खडकावर बसली. धाकटीनं सांगितल्याप्रमाणं घडत होतं. मधली आनंदून गेली होती. आता वाघ मलाही भारी भारी कपडे, दागिने आणून देईल, मनाशी म्हणाली. पण वाघ काही तसे बोलला नाही. कुठं गेला नाही. उलट मधलीला दरडावून म्हणाला, "खरं सांग मधली, तुला भाऊ नाही?"

मधली घाबरली. गप्प बसली. वाघानं आणखी दरडावात विचारलं: "खरं सांग, नाही तर खाऊन टाकीन तुला!"

मधली फारच गोंधळली, म्हणाली, "आहे."

"तो आला होता ना?" "तुला भेट देऊन गेलाय ना?"

"होय."

"मग, खोटं का बोललीस? धोका का दिलास?"

मधली गप्प बसली. घाबरून, ओशाळून गेली.

"धाकटीचा, माझ्या खऱ्याखुऱ्या बहिणीचा द्वेष करतेस होय? खाऊ का तुला?"

वाघ मोठ्ठा भयंकर जबडा उघडीत म्हणाला. त्याची जीभ, सुळे, दाढा पाहून मधली थरथर कापू लागली. झटकन् वाघाचे पाय धरून म्हणाली, "वाघोबा, मला क्षमा कर. पुन्हा असं करणार नाही. मला खाऊ नकोस."

वाघ मोठ्यांदा हसला. म्हणाला, "घाबरूं नकोस. मी खाणार नाही तुला. कारण किती केलं तरी माझ्या ताईची – धाकटीची तू मधली जाऊ आहेस ना! चल, तुला घरी पोचवतो."

"खरंच!"

"हो. खरंच. पण सांग तुला कसली भेट पाहिजे?"

"वाघोबा, तुझ्यासारखा भाऊ मिळाला. माझा मोह, स्वार्थ झाडून टाकलास, ही भेट काय कमी आहे? फार मोठी आहे!"

मग वाघावर स्वार होऊन मधली घरी आली. येतांना मनाशी म्हणत होती. "आम्ही माणसं किती लोभी? स्वार्थी? माणसांपेक्षा ही जंगलची जनावरं किती चांगली! सरळ! दयाळू!!"...



# पांढरा साप

जुनी पुराणी गोष्ट आहे. गोष्टीत एक राजा आहे. राजा मोठा हुशार आहे. शहाणा आहे. राजाच्या शहाणपणाच्या अनेक गोष्टी अनेक दिवसांपासून अनेक लोकांच्या ऐकिवात आहेत. राजाचे शहाणपण अद्‌भुतच आहे! कारण त्याला सगळं काही, सगळीकडचं, सगळ्या वेळी कळतं! कसं कुणास ठाऊक, पण म्हणतात की, वाहत्या हवेतून राजाला सगळ्या गोष्टी समजतात. नवलच!

आणखी एक नवलं असं की, राजाला एक मजेशीर खोड होती. खोड अशी की, दररोज दुपारी ज्या वेळी तो जेवायला बसे त्या वेळी त्याचा एक अत्यंत विश्वासू नोकर एका थाळीत काही तरी झाकून घेऊन येत असे. त्या झाकलेल्या थाळीत काय असे हे त्या नोकरालाही माहीत नसे. नोकर थाळी ठेवून गेल्यावर आसपास कोणी नाही हे पाहूनच राजा थाळीवरचे झाकण काढीत असे. थाळीतला पदार्थ खात असे. असं खूप दिवसं चाललं होतं. एकदा त्या नोकरालाच वाटलं की, 'रोज आपण ही थाळी नेऊन देतो; पण थाळीत काय असतं हे काही आपल्याला ठाऊक नाही. तर बघावंच एकदा झाकण उघडून.'

आणि नोकर थाळी घेऊन सरळ आपल्या खोलीत गेला. तिथं झाकण काढून पाहिलं तर थाळीत होता तळलेला चवदार पांढरा साप!

पांढऱ्या सापाबद्दल नोकरानं आजवर पुष्कळ ऐकलं होतं. थाळीतला साप पाहताच त्याच्या तोंडाला पाणी सुटलं. त्यानं हळूच सापाचा एक तुकडा तोंडात टाकला न टाकला तोच खिडकीतून कसली तरी विचित्र भाषा नोकराच्या कानावर आली. गमतीदार आवाज, मजेशीर भाषा! नोकराने खिडकीजवळ जाऊन डोकावलं, तर झाडावरच्या चिमण्या, साळुंक्या बोलत होत्या. आणि त्यांच बोलणं नोकराला समजू लागलं होतं. चिमण्या – साळुंक्या आपआपसात शेत–जंगलाबद्दलच बोलत होत्या. तऱ्हतऱ्हेच्या गोष्टी करीत होत्या. आणि नोकराला त्या सगळ्या कळत होत्या.

त्याच दिवशी तिकडे राणीच्या महालात गडबड उडाली होती. झालं होतं काय, तर राणीची सगळ्यात सुंदर अशी अंगठी हरवलेली होती. शोधून शोधूनही सापडली नाही. तेव्हा या विश्वासू नोकरावरच संशय घेण्यात आला होता.

राजानं या नोकराला आपल्या पुढं बोलावलं व धमकी दिली, "मुकाट्यानं खरं काय ते सांग. उद्यापर्यंत चोर पकडून आण,

नाही तर तुला सुळावर चढवीन."

"पण महाराज, मला काहीच माहीत नाही. मी चोरी केली नाही. चोर तरी मी कसा शोधून आणणार?"

"ते मी जाणत नाही." राजा म्हणाला.

नोकर बिचारा घाबरून गेला. काय करावं, या संकटातून कसं सुटावं याचा विचार करत तो तळ्याच्या काठी गेला.

तळ्यात दोन बदकं होती. आरामात आपले पंख चोचीने घाशीत बसली होती. आपसात गोष्टी करीत होती. नोकर तळ्याकाठी उभा राहून ऐकू लागला. ती बदकं खाण्या–पिण्याच्या गोष्टी बोलत होती. इतक्यात एक बदक म्हणालं,

"आज माझं पोट कस जड जड झालंय!"

"कशानं?" दुसऱ्या बदकानं विचारलं.

"माझ्या पोटात अंगठी गेलीय आज."

"अंगठी? ती कशी?"

"धांदलीत मी ती खाण्याची वस्तू समजून गिळली. राणीच्या महालाची जी खिडकी आहे, त्या खिडकीखाली पडलेली होती अंगठी."

हे ऐकताच नोकर चटकन पुढे झाला आणि त्याने अंगठी मिळालेल्या बदकाची मान पटकन पकडली. ते बदक घेऊन नोकर भटारखान्यात आला आणि तिथल्या स्वयं–पाक्याला म्हणाला, "आज हे बदक कापून टाक. केवढं फुगलंय. पाहिलंस ना!"

बदक हातावर तोलीत स्वयंपाकी म्हणाला, "खरंच, खाऊन खाऊन बरंच लठ्ठ झालंय. कापायला हरकत नाही."

स्वयंपाक्याने बदक कापले, तेव्हा त्याच्या पोटात खरोभरच राणीची अंगठी निघाली. नोकराने बदकाच्या पोटात सापडलेली अंगठी राजाला नेऊन दिली. राजाने त्याला दोषमुक्त ठरवले. राजाचा त्याच्यावर विश्वास वाढला. राजा त्याला म्हणाला,

"मी खूष आहे, काय हवं ते माग."

नोकराला अधिकार, मान. प्रतिष्ठा नको होती. तो हात जोडून म्हणाला,

"महाराज, मला एक घोडा आणि वाटखर्चाला पैसे द्या. मला दुनिया बघायची आहे."

"ठिक आहे." राजा म्हणाला.

आणि एके दिवशी पैशाची पुरचुंडी कमरेला बांधून ऐटबाज घोड्यावर बसून नोकर दुनिया बघायला बाहेर पडला.

जाता जाता रस्त्यात एका तळ्याजवळ तो आला. तिथं त्याला एका गळाला तीन मासे अडकलेले दिसले. मासे गळातून सुटून परत तळ्यांत जाण्यासाठी तडफडत होते. लोक म्हणतात की माशांना बोलता येत नाही म्हणून, पण माशांनी केलेली विनंती नोकराला समजली आणि त्यानं माशांना काढून परत तळ्यांत सोडलं. माशांना फार फार आनंद झाला. पाण्यात सुळकांड्या मारता मारताच तोंड पाण्याबाहेर काढून एक मासा म्हणाला,

तुमचे उपकार आम्ही कधीही विसरणार नाही. उपकाराची फेड केल्याशिवाय राहणार

नाही. नोकर घोड्यावर बसून पुढे निघाला. जाता जाता खालच्या रेतीमधून कसला तरी आवाज त्यांच्या कानी आला. त्यानं कान टवकारून ऐकलं. तर मुंग्यांची राणी म्हणत होती, "ही माणसं या मुर्ख जनावरांच्या पायाखाली आम्हांला विनाकारण तुडवत असतात. यांना थोडीसुद्धा दया येत नाही.

हे ऐकताच घोडेस्वार बाजूला झाला. एका कडेने गेला.

मुंग्यांची राणी आनंदाने म्हणाली, "आम्ही तुमचे उपकार कधीही विसरणार नाही." नोकर घोड्यावर बसून पुढे निघाला. जाता जाता त्याला एक जंगल लागले. तिथं त्याला दोन कावळे दिसले. ते आपल्या पोरांना बाजूला ढकलीत होते. त्यांना म्हणत होते,

"पोरट्यांनो, जा इथून आता तुमचे पोट भरणं आम्हालं होणार नाही. तुम्ही मोठे झालात, तुमचं खाणं तुम्ही शोधा; जा."

कावळ्याची पोरं जमिनीवर पडली होती. पंखांची फडफड चालली होती. ती म्हणत होती, "आम्ही अजून कोवळी पिलं आहोत. आमच्या पंखांत शक्ती नाही. आम्हांला अजून उडताही येत नाही. तर आम्ही आमचं खाणं कसं शोधायचं इतक्यात? तुम्ही नाही दिलं तर इथं तडफडून मरण्याशिवाय मार्ग नाही आम्हांला." हे ऐकताच नोकर घोड्यावरून खाली उतरला. त्यानं आपला घोडा मारला आणि भुकेलेल्या पिलांपुढं टाकला. पिलांना फार आनंद झाला नि ती म्हणाली,

'आम्ही तुमचा उपकार कधीही विसरणार नाही. उपकाराची फेड केल्याशिवाय गत्यंतर नाही." नोकराला आता पायी पायी चालावे लागले. जाता जाता तो अका मोठ्या शहरात आला. तिथं रस्त्यांवर आणि गल्ली–बोळातून एकच गडबड माजली होती. एक दवंडीवाला ओरडत चालला होता.

'राजकुमारीला वर पाहिजे आहे. ज्याची इच्छा असेल त्याने तिच्या दोन अटी पुऱ्या कराव्यात. पण जो कोणी अटी पुऱ्या करू शकणार नाही त्याला फाशीची शिक्षा देण्यात येईल, हो!"

दवंडी ऐकून बरेच तरुण तयार झाले, पण राजकुमारीच्या अटी पुऱ्या करता आल्या नाहीत, त्यामुळं त्यांना फासावर लटकावे लागले.

एकदा अकस्मात राजकुमारी नोकराच्या दृष्टीस पडली. तिचे अपूर्व लावण्य पाहून तो मुग्ध झाला. त्याने राजकुमारीच्या अटी पुऱ्या करण्याचे ठरवले. राजापुढे जाऊन उभा राहिला.

राजाच्या सेवकांनी त्याला समुद्राच्या काठी नेलं. तिथं त्याच्यादेखत त्यांनी सोन्याची एक अंगठी समुद्रात फेकली. राजा म्हणाला 'समुद्राच्या तळाशी पडलेली अंगठी घेऊन ये नाही तर तुला समुद्रातच बुडवले जाईल.' राजा आणि सगळे नोकर त्याला तिथंच सोडून त्याच्या मूर्खपणाला हसत हसत निघून गेले.

नोकर समुद्राच्या काठा उभं राहून विचार करू लागला, 'काय करावं बरं........'

इतक्यात तीन मासे काठाकडे येताना त्याला दिसले. ज्यांचा याने प्राण वाचवला होता तेच हे तीन मासे होते. मधल्या माशाच्या तोंडात एक शिंपला होता. त्यानं तो काठावर आणून नोकराच्या पायाशी ठेवला.

नोकरानं शिंपला उघडून पाहिला तर त्यात तीच सोन्याची अंगठी होती. समुद्रात फेकलेली. नोकर ती अंगठी घेऊन लगबगीने राजाकडे आला. अंगठी पाहून राजाला नवल वाटले.

राजकुमारीला जेव्हा कळले की; अंगठी होधणारा तरुण गरीब, दरिद्री आहे तेव्हा लग्नाची टाळाटाळ करण्यासाठी तिनं दुसरी अट सांगितली. ती बागेत गेली आणि तिनं दहा पोती ज्वरी सगळ्या बागेत फेकून दिली. मग त्याला म्हणाली,

''उद्या सकाळपर्यंत एकूण एक दाणा गोळा करून झाला पाहिजे.''

नोकर एकटाच विचार करीत बसला, 'काय करावं बरं ?'

विचार करता करताच त्याला झोप लागली. सकाळ होताच तो उठल. 'आता फासावर जाण्याशिवाय गत्यंतरच नाही' असा विचार त्याच्या मनात आला तोच त्याला एकीकडं ज्वारीची दहा पोती व्यवस्थित भरून ठेवलेली दिसली. एकही दाणा कुठं पडलेला नव्हता.

रातोरात मुंग्यांच्या राणीने आपली लक्षावधी मुंग्यांची फौज कामाला जुंपली होती. सगळे काम करून टाकले होते !



उन्ह पडल्यावर राजकुमारी बागेत आली. रातोरात तरुणानं सांगितलेलं काम पुरं केलं हे पाहून तिला आणखीनच आश्चर्य वाटलं; पण ती फार घमेंडखोर होती. म्हणाली,

"माझ्या दोन अटी या तरुणानं पुऱ्या केल्या असल्या, तरीसुद्धा आणखी अक माझी अट आहे ती पुरी करायलाच हवी. जोपर्यंत जीवनवृक्षावरचं सोन्याचं सफरचंद मला मिळणार नाही, तोपर्यंत मी लग्न करणार नाही!"

तरुणाला असा वृक्ष कुठं आहे हेच ठाऊक नवहतं. तरीसुद्धा वाट फुटेल तिकडे तो भटकत चालला.

पुष्कळ पुष्कळ दिवस तो भटकत राहिला. खूप खूप लांब गेला. जाता जाता तो एका जंगलात पोचला. चालून चालून थकला होता. म्हणून तो विश्रांतीसाठी एका झाडाखाली– थांबला. तेवढ्यात झाडावरील पक्ष्यांचे बोलणे त्याच्या कानी आले आणि सोन्याचे सफरचंद पुढ्यात पडले. तरुणाला फार फार आनंद झाला. तितक्यात तीन कावळे उडत उडत त्याच्याजवळ आले आणि म्हणाले,

"त्या दिवशी भुकेनं तडफडत असताना तुम्ही आमचे प्राण वाचवले. आम्ही मोठे झालो तेव्हा ऐकले की तुम्ही सोन्याचे सफरचंद शोधीत फिरता आहात. आम्हा समुद्राच्या पलीकडं गेलो. खूप लांब, पृथ्वीच्या टोकाला गेलो तेव्हा जीवनवृक्षावर हे सोन्याचे सफरचंद मिळाले."

ते सफरचंद घेऊन तरुण परत राजाकडे आला. राजकन्येला त्यानं ते सफरचंद दिलं. राजाला आणि राजकन्येला ते अपूर्व फळ पाहून आनंद झाला. तरुणाच्या साहसाचं नवलं वाटलं!

आता टाळाटाळ करण्यात अर्थ नाही अशी राजकुमारीचीही खात्री पटली. राजानं दोघांचं लग्न मोठ्या थाटामाटानं लावून दिलं.

तरुणानं आणि राजकन्येनं सोनेरी सफरचंद अर्ध अर्ध खाल्लं. दोघांनी खूप वर्षं सुखानं राज्य केलं.

३८३४६ ६।९।२००९

# चांगुणा

एक गाव होत. गावाच नाव आनंदपूर होतं. आनंदपूर एका सुरेख नदीच्या काठी वसलेलं होतं. नदीच नाव चांगुणा होतं. चांगुणा नावाप्रमाणंच फार चांगली नदी होती. लांब दूरवरच्या डोंगरात उगम पावली होती. शेकडो मैल वाहात वाहात आली होती आणि शेकडो मैल वाहात वाहात पुढं गेली होती. समुद्राला मिळाली होती.

चांगुणेच्या काठी कितीतरी गावं होती. केवढीतरी जंगल होती. पुष्कळशी शेतीभाती होती. चांगुणा काठावरच्या लोकांचं चागलं–भलं करीत वाहत होती. आनंदपूरचे लोक चांगुणेमुळंच चांगल्या आनंदात नांदत होते. शेतीवाडी चांगुणेच्या पांयानं सदैव फुललेली असायची. गाईगुरांची गोकुळ गजबजलेली राहायची माणसं भलेपणानं वागायची. नावाप्रमाणंच आनंदपुरात आनंद नांदत होता.

आनंदपूरच्या लोकांना याची जाणीव होती. चांगुणेचं नाव निघालं की ते भक्तिभावानं हात जोडत असत. म्हणत असत, "ही सगळी चांगुणेची कृपा ! चांगुणा नसती तर आनंदपूरही वसलं नसतं. वसलं असतं तरी तिथं आनंद मिळाला नसता !"

चागुणैच्या ऐलतीरावर आनंदपूर होतं, तर पैलतीरावर घनदाट जंगल होतं. हिरव्या गर्द दाट झाडीमुळं लोक त्याला 'काळं जंगल' म्हणायचे. काळया जंगलात पुष्कळ पशू आणि पक्षीदेखील राहायचे. काही चोर–डाकूही काळया जंगलात दडून असायचे. यामुळं काळया जंगलाचा लोकांना धाक–दरारा वाटायचा. भयही वाटायचं. म्हणून बहुधा कोणी काळया जंगलात जायचा नाही. तिकडं वळायचाही नाही. नाही म्हणायला काही गरीब लाकूडतोडे जायचे. पण तेही जंगलात घुसायचे नाहीत. बाहेरची वाळलेली, सुकलेली लाकडं तोडून आणायचे, उन्हाळयाच्या दिवसात चांगुणा नदीचं पाणी आटायचं. कमी व्हायचं. त्यावेळी काही गुराखी आपली गुरं घेऊन पलीकडं गंजला जवळं जायचे. पण तेही जंगलात घुसायचे नाहीत. बाहेर बाहेरच काठावर गुरांना चरायला सोडायचे.

पावसाळयात खूप पाऊस पडायचा. चांगुणेला पूर यायचा. ती दुथडी भरून वाहायची. तिचं पाणी जंगलातही घुसायचं. गावाला येऊन भिडायचं. मग अशावेळी तर जंगलाकडं कुणीच फिरकायचं नाही. कोणी जाऊच शकायचं नाही.

आनंदपूरचे लोक चांगुणेवर फार फार प्रेम

करायचे. तिच्याविषयी त्यांच्या मनात आदरांचा भक्तीभाव तर होताच, पण आईसारखा जिव्हाळादेखील होती! म्हणून आनंदपूरचे लोक दरवर्षी आश्विन महिन्यात एक दिवस चांगुणेचा उत्सव करीत असत. चांगुणेच्या काठावर त्यादिवशी फार मोठी जत्रा भरीत असे. जत्रेला लांबलांबून लोक येत असत. बाजार फुलत असे. खेळ, करमणूक चालत असे. चांगुणेचा परिसर गजबजून उठत असे. दिवसभर लोक फेर धरून नाचत असत. गाणी गात असत. हौसमौज करीत असत आणि संध्याकाळ झाली, अंधार पडला म्हणजे द्रोणात दिवे लावून चांगुणेच्या वाहत्या पाण्यात सोडत असत. अंधाऱ्या रात्री ते वाहते दिवे फार सुंदर दिसत असतं!

वर्षानुवर्षं यात्रेची प्रथा चाललेली होती. लोक आनंद लु टत होते.

एकदा एका वर्षी खूप पाऊस पडला. चांगुणेला महापूर आला. नदीचं पाणी दोन्ही बाजूंनी लांबवर पसरलं.

अचानक आनंदपुरात अशी बातमी येऊन धडकली की, 'राका डाकू आपली टोळी घेऊन काळया जंगलात आला आहे!''

कुणाची तरी म्हैस पाण्यात पडली आणि ती पलीकडं जंगलाजवळ लागली. तिला आणण्यासाठी म्हणून कुणीतरी तिकडं गेला आणि त्याला राकाची चाहूल लागली!

राका फार कुप्रसिद्ध डाकू होता. त्यानं मोठमोठे डाके घातलेले होते. माणसांना मारलेलं होतं. छळलेलं होतं. तो राक्षसच होता! तशीच त्याची मोठी राक्षसी टोळीही होती!


काळया जंगलात राका डाकूची टोळी आली आहे, हे ऐकताच आनंदपूरचे लोक घाबरून गेले. भयभीत बनले! राकाचे टोळीवाले केव्हा गावात घुसतील आणि लुटालूट करतील याचा नेम नव्हता. कोणाला मारझोड करतील आणि कोणाची घरं पेटवतील, याचाही नेम नव्हता. ह्या सैतानामुळं लोक हादरले होते! एकमेकांत अगदी हळू आवाजात कुजबुजत होते, ''आता काय होणार? राकाची टोळी जर गावात घुसली तर काय करायचं? त्याच्याशी कसं झगडायचं? त्या टोळधाडीशी कशी टक्कर द्यायची ?''

लोक चिंताग्रस्त झाले होते. पण सगळयात अधिक चिंता गावच्या मुखियाला लागून राहिली होती. कारण, एक तर तो गावचा मुखिया—पुढारी होता. पुढारी म्हणून त्याच्यावरच मोठी जबाबदारी होती आणि शिवाय त्याच्या मुलीचं लग्न व्हायचं होतं. मुलीच्या लग्नासाठी म्हणून भारी भारी कापडं, दागदागिने, भांडीकुंडी, किंमती-वस्तू आणि पैसा अडका यांनी घर भरलेलं होतं. राकाची टोळी गावात घुसली तर सगळयांच्या-आधी आपल्याच घरावर धाड टाकणार आणि लग्नासाठी म्हणून जमवलेला हा सगळा ऐवज लुटून नेणार! गावचा पुढारी यामुळं अधिक घाबरलेला होता. अस्वस्थ झालेला होता. लोकांना धीर देण्याऐवजी लोकंच त्याला धीर देऊ लागले होते. सांगत होते. ''मुखियाजी,

असं घाबरून जाऊ नका. धीर सोडू नका. जंगलात भले डाकू येवोत, नदीला पाणी पुष्कळ आहे. पूर आलेला आहे. या पुरातून ते अलीकडं गावात येऊ शकणार नाहीत. काळजी करू नका!'' दिवसभर लोकांनी डोळ्यात तेल घालून गावावर लक्ष ठेवलं. रात्री जेवणखाण झाल्यावर ते झोपी गेले. मध्यरात्र झाली होती. पाऊसही थांबला होता. अशावेळी अचानकच गावात गोंधळ उडाला, गडबड झाली. आवाज आणि वर्दळ ऐकून झोपलेले लोक खडबडून जागे झाले, उठून घराबाहेर पडले. चांगुणेच्याकाठी पळत सुटले.

गच्च अंधार दाटलेला होता. सगळीकडं काळोखच काळोख पसरलेला होता. दिसत काहीच नव्हतं, पण नदीच्या पात्रातून जोरजोराचा आवाज मात्र ऐकू येत होता, ''अरे, कोण आहे तो? नदीच्या धारेत माझी नाव कुणी रोखून धरली आहे? कुणाची ती हिंमत? कुणाचं हे धाडस? ही नाव माझी आहे – राका डाकूची आहे, समजलास! नदीच्या मध्यावर कुणी माझी नाव रोखली आहे?'' राकाचा गंभीर आवाज ऐकून लोक दंग झाले होते! सुन्न बनले होते.

बराच वेळ असा फक्त आवाजच कानावर येत होता. लोक घाबरून हैराण होऊन गेले होते. बराच वेळ थांबल्यावर ते घरोघरी परतले. काय झालंय हे त्यांना कळलेलंच नव्हतं.



तिकडं राका आणि त्याचे साथीदार वेगवेगळयाच गैरसमजाच्या गुंतवळयात अडकलेल होते. झालं होतं असं की, ते जंगलातून नदीकाठी आले. पुरात त्यांनी नाव लोटली. नदीचं पाणी कापीत ते गावाकडं येऊ लागले आणि नदीच्या मध्यावर आल्यावर अचानकच त्यांच्या नावेपुढून दिव्यांचे द्रोण तरंगत तरंगत जाऊ लागले. अंधारात तरंगणारे असंख्य दिवे पाहून राकाला वाटलं की, बरीच मंडळी पेटलेल्या मशाली घेऊन आपल्याला अडवायला येत आहेत! बघता बघता दिव्यांच्या ज्योती झाल्या आणि एक मोठी ज्वाला उफाळलेली दिसली! राका आणि त्याचे साथीदार घाबरून गेले. त्यांना वाटलं, या ज्वालेत आता आपण सगळेच होरपळून जाणार! जीव वाचवायचा असेल तर पुढं न गेलेलंच बरं!

राका आणि त्याचे साथीदार यांनी आपली नाव परत अंधारातून जंगलाकडे वळवली. भेदरून जंगलात जाऊन ते दडले!

रात्र संपली. सकाळ झाली. लख्ख उजाडलं. चक्क उन्हं पडली. लोक चांगुणेच्या काठी काहीशा भीतीनं आणि काहीशा कुतुहलानं गोळा झाले. डोळे विस्फारून नदीकडं आणि पलिकडच्या जंगलाकडं पाहू लागले. चांगुणा नदी शांत वाहत होती. नेहमीप्रमाणं ती आपल्याच नादात आणि तालात होती. पलीकडचं जंगलही तसंच शांत होतं. काळया, हिरव्या दुलईत गुरफटून गेलेलं होतं. मात्र जंगलाजवळ नदीच्या काठी एक रिकामी नाव पाण्यावर हिंदकळताना दिसत होती. नावेत कुणीच नव्हतं. लोकांना आश्चर्य वाटलं! ते एकमेकांत बोलू लागले, चर्चा करू लागले, रात्री काय घडलं असावं, याचा अंदाज घेऊ लगले आणि बराच वेळ बोलून झाल्यावर त्या सर्वांचं एकमत झालं की, मध्यरात्री राका आणि त्याचे साथीदार धाड घालण्यासाठी नक्कीच गावाकडं निघाले होते. त्यांची ती पलीकडची नाव! डाकू निघाले असतील, पण आपल्या आई–चांगुणेनं त्यांना रोखलं असणार! हो हो, नक्कीच चांगुणेनं रोखलेलं असणार!

सगळयांनी कृतज्ञतेनं चांगुणेला वंदन केलं. सुखानं, आनंदानं सगळे घरी परतले. संकट टळण्याच्या भावनेनं सगळेच सुखावले होते!

आनंदपूर आनंदात होतं। चांगुणा शांत वाहत होती!

BVBK-0403836